# भाषानुसंधान

## संशोधन लेखसंग्रह

प्रा. समीर रामचंद्र वैरागी



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# *भाषानुसंधान*

## संशोधन लेखसंग्रह

**प्रा. समीर रामचंद्र वैरागी**

# भाषानुसंधान
# संशोधन लेखसंग्रह
## लेखक: प्रा. समीर रामचंद्र वैरागी

पत्ता : स्नेह ब – १७, पोंदार रुग्णालयासमोर, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, वरळी, मुंबई – ४०००३०.

चलभाष क्रमांक : ९९८७४६६४६७

ई-टपाल पत्ता : Sameer.vairagi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : १२ मार्च २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. २५०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- प्रा. समीर रामचंद्र वैरागी ९९८७४६६४६७)

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखक परिचय



**प्रा. समीर रामचंद्र वैरागी,**

सहायक प्राध्यापक आणि विभागप्रमुख(मराठी),

राजपत्रित अधिकारी(म.शि.से.), गट -अ,

महाराष्ट्र शासनाचे इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी(पूर्व),

मुंबई - ४०००६०.

शिक्षण : एम.ए., बी.एड.,

एम.फिल.,

नेट(जेआरएफ), सेट,

वृत्तपत्रपदविका,

भगवद्गीता पदविका,

मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम,

भारतीय ज्ञान परंपरा प्रमाणपत्र अभ्यासक्रम.

अर्पणपत्रिका

**अभिजात आणि समृद्ध**

**मायमराठी भाषेस**

**सादर समर्पित**

**हें सारस्वताचें गोड। तुम्हींचि लाविलें जीं झाड।।**

**तरी आतां अवधानामृतें वाड। सिंपोनि कीजे।।**

**संत ज्ञानेश्वर**

1. महाराष्ट्री प्राकृत : उद्गम आणि विकास
2. अपभ्रंश भाषा : व्युत्पत्ती, स्थिती आणि गती
3. अभिजात मराठी भाषा : एक सिंहावलोकन
4. मराठी भाषा व्युत्पत्ती : एक विहंगावलोकन
5. बोलीसमृद्ध ‘मराठी’: एक शोध
6. ब्राह्मी लिपी : उत्पत्ती, स्थिती-गती
7. देवनागरी लिपी : उद्गम आणि विकास
8. मोडी लिपी : उद्गम, विकास आणि ऱ्हास
9. महाराष्ट्री प्राकृतातील साहित्य : एक मागोवा
10. अपभ्रंश साहित्य  एक मागोवा
11. मराठीतील अक्षर वाङ्मय
12. महाराष्ट्र देशनामाची उत्पत्ती : एक शोध
13. संयुक्त महाराष्ट्र चळवळ, महाराष्ट्राची जडणघडण आणि भारताचा विकास
14. भारतीय योगदर्शन : एक मागोवा
15. इस्माईलचे मराठी सारस्वत
16. श्री शिवछत्रपतींचे मराठी भाषेच्या अभिवृद्धीतील योगदान
17. संत संताजी जगनाडे : व्यक्तित्व आणि कवित्व
18. मराठी भाषा संवर्धक महात्मा जोतिबा फुले
19. भाषासंवर्धक आणि साहित्य निर्माते : डॉ.बाबासाहेब आंबेडकर
20. भूमिकन्या लोककवयित्री बहिणाबाई चौधरी

# महाराष्ट्री प्राकृत : उद्गम आणि विकास

प्राकृत म्हणजे नैसर्गिक, सर्वसामान्य लोकांकडून जी भाषा प्रसवली गेली, वापरली गेली ती भाषा होय.महाराष्ट्री प्राकृत ही बहुजनांची, तर संस्कृत ही अभिजनांची भाषा मानली जाते. पाअड भाषा म्हणजे प्रकट भाषा. पाअड वरून 'प्राकृत' हा शब्द तयार झाला.'प्राकृत'चा व्युत्पन्न असा देखील एक अर्थ होतो.संस्कृतचा जन्म प्राकृत भाषांपासून झाला, असे काही अभ्यासक मानतात. "प्रकृतिः संस्कृतम् ! तत्र भवं तत आगतं वा प्राकृतम्"( (हेमचंद्रकृत प्राकृत-व्याकरण ८।१।१)असे हेमचंद्र हा प्राकृत व्याकरणकार म्हणतो. ह्याचा मराठी अर्थ "प्रकृती म्हणजे संस्कृत, आणि त्यातून उत्पन्न झालेली किंवा आलेली भाषा म्हणजे प्राकृत." असा आहे. सोप्या भाषेत, संस्कृत ही मूळ भाषा आहे आणि प्राकृत ही त्यातून आलेली किंवा त्यापासून बनलेली भाषा आहे. " प्रकृत्या भवं प्राकृतं" असे काही प्राकृत व्याकरणकार म्हणतात.ह्याचा अर्थ "जे नैसर्गिकरित्या उद्भवते ते प्राकृत आहे."असा आहे. प्राचीन व मध्ययुगीन भारतात अपभ्रंश, अर्धमागधी, नाट्यमय प्राकृत, हेलु प्राकृत, गांधारी, गौडी, कामरूपी, मागधी, महाराष्ट्री, ओड्र, पैशाची, पाली, शौरसेनी, खश इत्यादी सुमारे ३८ प्राकृत भाषा बोलल्या जात.

**'प्राकृत' शब्दाची व्युत्पत्ती**

भाषा अभ्यासक आणि वैय्याकरणी ह्यांनी 'प्राकृत भाषांचे' अनेक अर्थ प्रतिपादले आहेत, ते खालीलप्रमाणे :

१. " प्रकृत्या भवं प्राकृतं"

मराठी अर्थ - "जे नैसर्गिकरित्या उद्भवते ते प्राकृत आहे."

२. "प्रकृतिः संस्कृतम् ! तत्र भवं तत आगतं वा प्राकृतम्" (हेमचंद्रकृत प्राकृत-व्याकरण)

मराठी अर्थ - "प्रकृती म्हणजे संस्कृत,त्यातून उत्पन्न झालेली किंवा आलेली भाषा म्हणजे प्राकृत."

३. "प्रकृत्या स्वभावेन सिद्धं प्राकृतम्"

मराठी अर्थ – "सामान्य लोकांची नैसर्गिक भाषा प्राकृत आहे. "

४. प्रकृतिः संस्कृतं तत्र भवं प्राकृतमुच्यते (प्राकृतसर्वस्व १।१)

मराठी अर्थ – प्रकृती म्हणजे संस्कृत, त्यातून निर्माण झालेल्या भाषेला प्राकृत म्हणतात.

५. प्रकृतिः संस्कृतं तत्र भवत्वात् प्राकृतं स्मृतम् (प्राकृत-चन्द्रिका)

मराठी अर्थ – प्रकृती म्हणजे संस्कृत, त्यातून निर्माण होणाऱ्या भाषेला प्राकृत म्हणतात.

६. प्राकृतेः संस्कृतायास्तु विकृतिः प्राकृती मता (लक्ष्मीधरकृत षड्भाषाचंद्रिका)

मराठी अर्थ – प्राकृत ही संस्कृतची विकृती आहे.

७.	प्राकृतस्य तु सर्वमेव संस्कृत योनिः (वासुदेवकृत कर्पूरमञ्जरी सञ्जीवनी-टीका)

मराठी अर्थ – संस्कृत ही प्राकृतची जननी आहे.

८.	प्रकृतेः संस्कृतात् आगतं प्राकृतम् (सिंह देवमणि)

मराठी अर्थ – प्राकृत ही संस्कृतमधून आली आहे.

९.	प्रकृतिः संस्कृतं तत्र भवं प्राकृतमुच्यते (मार्कण्डेय कृत प्राकृतसर्वस्व)

मराठी अर्थ – प्रकृती म्हणजे संस्कृत, त्यातून निर्माण होणाऱ्या भाषेला प्राकृत म्हणतात.

१०.	प्राचीन विद्वान व अपभ्रंश साहित्याचे समीक्षक नमिसाधु यांच्या मते, प्राकृत शब्दाचा अर्थ व्याकरण आणि इतर विधींपासून मुक्त असलेल्या लोकांचे नैसर्गिक भाषण आहे. त्यातून निर्माण होणारे भाषण किंवा त्याच भाषेला प्राकृत म्हणतात.(काव्यानुशासन)

वरील व्याख्या पाहता, बहुतांश भाषा अभ्यासक आणि वैय्याकरणींचे मत असे दिसते की, “प्राकृत ही संस्कृतमधून निर्माण झाली आहे. जेव्हा आपण प्राकृत शब्दाच्या या सर्व व्युत्पत्तींचा गांभीर्याने अभ्यास करतो तेव्हा हे स्पष्ट होते की 'प्राकृत' हा शब्द 'प्रकृति' या शब्दापासून निर्माण झाला आहे. आणि 'प्रकृति' अर्थ संस्कृत भाषा आहे. या विचारातून हे स्पष्ट होते की संस्कृत भाषा ही प्राकृत भाषेची जननी आहे. म्हणजेच संस्कृत भाषेपासून निर्माण झालेल्या भाषेला ‘प्राकृत भाषा’ म्हणतात.

**प्राकृत भाषांची मुख्य वैशिष्ट्ये**

१. वेदकालीन प्राकृत (प्राथमिक अवस्था), मध्ययुगीन प्राकृत(पाली, महाराष्ट्री, शौरसेनी इ.)अपभ्रंश भाषा(महाराष्ट्री अपभ्रंश इ.), भारतीय आधुनिक भाषा असे काही प्राकृत भाषांचे प्रकार केले जातात.

२. प्राकृत भाषांचे कालखंडानुसार पूर्वकालीन प्राकृत भाषा (इ.स.पू. ६०० ते इ.स.१०० पर्यंत), मध्यकालीन प्राकृत भाषा(इ.स.१०० ते इ.स.६०० पर्यंत) उत्तरकालीन प्राकृत भाषा(इ.स.६०० ते इ.स.१०००पर्यंत) हे प्रकार पडले जातात.

३. प्राकृत भाषेत संस्कृतासारखे द्विवचन नाही आणि तिच्या वर्णमालेत ऋ, ॠ, लृ, ऐ, औ हे स्वर- स्वन तसेच ष हा व्यंजन-स्वन, विसर्ग (ः) हे नाहीत.

४. संस्कृतमधील स्वरांपैकी, ऋ, लृ, आ आणि औ हे मध्ययुगीन प्राकृत भाषांमध्ये आहेत. ए आणि ओ या ऱ्हस्व स्वनांचे उपयोजन हे या प्राकृत भाषांचे एक विशेष वैशिष्ट्य आहे.

५. प्राकृतचे व्यवच्छेदक लक्षण ‘ऋ’ या स्वराचे परिवर्तन हे आहे.

६. शब्दसंग्रहातला तत्सम, तद्‌भव व इतर हा फरक प्राकृत भाषांपासून सुरू होतो.

७. शिलालेख, ताम्रपट इ. साहित्य वगळून पाहिले, तरी प्राकृत साहित्य अफाट आहे.

८.   प्राकृत शब्दसंग्रहाच्या माहितीसाठी धनपाल ह्यांचा ‘पाइअलच्छी’ व हेमचंद्राचा ‘रयणावलि’ (देशीनाममाला) हे कोश अत्यंत उपयुक्त आहेत. अलिकडच्या काळात हरगोविंददास त्रिकमचंद सेठ ह्यांचा पाइअसद्दमहण्णवो हा इ.स.१९२८ मध्ये प्रसिद्ध झालेला कोश अतिशय महत्त्वाचा आहे.

**मध्य भारतीय प्राकृत भाषा**

प्राचीन भारतात महाराष्ट्री, मागधी, शौरसेनी, पैशाची ह्या प्रमुख प्राकृत भाषा अस्तित्वात होत्या.बौद्ध साहित्य पाली प्राकृत भाषेत, तर जैन साहित्य अर्धमागधी, महाराष्ट्री, शौरसेनी ह्या प्राकृत भाषांमध्ये निर्माण झाले आहे.प्राचीन काळात अनेक वाङ्ययीन ग्रंथ महाराष्ट्री, शौरसेनी, मागधी मध्ये दिसतात.प्राचीन काळातील नाट्य वाङ्मय महाराष्ट्रीमध्ये आढळते.प्राकृत साहित्य अफाट आहे.जैन-बौद्ध परंपरेमध्ये प्राकृत भाषांना अग्रक्रम आणि धर्मभाषांच महत्त्व दिलेले दिसते. प्राकृत भाषांना प्रादेशिक नावे दिलेली आहेत.

• महाराष्ट्री प्राकृत भाषा - .” महाराष्ट्री प्राकृत ही भाषा इ.स.पूर्व ५०० ते इ.स.८७५ पर्यंत वापरात असलेली महत्त्वाची प्राकृत भाषा होती.महाराष्ट्री प्राकृत ही सातवाहन राजवटीची अधिकृत व प्रशासकीय भाषा होती. महाराष्ट्री प्राकृत ही मराठी, कोंकणी ह्या भाषांची पूर्वज मानली जाते.

• मागधी प्राकृत भाषा – मागधी प्राकृत ही मगध राज्याची प्राकृत भाषा होती.ती बंगाली, ओडिया, भोजपुरी, मैथिली, मगही ह्या भाषांची पूर्वज आहे.

• शौरसेनी प्राकृत भाषा - शौरसेनी प्राकृत ही शुरसेन राज्याची भाषा होती. शौरसेनीचा अभिजात संस्कृत भाषेशी जवळचा संबंध आहे.पंजाबी, सिंधी, राजस्थानी, गुजराती, बंजारा ह्या भाषांची शौरसेनी ही पूर्वज आहे.

• पैशाची प्राकृत भाषा - पैशाची प्राकृत ही आज नामशेष झालेली भाषा आहे.ही भाषा वायव्य भारतात बोलली जात असे.गुणाढ्य ह्या लेखकाने लिहिलेला आज उपलब्ध नसलेला 'बृहत्कथा' हा ग्रंथ पैशाची भाषेतच आहे.आज पैशाची भाषेतील खूपच कमी लेख, साहित्य उपलब्ध आहे.

• पाली प्राकृत भाषा – पाली ही थेरवाद बौद्ध ह्यांची धर्मभाषा आहे.स्वतः गौतम बुद्धांनी पाली भाषेतच उपदेश केला होता.बौद्ध धर्मग्रंथ 'त्रिपिटक – विनयपीटक, सुत्तपीटक, अभिधम्मपीटक; नेत्तिपकरण, पेटकोपदेश, सुत्तसंगह, जातक अठ्ठकथा, धम्मपद अठ्ठकथा, थेरगाथा, थेरीगाथा, मिलिंदपन्ह इत्यादी ग्रंथ पाली प्राकृतामध्येच आहेत. आजही पाली भाषेचे अध्ययन मोठ्या प्रमाणावर केले जाते.

• अर्धमागधी प्राकृत भाषा – प्राचीन भारतात उत्तर भारतात बोलली जाणारी अर्धमागधी प्राकृत भाषा होती.जैनांची अर्धमागधी ही धर्मभाषा मानली जाते.जैन धर्मातील महत्त्वाचे आगम ग्रंथ अर्धमागधीच आहेत.जैनांचे चोविसावे तीर्थंकर वर्धमान महावीर अर्धमागधीमधूनच उपदेश करीत असत.

• अशोक प्राकृत भाषा – सम्राट अशोकाच्या शिलालेखांमध्ये वापरलेली प्राकृत भाषा 'अशोक प्राकृत' म्हणून ओळखली जाते.

• कामरूपी प्राकृत भाषा – प्राचीन कामरूप राज्याची प्राकृत भाषा म्हणजे ‘कामरूपी प्राकृत’ होय.ही भाषा मागधी प्राकृतापासून निर्माण झाली आहे.ही भाषा असमिया भाषेची पूर्वज मानली जाते.

• गांधारी  प्राकृत भाषा – प्राचीन गांधार राज्याची भाषा म्हणजे ‘गांधारी प्राकृत भाषा’ होय.वायव्य भारतात बौद्धांच्या शिलालेखात ही भाषा वापरलेली आहे.

**महाराष्ट्री प्राकृतचा विकास**

महाराष्ट्री प्राकृत म्हणजे आद्य मराठी भाषा होय.महाराष्ट्री प्राकृत ही बहुजनांकडून वापरली जाणारी  महाराष्ट्राची प्राचीन व मध्ययुगीन प्राकृत भाषा आहे.महाराष्ट्री प्राकृताला ‘नाट्यमय प्राकृत’ असेही म्हंटले जाते. भारतात उत्तरेकडील माळवा ते दक्षिणेकडील कृष्णा-तुंगभद्रा परिसरापर्यंत महाराष्ट्री प्राकृत बोलली जात असे, हाच प्रदेश महाराष्ट्र म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्री प्राकृत ही महाराष्ट्रात विकसित झालेली प्राकृत भाषा आहे.राजारामशास्त्री भागवत म्हणतात, “महाराष्ट्री प्राकृत संस्कृतपेक्षा जुनी भाषा आहे.”ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर महाराष्ट्री भाषेला वैदिक संस्कृतइतकीच जुनी भाषा मानतात. संस्कृतपासून प्राकृत भाषा निर्माण झाल्या, हे मत ज्ञानकोशकार केतकरांना मान्य नाही. “प्राचीन काळात संस्कृत-प्राकृत महाव्यवस्था नांदत होती” असे काही अभ्यासक मानतात. संस्कृत साहित्याचे व शास्त्राचे अस्तित्त्व महाराष्ट्री प्राकृतामुळे शक्य झाले , असे केतकर म्हणतात. महाराष्ट्री प्राकृत ही भाषा इ.स.पूर्व ५०० ते इ.स.८७५ पर्यंत उपयोजनात असलेली भाषा होती. महाराष्ट्री प्राकृत ही मध्य भारतीय आर्य भाषा मानली

जाते. ‘प्राकृत शब्दमहार्णव’ नावाच्या हिंदी कोशातील प्रस्तावनेमध्ये सं.हरगोविंददास शेठ म्हणतात, “महाराष्ट्री अपभ्रंश से मराठी और कोंकणी भाषाएं उत्पन्न हुई.” संस्कृत भाषेला ‘संस्कृत’ हे नाव मिळण्याआधी महाराष्ट्री भाषा अस्तित्वात होती. महाराष्ट्री हे मरहट्टी भाषेचे नामकरण संस्कृत पंडितांनी केले आहे.सातवाहनकालीन महाराष्ट्री भाषा ही ज्ञानेश्वरकालीन मराठीचेच जुने रूप आहे. शालिवाहनाच्या आरंभी महाराष्ट्रात लोक जी महाराष्ट्री बोलत तीच वाढत जाऊन बाराव्या शतकात ‘मऱ्हाठी’ झाली. कुरुयुद्धाच्या आधीपासून उत्कर्षाला आलेली महाराष्ट्रभाषा इसवीसनाच्या पहिल्या शतकापर्यंत त्याच स्थितीत होती. चवथ्या शतकात अपभ्रंश भाषा सुरु झाली. अपभ्रंशाचा काळ चवथ्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत दिसतो. अपभ्रंश भाषेतूनच आजच्या मराठीचा उद्भव झाला आहे. महाराष्ट्री प्राकृत म्हणजे जुनी मराठी, अपभ्रंश मराठी म्हणजेच मधल्या काळातील मराठी, चक्रधर-ज्ञानेश्वरांची प्रगल्भ मराठी आणि अर्वाचीन मराठी असे मराठी भाषेच्या विकासाचे टप्पे आहेत. प्राचीन महारट्टी, मरहट्टी भाषा, महाराष्ट्री प्राकृत, अपभ्रंश मराठी आणि आजची मराठी असा मराठीचा सलग व सातत्यपूर्ण प्रवास दिसून येतो. महाराष्ट्री प्राकृत, महाराष्ट्री अपभ्रंश आणि मराठी या तीन वेगवेगळ्या भाषा नसून ती एकाच भाषेची कालक्रमिक तीन रूपे आहेत.भारतीय दाक्षिणात्य तेलुगु, कन्नड ह्या द्रविड भाषावर देखील महाराष्ट्री प्राकृताचा प्रभाव दिसतो.

**महाराष्ट्री प्राकृताची वैशिष्ट्ये**

१.महाराष्ट्री प्राकृत ही एक प्राचीन भाषा आहे, जी संस्कृत भाषेच्या तुलनेत अधिक सोपी आणि लोकांमध्ये प्रचलित होती.

२.महाराष्ट्री प्राकृत ही इसवी सन पूर्व दुसऱ्या शतकात महाराष्ट्र आणि आसपासच्या प्रदेशात बोलली जात होती.

३.मराठी भाषेचा विकास महाराष्ट्री प्राकृतमधून झाला आहे.

४.महाराष्ट्री प्राकृत या भाषेत 'गाथासप्तशती' सारखे महत्त्वाचे साहित्य लिहिले गेले आहे.

५.महाराष्ट्री प्राकृतचे व्याकरण संस्कृतपेक्षा सोपे आहे.


६.महाराष्ट्री प्राकृत या भाषेचा उपयोग प्राचीन नाटकांमध्ये, जैन आणि बौद्ध साहित्यात तसेच इतर प्राकृत साहित्यात झाला आहे.

७.महाराष्ट्री प्राकृत ही संस्कृत भाषेच्या जवळची आहे, पण ती संस्कृत नाही.

८.महाराष्ट्री प्राकृताचा उदय वैदिक संस्कृतबरोबरच झाला आहे.

९.महाराष्ट्री प्राकृत ही सातवाहन राजवंशाची अधिकृत भाषा होती.

१०. महाराष्ट्री प्राकृत ही सर्व प्राकृत भाषांमध्ये सर्वात प्रमाणित भाषा आहे.



# महाराष्ट्री प्राकृतातील ग्रंथ संपदा

बौद्धग्रंथ विनयपीटक, दीपवंश, महावंश या ग्रंथात महाराष्ट्राचे उल्लेख मिळतात.रामायण, महाभारत, गुणाढ्याची बड्डकहा(बृहत्कथा) 'गाथासप्तशती' (गाहा सत्तसई), वररुचीचा 'प्राकृत प्रकाश' इत्यादी ग्रंथ महाराष्ट्री प्राकृतातील आहेत. कालिदासाचे 'शाकुंतल', शुद्रकाचे 'मृच्छकटिक' राजशेखराचे 'कर्पूरमंजरी' इत्यादी नाटकातील पात्रांच्या तोंडी महाराष्ट्री प्राकृतातील संवाद आहेत.संस्कृत नाटकांमधील गीतांमध्ये महाराष्ट्री प्राकृत भाषा उपयोजलेली आढळते.इ.स.दहाव्या शतकात राजशेखर ह्याने महाराष्ट्री प्राकृतात 'कर्पूरमंजरी' हे नाटक लिहिले, महाराष्ट्री प्राकृतात प्राकृत नाटकाला 'सट्टक'असे म्हणतात. शुद्रकाचे 'मृच्छकटिक' ह्या नाटकात महाराष्ट्री प्राकृताचा सर्वाधिक प्रयोग केलेला आहे.महाकवी बाण ह्याने 'हर्षचरित' ह्या काव्यात महाराष्ट्री प्राकृताचा उल्लेख केला आहे. हालसातवाहनाचा 'गाहा सत्तसई', जयवल्लभाचा 'वज्जालग्ग', प्रवरसेन वाकाटकाचे 'सेतुबंध' (रावणवहो), वाक्पतिराजाचे 'गऊडवहो' ही महाकाव्ये महाराष्ट्री प्राकृतातील अमुल्य ग्रंथ आहेत. प्रवरसेन वाकाटकाने इ.स.चौथ्या-पाचव्या शतकात 'सेतुबंध' (रावणवहो) ह्या काव्याची निर्मिती केली, हे काव्य महाराष्ट्री प्राकृतातील सर्वोत्कृष्ट काव्य मानले जाते. वाक्पतीराजाचे 'गउडवहो'(गौडवध) हे काव्य इ.स.सातवे-आठवे शतक ह्या काळात निर्माण झाले, ह्या काव्यात १२०० गाथा आहेत.महाराष्ट्री प्राकृतात जैन लेखक-कवींनी पुराण, चरित्र, प्रबंध-काव्य इ.विपुल साहित्यनिर्मिती केली आहे.दंडीकृत

‘काव्यादर्श’(इ.स.सहावे शतक) ह्या ग्रंथात “महाराष्ट्रीयां भाषा प्रकृष्टं.प्राकृत विदुः सागरः सुक्तिरत्नानां सेतुबंधादि यन्मयम!” असा महाराष्ट्री प्राकृताचा उल्लेख मिळतो. ह्याचा अर्थ “महाराष्ट्र प्रदेशातील प्राकृत सर्वोत्कृष्ट आहे, कारण त्यात सुक्त आणि सेतुबंधादि काव्याची निर्मिती झाली आहे.” असा आहे. पादलिप्त ह्या जैन कवीने ‘तरंगवईकहा’ हे महाराष्ट्री प्राकृतातील आद्य महाकाव्य लिहिले, परंतु ते आज उपलब्ध नाही.महाराष्ट्री प्राकृतातील आज उपलब्ध असलेला आद्य ग्रंथ ‘गाथासप्तशती’ (गाहा सत्तसई) हा सुमारे २००० वर्षापूर्वी हाल सातवाहनाने निर्माण केला. ‘गाथासप्तशती’ (गाहा सत्तसई) हे महाराष्ट्राचे आद्य लोकसाहित्य आहे. इ.स.८०० च्या सुमाराला लिहिला गेलेला हरिभद्रसूरीचा ‘समराइच्च कहा’(समरादित्याची कथा) हा महाराष्ट्री प्राकृतातील निवेदनतंत्रात ‘जादुई वास्तववाद’ वापरलेला कादंबरीसदृश्य ग्रंथ अतिशय मौल्यवान आहे.प्रवरसेन वाकाटकाचे ‘सेतुबंध’, भद्रबाहुचे ‘आवश्यक निर्युक्ती’, विमलसूरीचे ‘पउमचरियम’ इत्यादी प्राचीन ग्रंथ महाराष्ट्री प्राकृतातील आहेत. विमलसूरीचे ‘पउमचरियम’ हे रामायणाचे जुने ज्ञात जैन रूप महाराष्ट्री प्राकृतातच आहे.संस्कृत नाटककार कालिदास, हर्ष, विशाखदत्त, भवभूति, राजशेखर यांच्या नाटकामध्ये पद्यभाग महाराष्ट्रीत दिसतो.कालिदासाच्या नाटकात निम्न वर्गातील गौण पत्रे संवादात महाराष्ट्री प्राकृत वापरतात.संघदास आणि धर्मसेन या दोन जैनमुनींनी ‘वसुदेवहिंडी’ हा ग्रंथ महाराष्ट्री प्राकृतात लिहिला, तो पहिला प्रवासवर्णनपर ग्रंथ आहे.जिनप्रभसूरीकृत ‘विविधतीर्थकल्प’, धर्मदासगणीकृत ‘उवएसमाला’ हे ग्रंथ महाराष्ट्री प्राकृतातच आहेत.मार्कंडेय ह्यांच्या ‘प्राकृतसर्वस्व’ ह्या ग्रंथात सोळा प्राकृत भाषांचा विचार करण्यात आला आहे, तर भरतमुनींच्या

‘नाट्यशास्त्र’ मध्ये प्राकृत भाषेची वैशिष्ट्ये व रंगभूमीवरील उपयोग सांगितला आहे. प्राचीन संस्कृत नाटकांमध्ये महाराष्ट्री प्राकृत बोलणारी पत्रे दिसतात.प्राचीन नाटकांचे परिशीलन केले असता असे जाणवते की, महाराष्ट्री प्राकृताशिवाय निर्भेळ संस्कृत नाटक संभवत नाही, परंतु निर्भेळ प्राकृत नाटक सापडू शकते.

**महाराष्ट्री प्राकृत आणि व्याकरण ग्रंथ**

चंडकृत ‘प्राकृत लक्षण’, हेमचंद्रकृत ‘प्राकृत व्याकरण’, वररुचीकृत ‘प्राकृत प्रकाश’ हे महाराष्ट्री प्राकृत भाषेचे व्याकरण ग्रंथ आहेत.त्रिविक्रम, शुभचेंद्र ह्यांनी महाराष्ट्री प्राकृत भाषेचे देखील प्राकृत व्याकरण लिहिले आहे. लंकेश्वरकृत ‘प्राकृत कामधेनु’, वत्सराजकृत ‘प्राकृत संजीवनी’, पुरुषोत्तमकृत ‘प्राकृतानुशासन’, रामशर्माकृत ‘प्राकृत कल्पतरू’, मार्कण्डेयकृत ‘प्राकृतसर्वस्व’ ह्यांनी देखील प्राकृत भाषांचे व्याकरण लिहिले आहे.वररुचीचे व्याकरण पाली किंवा अर्धमागधी या भाषांच्या उदयापूर्वीचे आहे. वैय्याकरणी वररुची असे म्हणतो की, “महाराष्ट्री प्राकृत ही श्रेष्ठ आणि मानदंडात्मक भाषा असून, तिचे स्थान संस्कृतच्या बरोबरीचे आहे.” वैय्याकरणी वररुचीने ‘प्राकृत प्रकाश’ ह्या ग्रंथात महाराष्ट्री प्राकृतसाठी चार अध्याय, तर इतर प्राकृत भाषांसाठी एकच अध्याय लिहिला आहे. वररुचीच्या ‘प्राकृत प्रकाश’ ह्या व्याकरण ग्रंथात व्याकरणाचे अगदी शेवटचे सूत्र आहे ‘शेष महाराष्ट्रीवत’ , ह्या सूत्राद्वारे तो महाराष्ट्री प्राकृताचे सर्वोच्च स्थान अधोरेखित करतो.

**महाराष्ट्री प्राकृतातील शिलालेख**

सातवाहन काळात आजचा महाराष्ट्र हा महारठी प्रदेश होता.महारठ्ठी भाषा बोलणारे ;लोक ज्या प्रदेशात राहतात तो प्रदेश म्हणजे ‘महारठी प्रदेश’ होय.सातवाहन कालखंडात महाराष्ट्री प्राकृत ही प्रशासकीय आणि राजभाषा होती. पाले जैन लेणी ही महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात आहेत, ही लेणी उकसण गावाजवळ पाले नावाच्या ठिकाणी आहेत. पाले जैन लेण्यांत इ.स.पूर्व पहिल्या शतकातील महाराष्ट्री प्राकृतातील सर्वात जुना ज्ञात शिलालेख आढळतो, ह्या शिलालेखात अशोकपूर्वकालीन ब्राह्मी लिपीचा वापर दिसतो. हा शिलालेख खालीलप्रमाणे

**“नमो अरहंतानं कातुनं भदंत इंदरखितेनं लेणं कारापितमं पोढि च सह काहीसह.”**

ह्याचा अर्थ “अरहंतांना नमस्कार! भदंत इंदरखित ह्याने (बहुधा इतरांबरोबर)लेणे व कुंडदान दिले.”

महाराष्ट्रातील दुसरा जुना ज्ञात शिलालेख नालासोपारा(सुप्पारक किंवा शूर्पारक) येथे सुमारे २५०० वर्ष जुन्या बौद्ध स्तुपाजवळ सम्राट अशोकाच्या राजाज्ञेपैकी ८ व ९ क्रमांकाचे भग्न शिलालेख सापडले आहेत, जे महाराष्ट्री प्राकृत भाषेत ब्राह्मी लिपीत आहेत.ह्या शिलालेखात सम्राट अशोकाने स्वतःला ‘देवनम्पिया’ (देवांचा प्रिय) आणि ‘पियादसी’ (सुंदर) असे संबोधले आहे.

नाणेघाट हा आजच्या जुन्नर म्हणजे तत्कालीन जीर्णनगर व कोकण ह्यांना जोडणारा व्यापारी मार्ग होता.ह्या नाणेघाटमध्ये सातवाहन शासक गौतमीपुत्र सातकर्णीची राणी आणि अंगियकुलवर्धन वंशातील त्रनकयिरनामक महारठीची

कन्या नागणिका हिने निर्माण केलेला २२३१ वर्षापूर्वीचा शिलालेख महाराष्ट्री प्राकृतात आहे.शिलालेखाच्या अक्षरवटिकेवरून ह्या शिलालेखाचा काळ योहान ब्यूलर, मिराशी यांसारख्या पुराभिलेखविद्यावंतांच्या मते साधारणतः इ.स.पू. दुसरे-पहिले शतक असावा.सध्या अस्तित्वात असलेला शिलालेख वीस ओळींचा असून डाव्या भिंतीवर शिलालेखाच्या दहा ओळी कोरल्या असून उर्वरित दहा ओळी उजव्या भिंतीवर कोरल्या आहेत. नाणेघाट शिलालेखामध्ये तिने केलेल्या वैदिक यज्ञाचे, दानांचे वर्णन आहे.ह्या शिलालेखात तत्कालीन सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक परिस्थितीचे वर्णन मिळते.हा शिलालेख महाराष्ट्री प्राकृतात असून ब्राह्मी लिपीत आहे.नाणेघाटातील राणी नागणिकेचा शिलालेख आणि सातवाहन राजवंशाचे प्रतिमागृह यांना प्राचीन इतिहासाचे एक विश्वसनीय साधन म्हणून अनन्यसाधारण महत्त्व आहे. “महारठीनो अंगीय कुल वधनस सगरगिरीवलयाय पथविय पथम विरस वस य महतो मह.” असा उल्लेख शिलालेखात आहे, ज्याचा अर्थ “महारठी अंगीय कुळातील गिरीसमुद्र वलयांकित पृथ्वीवरील वीरश्रेष्ठ असा पुरुष.” असा होतो.ह्या शिवाय कार्ला लेणी, नाशिक त्रिरश्मी लेणी इत्यादी ठिकाणी महाराष्ट्री प्राकृतातील शिलालेख ब्राह्मी लिपीत आढळतात. कार्ला लेणी चैत्यगृहासमोरील सिंहस्तंभावर “महारठीस गोतिपुत्रस अगिमित्रणकस सिहय भी दानं.” असा उल्लेख आहे, ज्याचा अर्थ “गोटीचा मुलगा महारठी अग्निमित्र याने सिंहस्तंभाची देणगी दिली.” असा आहे. कार्ल्यांच्या या लेण्यांमध्ये महाराष्ट्री प्राकृतातील ब्राह्मी लिपीतले ३५ लेख दिसून आले आहेत. यातील बहुतेक दानधर्म विषयक आहेत.चैत्यगृहाच्या सज्ज्यात या लेण्याच्या करवित्याचा लेख आहे. ‘वेजयंतितो सेठीना भूतपालेन सेलघरम परिनिठापितम् जंबुदिपम्ही उतमम्’ ह्याचा अर्थ वैजयंतीचा श्रेष्ठी भूतपाल ह्याने तयार केलेले हे लेणे जंबुद्वीपात उत्कृष्ट आहे, असा होतो.वैजयंती म्हणजे आजचे कर्नाटकमधील उत्तर कन्नड जिल्ह्यातील बनवासी होय.

## निष्कर्ष

१. **महाराष्ट्री प्राकृत ही एक प्राचीन भारतीय प्राकृत भाषा आहे.**

२. **महाराष्ट्री प्राकृत ही इ.स.पूर्व ५०० ते इ.स.८७५ पर्यंत महाराष्ट्र आणि आसपासच्या प्रदेशात बोलली जात होती.**

३. **मराठी भाषेचा विकास महाराष्ट्री प्राकृतमधून झाला आहे.**

४. **महाराष्ट्री प्राकृत समृद्ध वाङ्मय उदा. काव्य, नाटक, भाष्य, व्याकरण ग्रंथ निर्माण झाले आहेत.**

५. **महाराष्ट्री प्राकृताचा उदय वैदिक संस्कृतबरोबरच झाला आहे.**

६. **महाराष्ट्री प्राकृत ही सर्व मध्य भारतीय प्राकृत भाषांमध्ये सर्वात प्रमाणित भाषा आहे.**

७. **प्राचीन भारतात मध्य भारतीय भाषांमध्ये महाराष्ट्री प्राकृत ही श्रेष्ठ व मानदंडात्मक भाषा होती.**

## संदर्भ ग्रंथसूची


१. जैन जगदीशचंद्र, प्राकृत साहित्य का इतिहास, वाराणसी, १९६१.

२. डॉ.शास्त्री नेमीचंद, प्राकृत भाषा एवं साहित्य का आलोचानात्मक इतिहास, तर पब्लिकेशन, वाराणसी, १९६६.

३. कालेलकर, ना. गो., 'प्राकृत भाषा', नोंद लेख, मराठी विश्वकोश.

४. देशपांडे माधव, 'संस्कृत-प्राकृत भाषिक संघर्ष', नोंद लेख, मराठी विश्वकोश.

५. Winternitz M. A. History of Indian Literature, Vol, 2, Calcutta, 1933.

# महाराष्ट्री प्राकृत भाषा



पाले जैन लेणीमधील महाराष्ट्री प्राकृतातील आद्य शिलालेख

# अपभ्रंश भाषा : व्युत्पत्ती, स्थिती आणि गती

प्राचीन काळातील प्राकृत भाषांपासून अपभ्रंश भाषा अस्तित्वात आली.इंडो-आर्यन प्राकृत भाषा अपभ्रंश बोलींमध्ये रूपांतरित झाल्या. दंडीच्या मते अभीर व इतर सामान्य लोकांची भाषा म्हणजे 'अपभ्रंश भाषा' होय.भरतमूनींनी 'नाट्यशास्त्रा'त सबर, अभीर, चांडाळ लोकांच्या बोलीभाषांना भास(प्राकृत), विभास(भ्रष्ट)अश्या संज्ञा वापरल्या आहेत, अशा सर्व भाषांना 'अपभ्रंश भाषा' म्हटले आहे. महाराष्ट्री अपभ्रंश भाषेचे अस्तित्त्व इ.स. ५०० ते इ.स.१००० ह्या कालखंडात होते.मराठी भाषेच्या विकासाचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे महाराष्ट्री अपभ्रंश होय.मराठी भाषेवर महाराष्ट्री अपभ्रंशाचा प्रभाव आहे. मराठी भाषा महाराष्ट्री अपभ्रंशातूनच निर्माण झाली.अपभ्रंश भाषा ही प्राकृत व आधुनिक भारतीय भाषांमधील मधली अवस्था आहे.अपभ्रंश भाषांमधील कवींनी स्वतःच्या भाषेला 'भाषा', 'देसी भाषा', 'गोमेल्ल भाषा'(ग्रामीण भाषा) असे म्हटले आहे. अपभ्रंश भाषांना अवब्भंस, अवहंस, अवहट्ठ(अपभ्रष्ट), अवहट, देखील नावे दिसतात. मैथिली महाकावी विद्यापती म्हणतो की, "देशी भाषा सर्वांसाठी मधुर असतात, त्यानाच ' अवहट्ठ' म्हणतात.(देसिल बयाना सबजन मिट्ठा ! ते तैसन जम्पन्नों अवहट्ठा) अपभ्रंश शब्दाचा अर्थ तिरस्कारसूचक दिसतो. अपभ्रंश शब्दाचा च्युत, स्खलित, भ्रष्ट, विकृत असा अर्थ होतो.महाराष्ट्री अपभ्रंशामध्ये धार्मिक व लौकिक साहित्य निर्माण झाली.आधुनिक भारतीय भाषाच्या उदयापूर्वी भारतात 'अपभंश भाषा' म्हणून ओळखल्या जातात.संस्कृत वैय्याकरणी पतंजली 'अपभ्रंश' हा शब्द

वापरलेला आहे. अपभ्रंश हा शब्द शिष्ट-भाषेशी न जुळणाऱ्या अशुद्ध भाषिकरूपांना उद्देशून पतंजलीनेही वापरला आहे ('पूर्वनिपातेऽपभ्रंशो रक्ष्य:'). 'शास्त्रेषु संस्कृतादन्यत्' अशी दंडी त्याची व्याख्या करतो, तर वाग्भटालंकारकर्ता वाग्भट (बारावे शतक) 'प्रादेशीय शुद्ध रूप' असे त्याचे वर्णन करतो (अपभ्रंशस्तु यच्छुद्धं तत्तद्देशेषु भाषितम्). झ्यूल ब्लॉक ह्याच्या मते अपभ्रंश ही एक भाषिक अवस्था नसून, नव-आर्यभाषांच्या प्रारंभी वापरण्यात येणारी, प्राकृताचे अनुकरण करणारी, कधी संस्कृत रुपांनाही वाव देणारी एक लेखनशैली आहे.अपभ्रंश भाषा ह्या मध्ययुगीन काळातील 'संक्रमण बोली' मानल्या जातात.अपभ्रंश ह्या शब्दाचा अर्थ भ्रष्ट किंवा व्याकरण नसलेली भाषा होय. इ.स. १००० ते इ.स. १२०० च्या दरम्यान आढळून येणाऱ्या साहित्यिक भाषेला 'अपभ्रंश भाषा' म्हणतात, असे काही अभ्यासकांचे मत आहे.

**अपभ्रंश भाषांची मुख्य वैशिष्ट्ये**

१.अपभ्रंश भाषांची ध्वनिपद्धती प्राकृत भाषांसारखीच आढळते.
२.अपभ्रंश भाषेमध्ये प्राकृत भाषेतील व्याकरणाचे नियम थोडे सैल झाले आणि अनेक बदल
झाले.
३.अपभ्रंश भाषेचे व्याकरण प्राकृत भाषेपेक्षा थोडे सोपे होते.
४.अपभ्रंश भाषेतील उच्चार प्राकृत भाषेपेक्षा थोडे वेगळे होते.
५.संस्कृत आणि प्राकृत भाषेतील अनेक शब्द आणि रूपे बदलून अपभ्रंश भाषेत वापरली जाऊ
लागली.
६.अपभ्रंश भाषा ही त्या-त्या भागातील स्थानिक बोलीभाषांशी जुळणारी होती.
७.भारतात वेगवेगळया प्रदेशात अपभ्रंश भाषेचे वेगवेगळे रूप पाहायला मिळते.

८.अपभ्रंश भाषांचे व्राचड आणि नागर असे भेद केले जातात.
९.अपभ्रंश भाषांपासून आजच्या देशी भाषा उद्भवल्या आहेत.
१०.अपभ्रंश भाषांचे अस्तित्त्व इ.स. ५०० ते इ.स.१००० ह्या कालखंडात होते.
११.अपभ्रंश भाषा ह्या बहुजनांच्या भाषा मानल्या जातात.
१२.अपभ्रंश भाषा ह्या मध्ययुगीन काळातील 'संक्रमण बोली' मानल्या जातात.
१३.जैन आणि बौद्ध धर्माच्या साहित्यातही अपभ्रंश भाषेचा वापर झाला.
१४.मराठी भाषेवर अपभ्रंश भाषेचा मोठा प्रभाव आहे.
१५.मराठी भाषेच्या विकासात अपभ्रंश भाषेने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.
१६.मराठी भाषेतील अनेक शब्द आणि व्याकरण अपभ्रंशातून आलेले आहे.

**अपभ्रंश भाषांचे प्रकार**

साधारणपणे अपभ्रंश भाषांचे व्राचड आणि नागर असे भेद केले जातात. डॉ.भोलानाथ तिवारी ह्यांनी अपभ्रंश भाषांचे सात प्रकार सांगितले आहेत.ते खालीलप्रमाणे;

**१. महाराष्ट्री अपभ्रंश**

**२. शौरसेनी अपभ्रंश**

**३. अर्धमागधी अपभ्रंश**

**४. मागधी अपभ्रंश**

**५. खस अपभ्रंश**

**६, पैशाची अपभ्रंश**

**७ व्राचड अपभ्रंश**

# <u>अपभ्रंश भाषेची व्युत्पत्ती</u>

इंडो-युरोपीय भाषा

↓

इंडो-इराणी भाषा

↓

इंडो-आर्यन भाषा

↓

वैदिक संस्कृत भाषा

↓

संस्कृत भाषा

↓

प्राकृत भाषा

↓

अपभ्रंश भाषा

**अपभ्रंश भाषांतील साहित्य**

इसवी सनाच्या सहाव्या शतकापर्यंत अपभ्रंश भाषांना 'वाङ्मयीन भाषा' म्हणून मान्यता मिळाली.अपभ्रंशामध्ये धार्मिक, लौकिक साहित्य निर्माण झाले आहे.मध्ययुगीन काळातील जैन साहित्य प्रामुख्याने अपभ्रंश भाषेत दिसते.संस्कृत साहित्यशास्त्रकार भामह काव्याचे वर्गीकरण संस्कृत काव्य, प्राकृत काव्य, अपभ्रंश काव्य असे करतो.अपभ्रंश साहित्य इ.स.बारावे ते इ.स.सोळावे शतकादरम्यान लिहिले गेले आहे.जैनांनी प्रामुख्याने अपभ्रंश भाषांमध्ये साहित्य निर्मिती केली.अपभ्रंश भाषा इसवी सनाच्या तेराव्या शतकांपर्यंत वापरात होत्या.मध्ययुगीन काळातील जैन साहित्य अपभ्रंशामध्ये लिहिले गेले. प्राकृतमध्ये जसे 'गाथा', 'गाथाबंध' हे लोकप्रिय छंद आहेत, तसेच अपभ्रंशामध्ये 'दोहा', 'दोहाबंध' हे लोकप्रिय छंद आहेत.कामरूपातील सारा, तिलोपा, कान्हा, धारची देवसेना, मान्यखेडचा पुष्पदंत, धनपाल, मुनी रामसिंह, हेमचंद्र, ग्वाल्हेरचा रायघू इत्यादी लेखकांनी अपभ्रंशामध्ये लेखन केले आहे.साहित्यातील अपभ्रंश भाषेचे पहिले उपयोजन कालिदासाच्या 'विक्रमोर्वशीय' ह्या नाटकात दिसते, ज्या नाटकात पुरूरवा - जंगली प्राण्यांच्या संवादात अपभ्रंश भाषा वापरली आहे.भगवतीदासकृत ‘कलेहा चरिउ’ (चंद्रलेखा) ही अपभ्रंश भाषेतील शेवटची साहित्य रचना विक्रम संवत १७०० मध्ये निर्माण झाली. मध्ययुगीन काळात ‘रासो’ काव्य देखील अपभ्रंशामध्ये लिहिले गेले.मुलतानच्या अब्दुल रहमान ह्याने इ.स.१००० मध्ये 'संदेशरासक' नावाचे प्रणय काव्य लिहिले, हे २२३ कवडकांचे दूतकाव्य, विरहकाव्य मानले जाते.'लीलावती' हा बौद्ध पंडित नागार्जुन ह्याचा अपभ्रंश भाषेतील ग्रंथ आहे.

ठक्कुर फेरू (इ.स.१३ वे - १४ वे शतक) ह्याने गणितसार कौमुदी, द्रव्यपरीक्षा, ज्योतिषसार, वास्तूसार, रत्नपरीक्षा हे विविध ग्रंथ अपभ्रंशात लिहिले.‘कान्हडदे प्रबंध’ हा ग्रंथ पद्मनाभ ह्याने इ.स.१४५५ मध्ये अपभ्रंशात लिहिला आहे, ह्या ग्रंथात जालोरचा चाहमान शासक रावल कान्हडदेव ह्याची कहाणी आहे.सहरपा, कण्हपा ह्यांसारख्या बौद्ध सिद्धांनी देखील अपभ्रंशामध्ये 'दोहाकोशा' चे लेखन केले आहे. अपभ्रंश भाषांतील गद्य उतारे 'उद्योतनसूरी' च्या 'कुवलयमाला' (इ.स.सातवे शतक) ह्या ग्रंथात दिसतात. हेमचंद्र (इ.स.बारावे शतक) ह्यांनी 'सिद्ध-हेम-शब्दानुशासन' हे प्राकृत व अपभ्रंश भाषांचे व्याकरण लिहिले आहे, ह्या व्याकरण ग्रंथांच्या आठव्या अध्यायात चौथ्या पादाची ३२९ ते ४४६ सूत्रे अपभ्रंश भाषांची लक्षणे दिलेली आहेत. संस्कृतच्या वैय्याकरणी असलेल्या पाणिनीसारखे कार्य हेमचंद्राने अपभ्रंशासाठी केले.

**अपभ्रंश भाषांमधील साहित्याचे वर्गीकरण**

अपभ्रंश भाषांमधील साहित्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल;

१.पुराण साहित्य - महाकवी पुष्पदंत ह्याचे 'महापुराण', शालिभद्रसुरी ह्यांचे 'बाहुबलीरास', कवी स्वयंभू ह्याचे'पउमचरिउ' (पद्मचरित्र/रामकाव्य), इत्यादी ग्रंथ अपभ्रंश पुराण साहित्यात समाविष्ट होतात. पुष्पदंताच्या 'महापुराणा'त राम-कृष्ण ह्यांचा कथा आहेत.

२.चरित्र-काव्य - महाकवी पुष्पदंत ह्याचे 'णायकुमारचरिउ'(नागकुमार चरित्र), 'जसहरचरिउ' (यशोधर चरित्र) इत्यादी ग्रंथ अपभ्रंश चरित्र-काव्य साहित्यात समाविष्ट होतात.

३.कथाकाव्य - कवी धनपाल ह्याचीभविस्ययत्तकहा (भविष्यदत्त कथा) - ही श्रुतपंचमीला सांगितली जाणारी प्राचीन लोककथा अपभ्रंश भाषेत आहे. 'कथाकोश' हा जैन वाङ्मयातील उपदेशपर धार्मिक ग्रंथ श्रीचंद्र ह्या लेखकाने अपभ्रंशात लिहिला.

४. नीतिपर साहित्य - ज्यात जीवन आदर्शांचे वर्णन असते, अशा अपभ्रंशातील मुक्तक कृती ह्या प्रकारात समाविष्ट आहेत. जोइंदु(इ.स.६०० ते इ.स.१०००) चे 'परमप्पयासु' आणि 'योगसार' हे ग्रंथ ; रामसिंहाचा 'पाहुडदोहा' इत्यादी ग्रंथ अपभ्रंश नीतिपर साहित्यात समाविष्ट होतात.

**अपभ्रंशातील महत्त्वाचे साहित्य व साहित्यिक**

- ❖ **महाकवी चतुर्मुख** (इ.स. ६०० ते ८००) पउमचरिउ, हरिवंश, पंचमी चरित, ह्या महाकाव्याचा कवी चतुर्मुख आहे.पध्ददिया किंवा पध्दरिया ह्या बंधाचा प्रवर्तक महाकवी चतुर्मुख आहे.वृत्तरचना प्रभुत्त्व हे त्याच्या काव्याचे विशेष आहे.
- ❖ **महाकवी स्वयंभूदेव** (इ.स.आठवे शतक) महाकवी स्वयंभूदेव ह्याचे तीन ग्रंथ आज उपलब्ध आहेत :(१) पउमचरिउ (पद्मचरित), (२) रिठ्ठणेमिचरिउ (अरिष्टनेमिचरित अथवा हरिवंशपुराण) व (३) स्वयंभूछंद. पउमचरिउ हे रामकाव्य आहे.
- ❖ **महाकवी पुष्यदंत** (इ.स.आठवे शतक) पुष्पदंत हे अपभ्रंश भाषेतील एक महाकवी मानले जातात, ज्यांचे तीन ग्रंथ महापुराण,

णायकुमारचरिउ(नागकुमारचरित्र), जसहरचरिउ (यशोधरचरित्र) प्रसिद्ध आहेत.

- **कवी धनपाल** (इ.स.दहावे शतक) कवी धनपाल ह्यांनी भविस्ययत्तकहा (भविष्यदत्त कथा) हा ग्रंथ लिहिला आहे, ही श्रुतपंचमीला सांगितली जाणारी प्राचीन लोककथा होय.
- **कनकामरमुनी** (इ.स.अकरावे शतक) कनकामरमुनी हे जैन आचार्य होते ज्यांनी 'करकंडुचरिउ' नावाची चरित्रकाव्य लिहिले, हे राजा करकंडुच्या जीवनावर आधारित आहे आणि जैन धर्माच्या तत्त्वांचे चित्रण करते.
- **वैय्याकरणी हेमचंद्र** (इ.स. १०८८ ते इ.स. ११७२) हेमचंद्र ह्यांनी 'सिद्ध-हेम-शब्दानुशासन' हे प्राकृत व अपभ्रंश भाषांचे व्याकरण लिहिले आहे, ह्या व्याकरण ग्रंथांच्या आठव्या अध्यायात चौथ्या पादाची ३२९ ते ४४६ सूत्रे अपभ्रंश भाषांची लक्षणे दिलेली आहेत. संस्कृतच्या वैय्याकरणी असलेल्या पाणिनीसारखे कार्य हेमचंद्राने अपभ्रंशासाठी केले.

**निष्कर्ष**

**१.अपभ्रंश भाषांपासून आजच्या देशी भाषा उद्भवल्या आहेत.**

**२.अपभ्रंश भाषा ह्या मध्ययुगीन काळातील 'संक्रमण बोली' मानल्या जातात.**

**३.अपभ्रंश भाषांमधील साहित्याचे वर्गीकरण साधारणतः पुराण साहित्य, चरित्र-काव्य,**

**कथाकाव्य, नीतिपर साहित्य असे केले जाते.**

**४.अपभ्रंश साहित्य इ.स.बारावे ते इ.स.सोळावे शतकादरम्यान लिहिले गेले आहे.**

**५.अपभ्रंश भाषा ही त्या-त्या भागातील स्थानिक बोलीभाषांशी जुळणारी होती.**

**६.मराठी भाषेवर अपभ्रंश भाषेचा मोठा प्रभाव आहे.**

**७.मराठी भाषेवर महाराष्ट्री अपभ्रंशाचा प्रभाव आहे. मराठी भाषा महाराष्ट्री अपभ्रंशातूनच निर्माण झाली.**

संदर्भ ग्रंथसूची

१.बापट के.वा.(अनुवादक), हेमचंद्रकृत अपभ्रंश व्याकरण, मराठी संशोधन मंडळ, मुंबई, १९६२.

२.कालेलकर ना.गो., अपभ्रंश भाषा, नोंद लेख, मराठी विश्वकोश.

३.Apabhramsa language, नोंद लेख, ब्रिटानिका एनसायक्लोपीडिया

# अभिजात मराठी भाषा : एक सिंहावलोकन

गुरुवार, दिनांक ०३ ऑक्टोबर २०२४ या दिवशी घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर भारत सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषा म्हणजेच शास्त्रीय भाषेचा दर्जा दिला आणि मराठी भाषेला अभिजाततेची राजमान्यता प्राप्त झाली.मराठी भाषेची प्राचीनता, मौलिकता, सलगता, समृद्ध वाड्मयीन परंपरा इत्यादी निकषांच्या आधारे मराठी अभिजात झाली.

प्राचीन महारट्टी, मरहट्टी भाषा, महाराष्ट्री प्राकृत, अपभ्रंश मराठी आणि आजची मराठी असा मराठीचा सलग व सातत्यपूर्ण प्रवास दिसून येतो. महाराष्ट्री प्राकृत, महाराष्ट्री अपभ्रंश आणि मराठी या तीन वेगवेगळ्या भाषा नसून ती एकाच भाषेची कालक्रमिक तीन रूपे आहेत. महाराष्ट्री प्राकृतालाच 'जैन महाराष्ट्री' म्हणूनही ओळखले जाते. कारण जैन धर्मियांनी मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्री प्राकृतात साहित्यनिर्मिती केली आहे. मराठीचे वय २००० वर्षांपेक्षा जास्त असल्याचे ८० ग्रांथिक आणि हस्तलिखित पुरावे आज भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेत उपलब्ध आहेत. मराठीचा आज उपलब्ध असलेला आद्य ग्रंथ 'गाथासप्तशती' (गाहा सत्तसई) हा सुमारे २००० वर्षापूर्वी हाल सातवाहनाने निर्माण केला. 'गाथासप्तशती' (गाहा सत्तसई) हे महाराष्ट्राचे आद्य लोकसाहित्य आहे. आद्य मराठी भाषेतील पहिला शिलालेख नाणेघाट येथे असून, तो ब्राम्ही लिपीत सुमारे २२०० वर्षापूर्वी कोरलेला आहे.मराठी भाषेच्या प्राचीनतेचे असे अनेक पुरावे शेकडो शिलालेख, ताम्रपट, पोथ्या आणि हस्तलिखित ग्रांथिक स्वरुपात आज उपलब्ध आहेत.

जगातील भाषातज्ज्ञ विश्वातील २००० भाषा १२ गटात विभागतात. मराठी ही भारोपिय (इंडो-युरोपीय) भाषाकुळातील भाषा मानली जाते. भारोपिय भाषा १३ उपगटात विभक्त केल्या जातात.ह्यातील आर्य-भारतीय ह्या मुख्य भाषासमूहात (इंडो-आर्यन) मराठीचा समावेश केला जातो. मराठी भाषेचा कालक्रमिक इतिहास पाहिल्यास इ.स.पू.६०० च्या सुमारास मराठीचा प्रारंभिक आढळ सापडतो.

- **अभिजात मराठीचे शिलालेखीय पुरावे**

नाणेघाटातील शिलालेखात 'महारठ्ठीनो' हा उल्लेख येतो.मराठी भाषेचा उल्लेख असलेले असे शिलालेख कार्ला लेणी(लोणावळा), नाशिक येथे देखील कोरलेले आहेत. रायगड जिल्ह्यातील अक्षी येथील देवनागरी लिपीत कोरलेल्या शिलालेखाची निर्मिती शिलाहार राजा केशिदेवराय याने इसवी सन १०१७ मध्ये केली आहे.या शिलालेखात देवनागरी लिपीत नऊ ओळी कोरण्यात आल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यात हत्तरसंग कुडलसंगम येथे संगमेश्वर मंदिराच्या सभामंडपाच्या तुळईवर इसवी सन १०१८ मध्ये कोरलेला 'यवाछि तो विजेया हो ऐवा' असा मराठी भाषेतील शिलालेख आहे. श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वर बाहुबलीच्या मूर्तीच्या पायथ्याशी डाव्या बाजूला कोरलेला देवनागरी लिपीतील' **श्रीचामुंडराये करवियले श्रीगंगाराजे सुत्ताले करवियले**' हा शिलालेख इसवी सन १११६-१७ मध्ये कोरण्यात आला आहे.

कोकणातील दिवेआगर या ठिकाणी सापडलेला मराठी भाषेतील ताम्रपट इ.स.१०६० मधील असून त्यात मराठी भाषेचे प्राचीन रूप दिसते. इ.स.१२९०

मध्ये तामिळनाडूत मराठी भाषा शिकण्याची सोय होती, असा उल्लेख मैलगी शिलालेखात आहे. हा संदर्भ म्हणजे मराठीच्या मध्ययुगातील दिग्विजयाची निशाणीच होय.

- **अभिजात मराठीचे ग्रांथिक पुरावे**

भरतमुनीच्या ‘नाट्यशास्त्रा’त (इ.स.पू.२००) महाराष्ट्रीचा उल्लेख मिळत नाही, परंतु ‘दाक्षिणात्य’ ह्या नावाने महाराष्ट्री प्राकृताचे सूचन होते. बौद्धग्रंथ विनयपीटक, दीपवंश, महावंश या ग्रंथात महाराष्ट्राचे उल्लेख मिळतात.रामायण, महाभारत, गुणाढ्याची *बड्डकहा(*बृहत्कथा) ‘गाथासप्तशती’ (गाहा सत्तसई), वररुचीचा ‘प्राकृत प्रकाश’ इत्यादी ग्रंथात असंख्य मराठी शब्द आहेत. कालिदासाचे ‘शाकुंतल’, शुद्रकाचे ‘मृच्छकटिक’ राजशेखराचे ‘कर्पूरमंजरी’(प्राकृत सट्टक) इत्यादी नाटकातील पात्रांच्या तोंडी प्राचीन मराठीतील संवाद आहेत. हालसातवाहनाचा ‘गाहा सत्तसई’, जयवल्लभाचा ‘वज्जालग्ग’, प्रवरसेन वाकाटकाचे ‘सेतुबंध’ (रावणवहो), वाक्पतिराजाचे ‘गऊडवहो’ ही महाकाव्ये महाराष्ट्री प्राकृतातील अमुल्य ग्रंथ आहेत. वररुची ह्या वैय्याकरणीने २००० वर्षांपूर्वी 'प्राकृत प्रकाश' हा महाराष्ट्री(मराठी) भाषेचा व्याकरण ग्रंथ लिहिला. ह्या ग्रंथात त्याने मराठीचे श्रेष्ठत्व पटवून दिले आहे.इ.स.८०० च्या सुमाराला लिहिला गेलेला हरिभद्रसूरीचा ‘समराइच्च कहा’(समरादित्याची कथा) हा आद्य मराठीतील निवेदनतंत्रात ‘जादुई वास्तववाद’ वापरलेला कादंबरीसदृश्य ग्रंथ अतिशय मौल्यवान आहे.शाकुंतल, मृच्छकटिक, सेतुबंध, भद्रबाहुचे ‘आवश्यक निर्युक्ती’, विमलसूरीचे ‘पऊमचरिय’ इत्यादी प्राचीन ग्रंथात मराठी भाषेची जुनी

रूपे दिसतात. संस्कृत नाटककार कालिदास, हर्ष, विशाखदत्त, भवभूति, राजशेखर यांच्या नाटकामध्ये पद्यभाग महाराष्ट्रीत दिसतो. संघदास आणि धर्मसेन या दोन जैनमुनींनी ‘वसुदेवहिंडी’ हा ग्रंथ महाराष्ट्री प्राकृतात लिहिला, तो पहिला प्रवासवर्णनपर ग्रंथ आहे. महाराष्ट्रातील वासुदेवाची लोकपरंपरा यातूनच निर्माण झाली असे मानले जाते.उद्योतनसूरीने इ.स.७७८ मध्ये लिहिलेल्या ‘कुवलयमाला’ ह्या प्रेमाख्यान सांगणाऱ्या, सांस्कृतिक संदर्भांनी परिपूर्ण असलेल्या ग्रंथात अनेक भाषांबरोबर ‘मरहट्ट’ भाषेचा उल्लेख आला आहे. उदा.

**“दडमडह सामलंगे अहिमान कलहसिले ये**

**दिन्नले गहिल्ले उल्लविरे तथ मरहट्टे”**

‘कुवलयमाला’ ह्या ग्रंथात “पइए भासा रइया मरहट्ठ देसि वण्ण निबध्दा”असा मराठी भाषेचा ‘देशी भाषा’ म्हणून उल्लेख आढळतो.संत ज्ञानेश्वर देखील मराठी भाषेला ‘देशी भाषा’ म्हणतात.

चालुक्यराजा सोमेश्वर ह्याच्या ‘अभिलषितार्थ चिंतामणी’ (मानसोल्लास) (इ.स.११२९) या ग्रंथात काही मराठी पदे आलेली आहेत.उदा.

**“जेणे रसातल उणु वेद आणियेले**

**मनुशिवक वाणियेले”**

इसवी सन ८०० च्या सुमारास कोऊहल या कवीने ‘लीलावई’ हे खंडकाव्य मरहट्ट या देसीभाषेत लिहिले.ह्यात “रइय मरहट्ठ देसि भासाए”(लीलावई गाथा १३३०) असा उल्लेख आढळतो. अकराव्या

शतकाच्या उत्तरार्धात यशश्चंद्र नावाच्या जैन विद्वानाच्या 'राजमतीप्रबोध' ह्या ग्रंथात मराठी भाषेतील  परिच्छेद दिसतो.तमिळ भाषेतील संगम साहित्य २३००ते २६०० वर्ष प्राचीन आहे. त्यात मराठीचा उल्लेख आहे. ' कावेरी नदीवरील धरणावर काम करणारे गवंडी आपापसात मराठी बोलतात.' असा त्यात उल्लेख आहे.

मराठीची जुनी रूपे संस्कृत महाकवी कालिदासाच्या 'अभिज्ञानशाकुन्तलम्' तसेच शूद्रकाच्या 'मृच्छकटिकम्' या प्राचीन नाटकांमध्ये आढळतात. 'अभिज्ञानशाकुन्तलम्' ह्या नाटकामध्ये अनेक संवाद तत्कालीन मराठी भाषेत आहेत. "**तुज्झ ण आणे हिहअअं मम उण कामो दीवामि रतिम्मि | णिग्विण ! तवइ वसीअं....** " हा ह्या नाटकातील संवाद तत्कालीन मराठी भाषेतील आहे.

- **मराठीतील प्राचीनतम अक्षर वाङ्मय**

**गाथासप्तशती (गाहा सत्तसई) :** सातवाहन राजा 'हाल' याने आद्य मराठीत निवडक ७०० लोककवितांचा 'गाथासप्तशती' (गाहा सत्तसई) हा लोककाव्यसंग्रह  सुमारे २००० वर्षांपूर्वी संपादित केला. या ग्रंथातील ४४ गाथा स्वतः हाल सातवाहनाने रचलेल्या आहेत. पादलिप्त या जैनमुनीने लिहिलेला 'तरंगवईकहा' हा महाराष्ट्री प्राकृतातील आद्य काव्यग्रंथ आज उपलब्ध नाही त्यामुळे  'गाथासप्तशती' (गाहा सत्तसई) हाच आज उपलब्ध असलेला आद्य मराठीतील आद्य व अग्रगण्य ग्रंथ आहे. गोदावरी नदीकाठावरील ५० शेतकरी कवींच्या कविता या लोककाव्यसंग्रहात समाविष्ट  आहेत. या ग्रंथात मानवी

भावभावनांचे हृदयंगम दर्शन घडते. महाराष्ट्रातील तत्कालीन ग्रामजीवन, समाजजीवन, निसर्ग, कृषी जीवन, कुटुंब जीवन इत्यादींचे शब्दांकन 'गाथा सप्तशती' मधील लोकगाथांमध्ये सौंदर्यपूर्णरित्या केले आहे. 'गाथासप्तशती'तील मराठी भाषेची अलंकृतता आणि भाषिक सौंदर्य उल्लेखनीय आहे.गाथासप्तशतीत गावगाडा, पाटील, पाटलाची सून, महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनाचे चित्रण दिसते.प्रतिष्ठान(पैठण), गोला नदी (गोदावरी) इत्यादी स्थळ-संदर्भ ह्या ग्रंथात येतात.ह्या ग्रंथातील एका गाथेत एक कवी स्वतःच्या भाषेला 'मरहट्ठ भाषा' म्हणतो.गाथा हा शब्द संत तुकारामाच्या पद्यसंग्रहाला देखील वापरला जातो. गाथा सप्तशतीत 'द्विपदी गाथा' हा छंद वापरलेला आहे.महाराष्ट्री प्राकृत ही गीतभाषा मानली जात असे.मराठीत देखील गाथा हा लोकप्रिय छंद आहे.

**समरादित्याची कथा(समराईच्च कहा) :** आचार्य हरिभद्रसुरी १२०० वर्षापूर्वी इ.स.८०० मध्ये लिहिलेली 'समरादित्याची कथा' (समराईच्च कहा) ही कादंबरीसदृश्य रचना एकमेकाद्वितीय अशीच आहे.त्यात हरिभद्राने जादुई वास्तववाद (Magical Realism) हा आकृतिबंध वापरलेला आहे.तत्कालीन मराठी भाषेत लिहिलेली ही आख्यानात्मक साहित्यकृती आहे.राजा समरादित्य (नायक) आणि अग्निशर्मा (प्रतिनायक) यांच्यातील जन्मजन्मांतरातील जीवनसंघर्षाचे चित्रण प्रस्तुत ग्रंथात केले आहे.

**सेतुबंध (रावणवहो) :** वाकाटक राजा प्रवरसेन याने निर्माण केलेले ‘सेतुबंध’(रावणवहो) हे आद्य मराठीतील उल्लेखनीय काव्य मानले जाते.वाल्मिकी रामायण या आर्ष महाकाव्यावर आधारित असे हे १५ आश्वासांचे (कांडांचे)महाकाव्य आहे.काही साहित्य अभ्यासक ‘सेतुबंध’(रावणवहो) महाकाव्याचे कर्तृत्व कालिदासाला देतात.

मराठीतील आज उपलब्ध मध्ययुगीन काळातील काव्याची संख्या सुमारे पंधरा लाख इतकी आहे, जे काव्य संख्यात्मक आणि गुणात्मक दृष्ट्या पाहिले तर इतर कोणत्याही भारतीय भाषेतील साहित्यापेक्षा श्रेष्ठतम असे आहे. मराठीमध्ये मध्ययुगीन काळात संत काव्य, पंडिती काव्य आणि शाहिरी काव्य अश्या साहित्यप्रवाहांत साहित्य निर्माण झाले. लीळाचरित्र आणि ज्ञानेश्वरी हे मराठी भाषा अतिशय प्रगल्भ झाल्यानंतरचे श्रेष्ठ ग्रंथ आहेत.

- **मराठीतील मध्ययुगीन अक्षर वाङ्मय**

**लीळाचरित्र** : महाराष्ट्रीय भक्तीसंप्रदायात महत्त्वाच्या महानुभाव पंथात श्रुतीग्रंथ मनाला जाणारा ‘लीळाचरित्र’ हा आद्य गद्य चरित्रग्रंथ म्हाइंभट सराळेकर यांनी निर्माण केला आहे.सर्व महानुभाव मराठी वाङ्मयाची बीजतत्त्वे या ग्रंथात असून याची निर्मिती इ.स.१२७८ मध्ये झाली आहे.एकांक-पूर्वार्ध-उत्तरार्ध हे या ग्रंथाचे तीन विभाग असून महानुभाव पंथप्रवर्तक चक्रधर स्वामी यांचे चरित्र यात वर्णलेले आहे.तत्कालीन महाराष्ट्रीय समाज जीवनाचे चित्रण ‘लीळाचरित्रा’त आलेले आहे.यादवकालीन महाराष्ट्राचे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, तात्विक आणि वाङ्मयीन शब्दरूप चित्रण म्हणजे

‘लीळाचरित्र’ होय. मराठी आद्य लोककथा ‘साळैचे घर मेणाचे’(चिमणी-कावळ्याची गोष्ट) लीळाचरित्रात आढळते.

**ज्ञानेश्वरी** : शके १२१२ किंवा इ.स.१२९० मध्ये प्रवरा नदीतीरावरील नेवासे या गावातील म्हाळसादेवीच्या मंदिरातील पैसखांबाला टेकून गीतेवरील संत ज्ञानेश्वरांनी केलेला मराठी भावानुवाद म्हणजे ‘ज्ञानेश्वरी’.या गीताभाष्यालाच भावार्थदीपिका, ज्ञानदेवी म्हटले जाते.स्वतः संत ज्ञानेश्वरांनी या ग्रंथाला ‘देशीकार लेणे’ असे म्हटले आहे.ज्ञानेश्वरी हा १८ अध्याय असलेला काव्यग्रंथ असून, सर्वसामान्यांसाठी असणारा मराठीतील सर्वश्रेष्ठ गीता भाष्यग्रंथ आहे.

**संत तुकारामांची अभंगगाथा** : अस्सल मराठी बोलीत लिहिलेली, जीवन तत्त्वज्ञान सांगणारी संत तुकारामांची ‘अभंगगाथा’ म्हणजे इसवीसनाच्या सतराव्या शतकातील मराठी भाषेतील अक्षर वाङ्मयच होय.संत तुकारामांना मराठीतील लोककवी, महाकवी मानले जाते.’अभंग’ या अस्सल मराठी छंद प्रकाराला संत तुकारामांनी लोकप्रिय केले. संत संताजी जगनाडे हे तुकाराम अभंगगाथेचे लेखनिक मानले जातात.

- **मराठीचे प्राचीनत्व**

संस्कृत भाषेला ‘संस्कृत’ हे नाव मिळण्याआधी महाराष्ट्री भाषा अस्तित्वात होती. महाराष्ट्री हे मरहट्टी भाषेचे नामकरण संस्कृत पंडितांनी केले आहे. मराठी भाषा संस्कृत इतकीच जुनी भाषा आहे, ती संस्कृतची भगिनी ठरते. सातवाहन हे महाराष्ट्रीला आश्रय देणारे राजे होते. सातवाहनकालीन महाराष्ट्री भाषा ही ज्ञानेश्वरकालीन मराठीचेच जुने रूप आहे. शालिवाहनाच्या आरंभी महाराष्ट्रात लोक जी महाराष्ट्री बोलत तीच वाढत जाऊन बाराव्या शतकात ‘मऱ्हाठी’

झाली.’प्राकृत शब्दमहार्णव’ नावाच्या हिंदी कोशातील प्रस्तावनेमध्ये सं.हरगोविंददास शेठ म्हणतात, “महाराष्ट्री अपभ्रंश से मराठी और कोंकणी भाषाएं उत्पन्न हुई.” राजारामशास्त्री भागवत मराठी भाषेचे वय २५०० वर्ष मानतात. संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेला ‘मऱ्हाठी’ या शब्दाबरोबरच ‘देशी’ हा शब्ददेखील वापरलेला आहे. मराठी ही संस्कृत भाषेतून जन्माला आलेली नसून ती संस्कृतइतकीच जुनी भाषा आहे. प्राचीन चीनी प्रवासी ह्युएन त्संग आपल्या ग्रंथात महाराष्ट्राचा उल्लेख ‘मोहोलोच’ असा करतो. मराठी भाषेला श्रेष्ठ साहित्याची सातत्यपूर्ण प्राचीन परंपरा आहे. कुरुयुद्धाच्या आधीपासून उत्कर्षाला आलेली महाराष्ट्रभाषा इसवीसनाच्या पहिल्या शतकापर्यंत त्याच स्थितीत होती. चवथ्या शतकात अपभ्रंश भाषा सुरु झाली. अपभ्रंशाचा काळ चवथ्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत दिसतो. अपभ्रंश भाषेतूनच आजच्या मराठीचा उद्भव झाला आहे. पाअड भाषा म्हणजे प्रकट भाषा. पाअड वरून ‘प्राकृत’ हा शब्द तयार झाला. महाराष्ट्री प्राकृत म्हणजे जुनी मराठी, अपभ्रंश मराठी म्हणजेच मधल्या काळातील मराठी, चक्रधर-ज्ञानेश्वरांची प्रगल्भ मराठी आणि अर्वाचीन मराठी असे मराठी भाषेच्या विकासाचे टप्पे आहेत.डॉ.शं.गो.तुळपुळे ह्यांनी देखील महाराष्ट्री–महारट्ठी– मरहट्ठी–मऱ्हाठी–मराठी असा मराठी भाषेचा कालक्रमिक विकास झाला असा उल्लेख केलेला आहे.

एकूणच प्राचीनता, मौलिकता, सलगता, श्रेष्ठ साहित्याची परंपरा, भौगोलिक विस्तार इत्यादी सर्व बाबींनी विचार करता मराठी ही अभिजात भाषा असल्याचे स्वयंसिद्ध आहे.

## संदर्भ ग्रंथसूची


१. ‘मराठी अभिजात भाषा समिती अहवाल – २०१३’, मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, ३१ मे २०१३.

२. तुळपुळे शं.गो., ‘यादवकालीन मराठी भाषा’, केशव भिकाजी धवळे प्रकाशन-मुंबई, प्रथम आवृत्ती, १९७३.

३. कुलकर्णी कृष्णाजी पांडुरंग, ‘मराठी भाषा : उद्गम आणि विकास’, मॉर्डन बुक डेपो, प्रथम आवृत्ती, जानेवारी १९३३.

४. जोशी शं.बा., ‘मऱ्हाटी संस्कृती : काही समस्या’, व्हीनस प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, १९८०.

५. कर्वे इरावती, ‘मराठी लोकांची संस्कृती’, देशमुख आणि कंपनी, प्रथम आवृत्ती, १९६२.


## अभिजात मराठी भाषा



नाणेघाट शिलालेख



नाणेघाट शिलालेख

**‘महारठीनो’ असा उल्लेख**



म हा र ठी

𑀫𑀳𑀸𑀭𑀞𑀻

# मराठी भाषा व्युत्पत्ती : एक विहंगावलोकन

मराठी ही भाषा महाराष्ट्री प्राकृतापासून निर्माण झालेली अर्वाचीन आर्य भारतीय भाषा आहे.मराठी भाषा किमान २५०० वर्षांपासून अस्तित्वात असलेली भाषा आहे, असे मत अनेक भाषातज्ज्ञांनी मांडले आहे.महाराष्ट्र शासनाच्या अभिजात मराठी भाषा समितीने आपल्या अहवालात मराठीचे प्राचीनत्व विविध शिलालेख, ताम्रपट, हस्तलिखिते, ग्रंथ वाङ्मय ह्यांच्या साहाय्याने सिद्ध केले आहे.प्राचीन काळातील महाराष्ट्री प्राकृत म्हणजे आद्य मराठी भाषा होय.मराठी भाषेची उत्पत्ती व इतिहास शोधण्यासाठी ग्रांथिक साधने; शिलालेख, ताम्रपट ह्यांसारखे कोरीव लेख, लोकसाहित्य इत्यादी साधने वापरली जातात, त्यातील शासकीय आदेश, राजांची फर्माने, आज्ञापत्रे, करारनामे, तहनामे, पत्रव्यवहार ही प्रमाण साधने तर तवारिखा, बखरी, पोवाडे, स्तोत्रे इत्यादी दुय्यम साधने मानली जातात. आज ज्ञानेश्वरपूर्व काळातील सुमारे तीस मराठी कोरीव लेखांचे पुरावे उपलब्ध आहेत. आधुनिक मराठी किमान १५०० वर्ष जुनी भाषा आहे.

## मराठीच्या व्युत्पत्तीचे शिलालेखीय पुरावे

मराठी भाषेतील शिलालेख इ.स.अकराव्या शतकापासून मोठ्या प्रमाणावर निर्माण झाले आहेत. तत्पूर्वी सातवाहन कालखंडात महाराष्ट्री प्राकृत ही प्रशासकीय आणि राजभाषा होती.पाले जैन लेणी ही महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात आहेत, ही लेणी उकसण गावाजवळ पाले

नावाच्या ठिकाणी आहेत. पाले जैन लेण्यांत इ.स.पूर्व पहिल्या शतकातील महाराष्ट्री प्राकृतातील सर्वात जुना ज्ञात शिलालेख आढळतो, ह्या शिलालेखात अशोकपूर्वकालीन ब्राह्मी लिपीचा वापर दिसतो. हा शिलालेख खालीलप्रमाणे

**“ नमो अरहंतानं कातुनं भदंत इंदरखितेनं लेणं कारापितमं पोढि च सह काहीसह.”**

ह्याचा अर्थ “अरहंतांना नमस्कार! भदंत इंदरखित ह्याने (बहुधा इतरांबरोबर)लेणे व कुंडदान दिले.” असा आहे.

महाराष्ट्रातील दुसरा जुना ज्ञात शिलालेख नालासोपारा(सुप्पारक किंवा शूर्पारक) येथे सुमारे २५०० वर्ष जुन्या बौद्ध स्तुपाजवळ सम्राट अशोकाच्या राजाज्ञेपैकी ८ व ९ क्रमांकाचे भग्न शिलालेख सापडले आहेत, जे महाराष्ट्री प्राकृत भाषेत ब्राह्मी लिपीत आहेत.ह्या शिलालेखात सम्राट अशोकाने स्वतःला ‘देवनम्पिया’ (देवांचा प्रिय) आणि ‘पियादसी’ (सुंदर) असे संबोधले आहे.

नाणेघाट हा आजच्या जुन्नर म्हणजे तत्कालीन जीर्णनगर व कोकण ह्यांना जोडणारा व्यापारी मार्ग होता.ह्या नाणेघाटमध्ये सातवाहन शासक गौतमीपुत्र सातकर्णीची राणी आणि अंगियकुलवर्धन वंशातील त्रनकयिरनामक महारठीची कन्या नागणिका हिने निर्माण केलेला २२३१ वर्षापूर्वीचा शिलालेख महाराष्ट्री प्राकृतात आहे. “महारठीनो अंगीय कुल वधनस सगरगिरीवलयाय पथविय पथम विरस वस य महतो मह.” असा उल्लेख शिलालेखात आहे, ज्याचा अर्थ “महारठी अंगीय कुळातील गिरीसमुद्र वलयांकित पृथ्वीवरील वीरश्रेष्ठ असा पुरुष.” असा होतो.ह्या शिवाय कार्ला लेणी, नाशिक त्रिरश्मी लेणी इत्यादी ठिकाणी महाराष्ट्री प्राकृतातील शिलालेख ब्राह्मी लिपीत आढळतात.

कार्ला लेणी चैत्यगृहासमोरील सिंहस्तंभावर “महारठीस गोतिपुत्रस अगिमित्रणकस सिहय भी दानं.” असा उल्लेख आहे, ज्याचा अर्थ “गोटीचा मुलगा महारठी अग्निमित्र याने सिंहस्तंभाची देणगी दिली.” असा आहे.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग जवळील अक्षी शिलालेख हा शके ९३४ म्हणजेच इ.स.१०१२ मधील देवनागरी लिपीतील मराठीचा आद्य शिलालेख मानला जातो, शिलाहारवंशीय राजा पहिला केसीदेवराय ह्याने कोरला आहे.

**“गी सुष संतु । स्वस्ति ओं । पसीमस-**
**मुद्रधीपती ।श्री कोंकणा चक्री-**
**वर्ती । स्री केसीदेवराय । महाप्रधा-**
**न भइर्जु सेणुई तसीमीनी काले**
**प्रव्रतमने । सकु संवतु : ९३४ प्रधा-**
**वी संवसरे: अधिकु दिवे सुक्रे बौ-**
**लु । भइर्जुवे तथा बोडणा तथा नौ**
**कुंवली अधोर्यु प्रधानु । महलषु-**
**मीची वआण । लुनया कचली ज”**

ह्या शिलालेखाचा अर्थ “जगी सुख नांदो. ओम पश्चिम समुद्राधीपती श्री कोकण चक्रीवर्ती श्री केसिदेवराय यांचा महाप्रधान भइर्जु सेणुई याने शक संवत ९३४ परिधावी संवत्सर अधिक मासात शुक्रवारी वद्यपक्षात देवीचा बोढणासाठी नऊ कुंवली धान्य दान केले.” असा आहे.लुनया हे लेख

कोरणाऱ्याचे नाव आहे. ह्या शिलालेखात देवनागरी लिपीत नऊ ओळी कोरण्यात आल्या आहेत .

भीमा व सीना ह्या दोन नद्यांचा संगमावर वसलेल्या सोलापूर जिल्ह्यात हत्तरसंग कुडलसंगम येथे चालुक्यकालीन संगमेश्वर मंदिराच्या सभामंडपाच्या तुळईवर शके ९४० म्हणजेच इसवी सन १०१८ मध्ये कोरलेला ‘यवाछि तो विजेया हो ऐवा’ असा मराठी भाषेतील शिलालेख आहे .

कर्नाटक राज्याच्या श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वर बाहुबलीच्या मूर्तीच्या पायथ्याशी डाव्या बाजूला कोरलेला देवनागरी लिपीतील ‘ हा ’श्रीचामुंडराये करवियले श्रीगंगाराजे सुत्ताले करवियले होयसळ राजांचा मराठी शिलालेख इसवी सन १११६मध्ये कोरण्यात आला आहे १७-. शके ११०८ म्हणजेच इ.स. ११८७ चा परळ शिलालेख शिलाहार राजा अपरादित्य(द्वितीय) ह्याचा असून त्यात मराठी भाषेत शापवाचन व गधेगळ आहे."अथ तु जो कोणु हुवि ए शासन लोपि तेया श्री वैद्यनाथ देवाची भाल सकुंटुंबीया पडे तेहाची माय गाढवें झविजे " असा परळ शिलालेखातील मराठी मजकूर आहे.

पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील पळसदेव येथील सरडेश्वर मंदिराच्या खांबावर कोरलेला शके १०७९ म्हणजेच इ.स.११५७ मधील पळसदेव शिलालेख यादवकालीन आहे.ह्या शिलालेखात "श्रीचंगदेव दंडनाके विष्णूगृह केले !" ही मराठी वाक्यरचना दिसते.खान्देश मधील पाटण शिलालेख शके ११२९ म्हणजेच इ.स.१२०७ मधील असून त्यात "इयां पाटणी जे केणें उघटे तेहाचा असि आउ जो राउला होता ग्राहकापासी तो मढा दिन्हला" असा

मराठी मजकूर आहे.इ.स.१२२८ मधील आंबेजोगाई येथील खोलेश्वराचा शिलालेख संस्कृत-मराठी भाषांमध्ये असून ४७ ओळींचा आहे, त्यातील ५-७ ओळी मराठी भाषेत आहेत.उनकेश्वराचा शिलालेख नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यात आहे. हा शिलालेख मराठी भाषेतील शके १२०१ (इ.स. १२७९) मध्ये कोरलेला आहे, ह्या शिलालेखात १८ ओळी आहेत, ज्यात प्रत्येकी ३५ ते ४० अक्षरे आहेत.हा शिलालेख रामदेव यादवांच्या काळातील असून मंदिराच्या सभामंडपाच्या भिंतीवर आढळतो, इ.स.१२९० मधील तामिळनाडूच्या मैलंगी शिलालेखात त्या ठिकाणी मराठी भाषा शिकण्याची सोय होती, अशी माहिती मिळते.

**मराठीच्या व्युत्पत्तीचे ताम्रपटीय पुरावे**

चिकुर्डे ताम्रपट हा मराठी भाषेतील एक महत्त्वाचा आणि प्राचीन ताम्रपट आहे. हा ताम्रपट इसवी सन ६९९ (शके ६२१) चा आहे. यात "आचलित", "करवुन", "करित" यांसारखे मराठी शब्द आढळतात.हा ताम्रपट चिकुर्डे गावात एका धनगर समाजातील व्यक्तीजवळ सापडला. चिकुर्डे ताम्रपट एका मन्नेय राम गावुंड ह्या माहुताला जनमेजय चक्रवर्तिन नामक राजाने दिलेले गावांचे दान व मूलस्थानदेव नामक देवतेला दिलेली दाने नोंदवतो.भावसंवत्सरातील वैशाख महिन्यातील कृष्णपक्षातील अष्टमीला हे दान दिले असा उल्लेख आहे.

कोकणातील दिवेआगर ह्या ठिकाणी सापडलेला मराठी भाषेतील ताम्रपट इ मधील १०६०.स.शिलाहार राजवंशाचा शासक छित्तराजाच्या काळातील असून त्यात मराठी भाषेचे प्राचीन रूप दिसते. ह्या ताम्रपटात

दिवेआगरचा उल्लेख आहे, त्यामध्ये काही ब्राह्मणांनी (मावळभट्ट, वासुदेव भट्ट, नागरुद्र भट्ट) १२७ सोन्याची नाणी (गद्यनाक) शेजारच्या स्तीतीपुरी गावात परिषदेसाठी दिल्याचे नमूद आहे.

## मराठीच्या व्युत्पत्तीचे ग्रांथिक पुरावे

मराठीचा आज उपलब्ध असलेला आद्य ग्रंथ 'गाथासप्तशती'(गाहा सत्तसई) हा सुमारे दोन हजार वर्षांपूर्वी हाल सातवाहनाने निर्माण केला . 'गाथासप्तशती' (गाहा सत्तसई) हे महाराष्ट्राचे आद्य लोकसाहित्य आहे . हरिभद्रसूरीचा 'समराइच्च कहा'(समरादित्याची कथा) हा आद्य मराठीतील निवेदनतंत्रात वापरलेला कादंबरीसदृश्य ग्रंथ अतिशय 'जादुई वास्तववाद' आवश्यक' भद्रबाहुचे ,सेतुबंध ,मृच्छकटिक ,शाकुंतल.मौल्यवान आहे 'निर्युक्ती, विमलसूरीचे इत्यादी प्राचीन ग्रंथात मराठी भाषेची 'पौमचरियम' ,भवभूति ,विशाखदत्त ,हर्ष ,संस्कृत नाटककार कालिदास .जुनी रूपे दिसतात संघदास आणि .राजशेखर यांच्या नाटकामध्ये पद्यभाग महाराष्ट्रीत दिसतो हा ग्रंथ महाराष्ट्री प्राकृतात 'वसुदेवहिंडी' धर्मसेन या दोन जैनमुनींनी महारा .तो पहिला प्रवासवर्णनपर ग्रंथ आहे ,लिहिलाष्ट्रातील वासुदेवाची लोकपरंपरा ह्यातूनच निर्माण झाली असे मानले जाते ७७८.स.उद्योतनसूरीने इ. मध्ये लिहिल्या'कुवलयमाला 'ह्या ग्रंथात अठरा देशी भाषांचा उल्लेख आहे, त्यात .भाषेचा उल्लेख आला आहे 'मरहट्ट'उदा.

**"दडमडह सामलंगे अहिमान कलहसिले ये**

**दिन्नले गहिल्ले उल्लविरे तथ मरहट्टे"**

चालुक्यराजा सोमेश्वर ह्याच्या ‘अभिलषितार्थ चिंतामणी’ (मानसोल्लास) (इ.स.११२९) या ग्रंथात काही मराठी पदे आलेली आहेत.उदा.

**“जेणे रसातल उणु वेद आणियेले**

**मनुशिवक वाणियेले”**

इसवी सन ८०० च्या सुमारास कोऊहल(कौतुहल) ह्या कवीने ‘लीलावई’ हे खंडकाव्य मरहट्ट या देशीभाषेत लिहिले आहे. तमिळ भाषेतील संगम साहित्य सुमारे २३०० ते २६०० वर्ष प्राचीन आहे, त्यात मराठीचा उल्लेख आहे."कावेरी नदीवरील धरणावर काम करणारे गवंडी आपापसात मराठी बोलतात". असा त्या तमिळ संगम साहित्यात उल्लेख आहे.

इ.स.पाचव्या शतकातील नारदस्मृती ह्या ग्रंथात मराठी देशी भाषेचा उल्लेख आहे. धर्मोपदेशमाला (इ.स.८५९) ह्या ग्रंथात मराठी भाषेचा उल्लेख आहे.ह्या ग्रंथात "सललयि-पय-संचारापयडियमाणा सुवण्णरयणेल्ला ! मरहठ्य भाषा कामिणी य अडवीय रेहंती !!" असा उल्लेख असून, ह्याचा अर्थ "मराठी भाषा सुंदर कामिनीप्रमाणे असून ती अटवी प्रमाणे सुंदर गतीची, मदनाने भरलेली आणि चांगल्या वर्णाची आहे." असा कौतुकास्पद आहे.कन्नड कवी पंप ह्याच्या 'विक्रमार्जुन विजय' (इ.स.९३२) ह्या ग्रंथात द्रोणाचार्यांच्या तोंडी "अरे होय जाबाप्पा" असे मराठी उद्गार आहेत. इ.स.१२१० मधील कन्नड कवी रण्ण ह्याच्या 'अनंतनाथपुराण' व इ.स.चौदाव्या शतकातील 'रंभमंजिरी' ह्या ग्रंथांत मराठी पद्यपंक्तींचे उपयोजन केले आहे.कवी यशच्चंद्र ह्याच्या 'राजमती प्रबोध'(इ.स.११२८) ह्या ग्रंथात

**"देव चतुरागुळाची जीहा मी काई सांघावी !**

**गोमटी मुह फाफट नीलाट चापटु !!"**

अशा मराठी पद्यपंक्ती आहेत.

इसवी सनाच्या नवव्या शतकातील नाथ संप्रदायाचा मराठी भाषेवर खोल परिणाम दिसतो.नाथपंथीयांनी मराठीत पुष्कळ ग्रंथनिर्मिती केलेली आहे.इतिहासाचार्य वि.का.राजवाडे ह्यांच्या मते 'ज्योतिषरत्नमाला' हा पहिला मराठी ग्रंथ आहे.यादवकाळ हा मराठीचा वैभवकाळ मानला जातो. इ.स.११८७ नंतर यादव राजवटीत मराठी भाषेचा वापर वाढलेला दिसतो. यादव राजवटीतील महानुभाव, वारकरी पंथाच्या उदयामुळे मराठी भाषेचा विकास झाला.महानुभाव , वारकरी संप्रदायांची धर्मभाषाच मराठी होती. यादव काळात ज्योतिष, वैद्यकशास्त्र, पुराण, वेदांत, राजे-दरबार ह्यांच्यावरील गद्य-पद्य वाङ्मय मराठीत निर्माण झाले.यादवकाळात मराठी भाषेवर मराठीचा संस्कार झाला.श्रीपतीभट्ट लिखित 'ज्योतिषरत्नमाला'(इ.स.१०३९), राजकवी नरेंद्र अयाचित ह्याचे  नलोपाख्यान, रुक्मिणीसैंवर; आद्यकवी मुकुंदराजाचा विवेकसिंधु, परमामृत; आद्य गद्य चरित्र ग्रंथ 'लीळाचरित्र'(इ.स.१२७६), गोविंदप्रभु चरित्र (इ.स.१२८८) इत्यादी ग्रंथ यादवकाळातच लिहिले गेले.

**मराठी भाषा कालखंड**

**१. प्राचीन कालखंड** - कोरीव लेख, ताम्रपट, शिलालेख, महानुभाव साहित्य, ज्ञानेश्वरी ह्यातील मराठी भाषेचे रूप.

**२. मध्ययुगीन कालखंड** - शिवपूर्वकाळ, शिवकाळ, पेशवेकाळ, बखरी, रुमाल वाङ्मय, लोक वाङ्मय ह्यातील मराठी भाषा रूप. ह्या काळातील मराठी

भाषेवर फारसी, अरबी, तुर्की अशा मुसलमानी भाषांचा वाढता प्रभाव दिसतो, जो नंतर शिवकाळात, पेशवेकाळात कमी झाला.

**३. अर्वाचीन काळ** - अव्वल इंग्रजी, मराठीला आंग्ल प्रभावामुळे प्राप्त झालेला नवा अवतार, शालेय पाठयपुस्तके, कोश वाङ्मय, शब्दकोश ह्यांचा काळ, प्रबोधनकाळ, वैचारिक साहित्य तसेच मराठीचे प्रचलित रूप

**मराठी भाषा कालखंड पुढीलप्रमाणे देखील पाडता येतील**

१. आद्यकालीन मराठी भाषा : इ.स. १२०० पूर्वीची मराठी भाषा.

२. यादवकालीन मराठी भाषा : इ.स.१२५० ते इ.स.१३५० ह्या काळातील मराठी भाषा.

३. बहामनीकालीन मराठी भाषा : इ.स.१३५० ते इ.स.१६०० ह्या काळातील मराठी भाषा.

४. शिवकालीन मराठी भाषा : इ.स.१६०० ते इ.स.१७०० ह्या काळातील मराठी भाषा.

५. पेशवेकालीन मराठी भाषा : इ.स.१७०० ते इ.स.१८१८ ह्या काळातील मराठी भाषा.

६. आंग्लकालीन मराठी भाषा : इ.स.१८१८ ते इ.स.१९४७ ह्या काळातील मराठी भाषा.

७. अर्वाचीन मराठी भाषा : इ.स.१९४७ ते आजपर्यंतची मराठी भाषा.

## मराठी भाषा व्युत्पत्ती : काही मत-मतांतरे

भाषा ही नदीसारखी प्रवाही,सर्वसमावेशक, सर्जनशील असते. भाषा काळाच्या ओघात बदलते, मराठीने देखील काळानुसार स्वतःला बदलवून घेतलेले दिसते.मराठी भाषेच्या उत्पत्तीविषयी मत-मतांतरे दिसतात. मराठी भाषेचा विकास वैदिक संस्कृत ⟶ लौकिक संस्कृत ⟶ महाराष्ट्री प्राकृत ⟶ महाराष्ट्री अपभ्रंश ⟶ मराठी असा झालेला आहे.संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश ह्या प्रत्येक भाषांतील काही वैशिष्ट्ये आजच्या मराठीत दिसतात. मराठी ही वेदपूर्वकालीन भाषेतून निर्माण झालेली भाषा आहे, असे काही भाषाभ्यासक मानतात.विदुषी दुर्गा भागवत ह्यांनी राजारामशास्त्री भागवत ह्यांच्या संशोधनाचा दाखल देऊन असे म्हटले आहे की, जुनी महाराष्ट्री संस्कृतपेक्षा जुनी व खरी जिवंत भाषा आहे.मराठी किमान २५०० वर्ष जुनी भाषा असून, ती कन्नड-तेलुगू पेक्षा जुनी किंवा निदान तितकीच जुनी भाषा आहे.भाषातज्ज्ञ प्र.रा.देशमुख ह्यांच्या मते "आर्यपूर्व सिंधू संस्कृतीतील लोकांच्या मूळ बोलींमधून मराठी भाषेचा उद्भव झाला आहे." इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संस्कृत भाषेला मराठीची जननी मानतात.भाषातज्ज्ञ कृ.पां.कुलकर्णी हे आपल्या 'मराठी भाषा : उद्गम व  विकास 'ह्या ग्रंथात "मराठी ही एका भाषेपासून निर्माण झाली नसून संस्कृत, सर्व प्राकृत भाषा, अपभ्रंश भाषा ह्या सर्वांनी मराठीच्या निर्मितीला हातभार लावला आहे" असे गृहीतक मांडले आहे. तसेच “मराठी भाषा सर्व प्राकृत भाषांच्या, त्यातल्या त्यात महाराष्ट्री व अपभ्रंश यांच्या मिश्रणाने इसवी सन ५००-७००च्या दरम्यान उद्भवली व उत्क्रांत होत गेली...”असे मत कृ.पा.कुलकर्णी ह्यांनी व्यक्त केले आहे.पाली भाषेचे अभ्यासक रा.भि.जोशी

मराठी भाषा पाली भाषेपासून निर्माण झाली असे म्हणतात. चिंतामण विनायक वैद्य आणि पांडुरंग दामोदर गुणे ह्या भाषातज्ज्ञांनी 'विविध ज्ञान विस्तार' ह्या नियतकालिकाच्या ५३ व्या वर्षाच्या ५, ७ व ८ व्या अंकात मराठी भाषा उत्पत्ती कोणत्या भाषेपासून झाली व कोणत्या काळात झाली? ह्या मुद्द्यावर चर्चात्मक लेख लिहिले आहेत, ह्याला वैद्य-गुणे वाद' असे म्हणतात.चिं.वि.वैद्य ह्यांच्या मते मराठी भाषेचा जन्म इ.स.सातव्या शतकात संस्कृतपासून झाला. गुणे ह्यांच्या मते मराठीची उत्पत्ती इ.स.दहाव्या शतकात झाली. मराठीचे अभ्यासक शं.गो.तुळपुळे व वि.भि.कोलते  ह्यांच्या मते मराठीचा जन्म इ.स.पाचवे ते सातवे शतक ह्या दरम्यान झाला असून मराठी ही अपभ्रंशोत्पन्न भाषा आहे.मराठी हा उत्क्रांत स्वरूपाचा अपभ्रंश आहे. "मराठी ही महाराष्ट्री अपभ्रंशाचा अपभ्रंश नसून संस्कृतीकरणाचा संस्कार झालेला उत्क्रांत स्वरूपातील अपभ्रंश आहे." असे मराठी भाषा अभ्यासक शं.गो. तुळपुळे मत व्यक्त केले आहे. ‘भाषातज्ज्ञ विश्वनाथ श्री.खैरे ह्यांनी संस्कृत-तमिळ-मराठी भाषा संबंधांवर 'संमत सिद्धांत' मांडला, ह्यात मराठीचे मूळ तमिळमध्ये शोधण्याचा प्रयत्न केला आहे.त्यांची द्रविड महाराष्ट्र, अडगुलं मडगुलं ही पुस्तके ह्या संदर्भात खूप महत्त्वाची आहेत.

डॉ.हरी नरके ह्यांच्या मते मराठी ही इसवी सनापूर्वीची भाषा आहे.माहाराष्ट्री उर्फ प्राचीन मराठीपासून शौरसेनी भाषा उत्पन्न झाली, शौरसेनीपासून मागधी, पैशाची भाषा निर्माण झाल्या.शौरसेनीची आई मराठी असून मागधी, पैशाची ही मराठीची नातवंडे आहेत, असा सिद्धांत डॉ.नरके ह्यांनी मांडला आहे.

**मराठीतील शब्दसंग्रह**

मराठी भाषेत संस्कृतोद्भव तत्सम, तद्भव, परभाषीय-स्वदेशी, विदेशी; देशी असे शब्द दिसतात. संस्कृत भाषेतून जसेच्या तसे म्हणजे शब्दांच्या रुपात काहीही बदल न होता मराठी भाषेत आलेले शब्द , त्यांना 'तत्सम शब्द' म्हणतात.मराठीमध्ये संस्कृतोद्भव तत्सम शब्दांची संख्या ७०% आहेत.उदा.कवी, मधु, गुरु, पिता, पुत्र कन्या, वृक्ष इत्यादी.मूळ संस्कृत असलेले परंतु परिवर्तित होऊन मराठीत वापरले जाणारे तद्भव शब्ददेखील मराठीत आहेत.उदा. आग, गाव, लोखंड, पान, कुंभार, घर इत्यादी.

मध्ययुगातील बहामनीकाळात मोठ्या प्रमाणावर अरबी, फारसी, तुर्की ह्या मुसलमानी भाषेतील शब्द सामील झालेले दिसतात. उदा. खबर, दवाखाना, शहर, वकील, बाजार, जाहिरात, चाकू, चादर इत्यादी. मराठीतील अनेक शब्द स्थानिक द्राविडभाषोपन्न आहेत.डॉ.पां.दा.गुणे व भाषाशास्त्रज्ञ विल्सन ह्यांनी मराठीतील देशी भाषांचे ऋण मान्य केलेले आहे.मराठी भाषेने फारसी, अरबी, तुर्की, इंग्रजी, फ्रेंच, जपानी, पोर्तुगीज इत्यादी परकीय भाषांमधून देखील शब्द घेतले आहेत. पोर्तुगीजमधून बटाटा, पाव, पगार, आरमार, तिजोरी, इत्यादी शब्द आलेले आहेत.फ्रेंचमधून फिरंगी, पोरे इ. शब्द मराठीने घेतले आहेत.जपानीतून मराठीत रिक्षा, हाराकिरी हे शब्द आलेले आहेत. जागतिक महत्त्वाची, सांस्कृतिक प्रतिष्ठा व ज्ञानभाषा असलेल्या इंग्रजीतून मराठीने शेकडो शब्द, वाक्यप्रयोग, विचार घेतले आहेतच, तसेच ॲ व ऑ हे स्वरही उचलले आहेत.पाली, अर्धमागधी, हिंदी, तामिळ, तेलुगू , कानडी, मल्याळम, गुजराती, ओडिया, उर्दू, ह्या भारतीय भाषांमधून देखील मराठीने शब्द घेतले आहेत.

## मराठी  भाषा आणि भारतीय भाषा : एक सहसंबंध

### पाली आणि मराठी

'ळ्' हा वर्ण मराठीबरोबर पाली, पैशाची प्राकृतामध्ये आढळतो. 'ळ्' स्वन हा वैदिक संस्कृतमध्ये आहे, परंतु अभिजात संस्कृतमध्ये नाही. पाली आणि मराठीतील अनेक शब्दांमध्ये साम्य दिसते. उदा.तिन, पाऊस, पिळणे, गुळ इत्यादी शब्द.

### पैशाची आणि मराठी

अन, तहान, कान, रान ह्या मराठी शब्दांची निर्मिती पैशाची प्राकृताप्रमाणेच आहे.पैशाचीमध्ये 'ण' हा स्वन नाही.

### मागधी आणि मराठी

मगढीमध्ये 'र' ऐवजी 'ल' येतो, तर 'स' ऐवजी 'श' येतो. मिसळ, केशर इ.मराठी शब्दांची निर्मिती मागधी प्राकृतासारखी दिसते.

### अर्धमागधी आणि मराठी

हत्तिस, अग्गीस, करिस्सामो, करिस्सासि हे अर्धमागधी शब्द आणि मराठीतील हत्तीस, आगीस, करीन, करशील हे शब्द ह्यांच्यात साम्य जाणवते.

अपभ्रंश भाषा अभिरांची भाषा मानली गेली आहे.मराठीतील काव्यातील यमकपद्धती अपभ्रंशातून आली आहे.'ळ्' हा स्वन तमिळमधून मराठीत आला, असे अनेक भाषाभ्यासकांचे मत आहे. मराठी व बंगाली ह्या आर्य भारतीय भाषांचा तुलनात्मक अभ्यास केला असता असे दिसते की, मराठीतील

संस्कृतोद्भव तत्सम शब्दांचे उच्चार संस्कृतप्रमाणे असण्याचे प्रमाण ५०% आहे, तर बंगालीमध्ये संस्कृतोद्भव तत्सम शब्दांचे उच्चार संस्कृतप्रमाणे असण्याचे प्रमाण ३०% आहे.आधुनिक मैथिली भाषा ही व्याकरणिकदृष्टया मराठीला खूप जवळची भाषा आहे.खोपा हा शब्द दोन्ही भाषांमध्ये आढळतो.

मराठीमध्ये आण्णा, अक्का, पुरणपोळी, उसळ, कोशिंबीर, तूप, होळी, तांडा असे कन्नड शब्द आहेत.तमिळमधून आप्पा, कुळीथ, पिठलं, तांडेल असे शब्द मराठत आले आहेत. तेलुगूमधून मराठीत ताळा, अनरसा, शिकेकाई हे शब्द आले आहे.मराठी भाषेतूनही अनेक शब्द इंग्रजी, हिंदी, गुजराती तसेच इतर भारतीय भाषांनी घेतले आहे.


**समारोप**

**मराठी भाषा ही संस्कृत आणि प्राकृत भाषेच्या प्रभावातून विकसित झाली आहे, तिचा उगम महाराष्ट्री प्राकृत आणि महाराष्ट्री अपभ्रंश या भाषांमधून झाला आहे.मराठीच्या विकासात संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश ह्या सर्वच भाषांनी हातभार लावला आहे.**


## संदर्भ ग्रंथसूची


१. कालेलकर ना. गो., ध्वनिविचार, पुणे, १९५५.
२. कालेलकर ना. गो., भाषा : इतिहास आणि भूगोल, मुंबई, १९६४.
३. कुलकर्णी कृष्णाजी पांडुरंग, मराठी भाषा : उद्गम व विकास, १९३३,
४. कालेलकर ना. गो., मराठी भाषा, नोंद लेख, मराठी विश्वकोश.

मराठी भाषेची व्युत्पत्ती



कुडलसंगम शिलालेख



श्रवणबेळगोळ शिलालेख

# बोलीसमृद्ध ‘मराठी’: एक शोध

मराठी ही एक बोलीसमृद्ध भाषा आहे. मराठीच्या ५६ पेक्षा जास्त बोली भाषा बोलल्या जातात. प्रादेशिकतेनुसार महाराष्ट्राच्या विविध ठिकाणी मराठीच्या बोली, पोटभाषा, उपभाषा बोलल्या जातात. दर बारा कोसांवर बोली बदलते, असे मानले जाते, परंतु लिखित भाषेत फारसा फरक दिसत नाही.बोली वैविध्य हे कोणत्याही भाषेच्या समृद्धीचे प्रतीक मानले जाते.बोली या मौखिक असून, त्यांची स्वतःची लिपी नसते.बोलींचा संबंध भूगोलाशी असतो.बोलीमध्ये प्रमाण  भाषेहून वेगळा विशिष्ट उच्चार, वेगळी वाक्यरचना आणि शब्दसंग्रह असतो.प्रदेशानुसार बोलींमध्ये परिवर्तन होते.बोलींचा अभ्यास ‘बोलीविज्ञान’, ‘बोलीभूगोल’ या ज्ञानशाखांमध्ये शास्त्रीय पद्धतीने केले जातो.प्रमाणभाषा ही काहीशी कृत्रिम, ताठर, मानक, औपचारिक, स्पष्ट, परिभाषित, लेखननियमांना महत्त्व असलेली असते, तर बोली जिवंत, लवचिक, नैसर्गिक, मौखिक तसेच दैनंदिन व्यवहारात वापरली जाणारी भाषा असते.आकलनात सहजता आणि व्यवहारात सुकरता या दोन निकषांच्या आधारे प्रमाणभाषा अस्तित्वात येते.प्रमाणभाषा ही नदीसारखी, तर बोलीभाषा ही जिवंत, खळाळत्या झऱ्यासारखी असते.

बोलीभाषांमध्ये उच्चारात, शब्दसंग्रहात, वाक्प्रचारात, म्हणींमध्ये, शब्दांच्या आघातात बदल होत असतो. मराठीत व्यवसाय, जातसमूह, समाज, भौगोलिकता इत्यादींमुळे बोलीवैविध्य निर्माण झाले आहे.बोलीभाषांचे उपबोली, स्थानिक बोली, प्रादेशिक बोली, जातिनिष्ठ बोली, सामाजिक बोली

असे वैविध्य आढळते.बोलीभाषा या मौखिक स्वरूपाच्या असतात आणि एकमेकांशी संवाद साधण्यासाठी वापरल्या जातात.बोलींभाषा भौगोलिक स्थान, सामाजिक पार्श्वभूमी, व्यवसाय यांवर आधारित असतात.एकाच भाषेच्या बोलींमध्ये उच्चार, शब्दसंग्रह, व्याकरण यांबाबतीत भिन्नत्व आढळते.

**बोलीच्या विविध व्याख्या :**

१. बोलीभाषा म्हणजे एखाद्या विशिष्ट भौगोलिक प्रदेशातील किंवा सामाजिक समूहातील लोकांद्वारे बोलली जाणारी भाषेची स्थानिक आवृत्ती, जी प्रमाण भाषेपेक्षा उच्चार, शब्दसंग्रह आणि व्याकरणात वेगळी असू शकते.

२. व्यवसाय, जातसमूह, समाज, भौगोलिकता इत्यादींमुळे निर्माण झालेले भाषेतील वैविध्य म्हणजे 'बोली' होय.

३. प्रमाणभाषेपेक्षा वेगळे, परंतु तिचेच भाग असलेले प्रादेशिक व सामाजिक भाषारूप म्हणजे 'बोली' होय.

४. बोली भाषा म्हणजे एखाद्या भाषेचा एक विशिष्ट प्रकार, जो एखाद्या भौगोलिक प्रदेशात किंवा लोकांच्या विशिष्ट गटात वापरला जातो.

५. बोलीभाषा ही भाषेच्या ध्वनीद्वारे तयार झालेली विशिष्ट समूहाची भाषा असते.

६. लोकांच्या विशिष्ट समूहाकडून बोलले जाणारे भाषेचे विशिष्ट रूप म्हणजे 'बोली' होय.

७. एका विशिष्ट समूहाची दैनंदिन व्यवहारासाठी वापरली जाणारी स्थानिक स्वरूपाची भाषा म्हणजे ‘बोली’ होय.

८. बोलीभाषेला इंग्रजीत ‘Dialect’ हा पारिभाषिक शब्द वापरला जातो.

**बोलीभाषेची प्रमुख वैशिष्ट्ये :**

१. स्थानिक विविधता: बोलीभाषा एका विशिष्ट प्रदेशात बोलल्या जातात आणि त्या त्या प्रदेशाच्या संस्कृती व इतर भाषांच्या प्रभावाने तयार होतात.

२. उच्चारातील फरक: बोलीभाषेत उच्चार, सुरावट आणि भाषेचा एक विशिष्ट हेल असतो, जो प्रमाण भाषेपेक्षा वेगळा असू शकतो.

३. शब्दसंग्रह: बोलीभाषेत प्रमाण भाषेपेक्षा वेगळे शब्द किंवा वाक्प्रचार वापरले जातात, ज्यामुळे तिची ओळख निर्माण होते.

४. व्याकरणिक फरक: काही बोलींमध्ये प्रमाण भाषेच्या व्याकरणापेक्षा वेगळे नियम आणि रचना असू शकतात.


५. मौखिक रूप: बोलीभाषा प्रामुख्याने बोलली जाते आणि ती लिखित स्वरूपात कमी वापरली जाते, जरी अनेक भाषांचा उगम बोलीभाषेतून झाला आहे.

६. बोली ही त्या-त्या प्रदेशातील समाज-संस्कृतीची अभिव्यक्ती असते.

७. बोलींमध्ये प्रादेशिक विविधता असते.

८. सामाजिक संदर्भानुसार बोलीभाषा बदलते.

९. बोलींभाषांतूनच प्रमाणभाषा आकाराला येते.


मराठीच्या बोली
कोकण
१.मालवणी
२. आगरी
३. वाड वळी
विदर्भ
१. वऱ्हाडी
२. नागपुरी
३. झाडी
४. हळबी
उत्तर महाराष्ट्र
१. अहिराणी
२. लेवा गणबोली
३.तावडी
४.देहवाली
दक्षिण महाराष्ट्र
१. कोल्हापुरी
२.चंदगडी
३. बेळगावी
पश्चिम महाराष्ट्र
१. पुणेरी
२. सोलापुरी
मराठवाडा
१.मराठवाडी
अन्य
१.ज्युदाव मराठी
२. नंदभाषा
३.नारायणपेठी
४. तंजावुर

**प्रदेशानुसार मराठीचे प्रादेशिक भेद** :

**महाराष्ट्रीय कोकणी, मालवणी, वाडवळी, कुपारी, सामवेदी, संगमेश्वरी, बाणकोटी, चित्पावनी, आगरी, ज्युदाव मराठी, मराठवाडी, झाडीबोली, नागपुरी, वऱ्हाडी, खानदेशी, लेवा गणबोली, अहिराणी, तावडी, चंदगडी, कोल्हापुरी, पुणेरी, देहवाली, बेळगावी, तंजावर मराठी (दक्षिणी मराठी), नंदभाषा, हलबी, डांगी, सोलापुरी** इत्यादी महाराष्ट्रात मराठीच्या बोलीभाषा बोलल्या जातात.

**कोकणातील मराठी बोली :**

**कोंकणी :** कोंकणी या नावाच्या अनेक बोली महाराष्ट्रातील कोकण, गोवा, उत्तर कर्नाटक या भागात बोलल्या जातात.चित्पावनी, मालवणी, बाणकोटी, संगमेश्वरी, काणकोणची कोंकणी, गोमंतकी, कारवारी, गावडी या बोलींना 'कोंकणी' संबोधले जाते.गोव्यातील गौड सारस्वत आणि ख्रिश्चनांकडून बोलल्या जाणाऱ्या कोंकणीला भारतात 'अधिकृत भाषे'चा प्राप्त आहे.वा.र.वालावलकर म्हणजे शणैगोयंबाब यांचा 'कोंकणीची व्याकरणी बादावळ'(१९४९) , डॉ.सु.म.कत्रे यांचा 'फॉरमेशन ऑफ कोंकणी'(१९४२), अ.का.प्रियोळकर यांचा 'ग्रांथिक मराठी भाषा आणि कोंकणी बोली' हा ग्रंथ इत्यादी ग्रंथ गोवन कोंकणीवर आधारित आहेत.महाराष्ट्रीय कोंकणी बोली मराठीच्या बोली आहेत.

**मालवणी बोली :** मालवणी बोलीला पूर्वी 'कुडाळी बोली' असे म्हटले जात असे.माल म्हणजे जमीन, वणी म्हणजे पाणी; ज्या प्रदेशाला जमीन आणि समुद्र

यांचे सान्निध्य आहे, अशा प्रदेशात बोलली जाणारी बोली म्हणजे ‘मालवणी बोली’ होय.

दक्षिण रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हा, उत्तर गोव्यापर्यंत असलेल्या प्रभावक्षेत्रात मालवणी बोली व्यवहारात वापरली जाते.हेल काढून काढलेले अनुनासिक उच्चार, ओकारान्तता ही मालवणीची काही व्याकरणिक वैशिष्ट्ये आहेत.मालवणीत वैशिष्ट्यपूर्ण शब्द, म्हणी, वाक्प्रचार आढळतात.मालवणीत कधी-कधी शिव्यांचा वापर प्रेम व्यक्त करण्यासाठी देखील केला जातो.दशावतारी लोकनाट्य, मच्छिंद्र कांबळी यांच्या ‘वस्त्रहरण’ सारख्या नाटकांमुळे मालवणी बोली विशेष लोकप्रिय झाली.डॉ.बाळकृष्ण लळित यांनी ‘मालवणी बोली’ वर विद्यापीठीय संशोधन केले आहे.विठ्ठल कृष्ण नेरूरकर हे मालवणी कवितेचे जनक मानले जातात.गंगाराम गवाणकर, सुंदर तळाशिलकर यांनी मालवणीत आशयगर्भ, विनोदी नाटके लिहिली आहेत.

**आगरी बोली :** उत्तर व मध्य कोकणात ‘आगरी’ ही मराठीची बोली बोलली जाते.आगरातले आगरी, गवळी, कुणबी; किनारपट्टीवरील कोळी, खारवी, भोई ही आगरी बोली बोलतात.आगरी बोली प्रामुख्याने रायगड, ठाणे या जिल्ह्यांत बोलली जाते.भगवान लक्ष्मण पाटील यांची ‘संगीत जमीनदार’ व ‘संगीत कुळकायदा’ ही दोन आगरी नाटके इ.स. १९३०-३५ दरम्यान प्रसिद्ध झाली. म.ना.पाटील यांच्या ‘रसमाधुरी’ (१९६५) आणि ‘खलाटी’ (१९८०) या पुस्तकांनी आगरी बोलीतील लेखनाची सुरुवात केली

**वाडवाळी बोली :** 'वाडवळ' समाजात बोलली जाणारी वाडवळी ही मराठी भाषेची उत्तर कोकणातील एक बोलीभाषा आहे.वाडवळी ही एक सामाजिक

भाषा असून, समाजाला एकत्र आणणारे महत्त्वाचे साधन आहे. उत्तर कोकणात ठाणे, पालघर जिल्ह्यांत सागरी किनाऱ्यालगत 'वाडवळी बोली' बोलली जाते.सोमवंशी पाठारे समाज, सोमवंशी क्षत्रिय समाज हे शेतीवाडी करणारे लोक म्हणजे 'वाडवळ' व त्यांची बोली म्हणजे 'वाडवळी बोली' होय.प्रामुख्याने वसई परिसरात ही बोली दैनंदिन व्यवहारात वापरली जाते.

**डांगी बोली :** गुजरातच्या डांग जिल्ह्यात डांगी बोली बोलली जाते.डांग जिल्ह्याचा ६५० चौरस मैलाचा प्रदेश हा डांगी बोलीचा प्रभावक्षेत्राचा आहे.दांग म्हणजे अरण्य, यावरून प्रदेश व बोलीला नाव प्राप्त झाले आहे. डांगी बोली या खानदेशी व गुजरातीमधील संक्रमक बोली आहेत. त्यामुळे गुजराती व मराठी या दोन्ही भाषांशी तिचे पुष्कळ साम्य आहे.खानदेशीशी असलेले तिचे साम्य अत्यंत निकटचे आहे. डॉ.सु.बा.कुलकर्णी यांनी लिहिलेला 'भिल्ली ऑफ डांग्ज'(१९७६) हा ग्रंथ डांगी बोलीवरील आहे.

**विदर्भातील मराठी बोली :**

विदर्भात वऱ्हाडी, नागपुरी, झाडी, हळबी या प्रमुख मराठीच्या बोली बोलल्या जातात.

**वऱ्हाडी बोली :** बुलढाणा, वाशिम, अकोला, यवतमाळ, अमरावती, वर्धा या विदर्भातील सहा जिल्ह्यांत वऱ्हाडी बोलीभाषा बोलली जाते.मध्ययुगीन महानुभाव साहित्यात वऱ्हाडी शब्द वैपुल्याने आढळतात.डॉ.सु.म.डोळके यांच्या मते "वऱ्हाडी मराठी ही एकीकडून अंशतः प्राचीन व आद्य मराठी असून, दुसरीकडून आधुनिक मराठीपासून व व्याकरणमान्यतेपासून दूर असलेली मराठीची प्रमुख प्रादेशिक बोली आहे." उद्धव शेळके, प्रतिमा इंगोले, सदानंद

देशमुख यांच्या साहित्य वऱ्हाडी बोलीतच आहे.डॉ. विठ्ठल वाघ यांनी वऱ्हाडी बोलीवर संशोधन केले आहे.

**नागपुरी बोली :** महाराष्ट्रातील पूर्व विदर्भात नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांतील काही भाग, मध्यप्रदेश-छत्तीसगढ मधील शिवनी, छिंदवाडा, बालाघाट, रायपुर येथे प्रचलित असलेली मराठी बोली म्हणजे 'नागपुरी बोली' होय.नागपुरी ही वऱ्हाडीपेक्षा वेगळी बोली आहे.नागपुरीवर हिंदीचा प्रभाव आढळतो.डॉ.व.कृ.वऱ्हाडपांडे यांनी 'नागपुरी बोली'(१९७२) या प्रबंधाचे लेखन केले आहे.

**झाडी बोली :** भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या विदर्भातील चार जिल्ह्यांचा भूप्रदेश 'झाडीपट्टी' म्हणून ओळखला जातो.झाडीपट्टीतील मराठीची बोली म्हणजे 'झाडीबोली' होय.मराठीतील ण्, छ्, श्, ष्, ळ् ही पाच व्यंजने झाडीबोलीत नाहीत.आद्यकवी मुकुंदराजाच्या 'विवेकसिंधू 'त शब्द आजही झाडीबोलीत उपयोजले जातात.झाडीबोलीतील लोकरंगभूमी विशेष समृद्ध आहे. डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांनी झाडी बोली संशोधन केले आहे.

**हळबी बोली :** महाराष्ट्रातील विदर्भातील चंद्रपूर, भंडारा, एलिचपूरचा टापू; मध्यप्रदेश-छत्तीसगढ मधील बस्तर, कांकेर, रायपूर हे हळबी बोलीचे कार्यक्षेत्र आहे.हळबी बोलीवर हिंदीचा प्रभाव आढळतो. हळबी बोलीच्या भौगोलिक स्थानामुळे वऱ्हाडी-नागपुरीप्रमाणे तिच्यावर शब्दांच्या संदर्भात छत्तीसगढी हिंदीचा व ओडियाचा पगडा अधिक आहे.आर्. ए. सिंग यांनी आपल्या 'सर्व्हे ऑफ हळबी इन मध्य प्रदेश' (१९७७) या ग्रंथ हळबी बोलीवरील संशोधन ग्रंथ आहे.

**उत्तर महाराष्ट्रातील मराठी बोली :**

उत्तर महाराष्ट्रात अहिराणी, लेवागण बोली, तावडी, खानदेशी, देहवाली या प्रमुख मराठीच्या बोली बोलल्या जातात.

**अहिराणी बोली :** जळगाव जिल्ह्यातील सावळदबारा, मलकापूर, मध्यप्रदेशतील बऱ्हाणपूर- अंतुर्लीपर्यंतच्या विस्तृत प्रदेश अहिराणीचे प्रभावक्षेत्र आहे. शब्दांमध्ये नाद-लय हे अहिराणीचे विविक्षित वैशिष्ट्य आहे.बहिणाबाई चौधरी, भालचंद्र नेमाडे, ना.धों.महानोर, के.नारखेडे, श्रीराम अत्तरदे यांच्या साहित्य-काव्यात अहिराणी शब्द येतात.बहिणाबाईंनी लेवा गणबोलीत काव्य निर्माण केले.डॉ.सुधीर देवरे यांनी अहिराणी भाषा व लोकसंस्कृती यांवर संशोधन व लेखन केले आहे.

**लेवा गणबोली** - तापी, पूर्णा, वाघुर आणि गिरणा या नद्यांच्या प्रदेशात शेतीव्यवसाय असलेल्या लेवा पाटीदार समाजाची वस्ती आहे. या व्यवसायात मदतनीस असणाऱ्या बारा बलुतेदारांनीही हीच बोली संपर्कभाषा म्हणून स्वीकारली आहे. म्हणूनच तिला ‘लेवा गणबोली’ असे संबोधले जाते. जळगाव जिल्ह्याच्या पूर्व भागात आणि लगतच्या बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूरपर्यंतच्या परिसरात तसेच मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर, शहापूर पर्यंतच्या भागात लेवा बोली बोलली जाते. लेवा बोलीतील शब्दांमध्ये नाद आणि लय हे या बोलीचे वैशिष्ट्य आहे. बहिणाबाई चौधरींच्या कवितांमधून लेवा गणबोलीचा आविष्कार दिसतो. भालचंद्र नेमाडे, के.नारखेडे, श्रीराम अत्तरदे या लेखकांनीही आपल्या साहित्यात या बोलीचा वापर केला आहे.

**तावडी बोली :** जामनेर, भुसावळ, जळगाव, बांदवर, रावेर, यावल या प्रदेशात तावडी बोली बोलली जाते.तावडी बोलीत क् च्या जागी ख् या व्यंजनाचा वापर केले जातो.अशोक कौतिक कोळी यांच्या साहित्यात तावडी बोलीचे उपयोजन आढळते.

**देहवाली बोली :** देहवाली ही भिल्ल समाजात प्रचलित असलेली मराठीची बोली आहे.या बोलीवर गुजराती-हिंदीचा प्रभाव आढळतो.देहवालीत गुजरातीशी मिळतीजुळती वाक्यरचना दिसते.महाराष्ट्रात नंदुरबार, धुळे या भागात ही बोली बोलली जाते.खळवाड, मेवासी हे दोन उपप्रकार देहवालीत आहेत.ळ्, क्ष्, ज्ञ् ही व्यंजने देहवळी बोलीत नाहीत, तर छ्, श्, ष् या व्यंजनांऐवजी स् हे एकच व्यंजन वापरले जाते.चामुलाल राठवा यांनी ‘देहवाली भिली शब्द चित्रावली’ या नावाने देहवाली मौखिक लोकसाहित्याचे संकलन केले आहे.विश्राम वळवी, देवेंद्र सावे, बळवंत वळवी, सोबजी गावीत यांनी या भाषेत लेखन केले आहे.

**दक्षिण महाराष्ट्रातील मराठीच्या बोली :**

दक्षिण महाराष्ट्रात कोल्हापुरी, चंदगडी, बेळगावी या प्रमुख मराठी बोली बोलल्या जातात.

**कोल्हापुरी बोली :** कोल्हापूर भागात मराठीची कोल्हापुरी बोली बोलली जाते.रांगडेपणा, शिव्यांचा वापर, रसरशीतपणा, ठसकेबाजपणा, दमदार उच्चार इत्यादी कोल्हापुरी बोलीचे मुख्य विशेष आहेत.आनंद यादव यांच्या झोंबी, गोतावळा या कादंबऱ्या कोल्हापुरी बोली भाषेत अभिव्यक्त झालेल्या आहेत.

**चंदगडी बोली :** महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागात बोलली जाणारी मराठी बोली म्हणजे 'चंदगडी बोली' होय.मराठी, कन्नड, कोंकणी भाषांच्या प्रभावातून चंदगडी आकाराला आलेली दिसते.महाराष्ट्र शासनाने चंदगडी बोलीला बोलीभाषेचा दर्जा दिला आहे.गोपाळ गावडे यांनी 'उंबळट' ही कादंबरी चंदगडी बोलीत लिहिलेली आहे.प्रा.परसू गावडे यांनी नाटक, तर जयवंत जाधव यांनी 'वळणं आणि वळण' आत्मकथनाचे लेखन या बोलीत केले आहे.डॉ.नंदकुमार मोर यांनी चंदगडी बोलीवर संशोधनात्मक लिखाण केले आहे.

**बेळगावी बोली :** महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील मराठीवर प्रामुख्याने कोकणी, कन्नड, उर्दू, फारसी आणि इंग्रजी या भाषांचा प्रभाव आहे. मराठीनेही कन्नड भाषेला बऱ्यापैकी कवेत घेतले आहे. तिला 'बेळगावी मराठी' असे म्हणतात. बेळगाव सीमाभागात बोलली जाणारी मराठी बोली म्हणजे 'बेळगावी बोली' होय.कन्नड, चंदगडी, कोल्हापुरी, कोंकणी या भाषांच्या संमिश्रणातून बेळगावी बोली निर्माण झालेली आहे. श्रवणबेळगोळ येथे बाहुबलीच्या मूर्तीच्या पायाशी अकराव्या शतकात कोरलेले 'चामुंडराये करवियले' या वाक्याची संरचना बेळगावी मराठीप्रमाणे आहे. पु.ल.देशपांडे यांनी आपल्या 'रावसाहेब' या व्यक्तिचित्रणपर ललितगद्यात बेळगावी बोलीचा सम्यक वापर केला आहे. प्रकाश नारायण संत लिखित 'लंपन' या व्यक्तिरेखेवर आधारित मालिका कथांमध्ये बेळगावी बोलीभाषेचे विपुल उपयोजन आढळते.

**पश्चिम महाराष्ट्रातील मराठीच्या बोली :**

पश्चिम महाराष्ट्रात मराठीच्या पुणेरी, सोलापुरी इत्यादी बोली बोलल्या जातात.

**पुणेरी बोली :** पुणेरी बोली ही मराठी भाषेतील एक प्रादेशिक बोली आहे, जी पुण्यात आणि आसपासच्या परिसरात बोलली जाते.काही लोक या पुणेरी बोलीला प्रमाण मराठी मानतात.  तांत्रिकदृष्ट्या पुणेरी बोलीत व्याकरणाचे नियम पाळले जातात, तसेच इतर मराठी बोलींप्रमाणेच या बोलीतही वेगळेपण आहे.'पुणेरी' हा शब्द या शहराच्या वैशिष्ट्यपूर्ण भाषेसाठी किंवा स्वभावासाठी वापरला जातो. व्याकरणशुद्धता, ठसकेबाजपणा हे पुणेरी बोलीचे विशेष आहेत.

**सोलापुरी बोली :** सोलापूर जिल्ह्यातील बहुभाषिक समाजाच्या संपर्कातून निर्माण झालेली सोलापुरी बोली ही मराठी भाषेतील एक वेगळी बोली आहे. या बोलीत मराठी, हिंदी, कन्नड आणि तेलुगू या भाषांतील शब्दांचे मिश्रण आढळते, त्यामुळे या बोलीला एक विशिष्ट ओळख प्राप्त झाली आहे. शब्दांचे बहुभाषिक स्वरूप, बहुभाषिक सामाजिक-सांस्कृतिक प्रभाव, शब्दसंग्रह इ.सोलापुरी बोलीचे विशेष आहेत.लक्ष्मीनारायण बोल्ली, मारुती चितमपल्ली यांनी आपल्या साहित्यात सोलापुरी बोलीचे उपयोजन केले आहे.लक्ष्मीनारायण बोल्ली यांच्या ‘एका साळीयाने’ या आत्मकथनात सोलापुरी बोलीचे मनोज्ञ दर्शन घडते.सैराट या चित्रपटात मराठीच्या सोलापुरी बोलीचा सुंदर अंतर्भाव केलेला आहे.

**मराठवाड्यातील मराठीच्या बोली :** मराठवाड्यात मराठवाडी ही मराठीची बोली प्रचलित आहेत.

**मराठवाडी बोली :** मराठवाडी बोली ही महाराष्ट्राच्या मराठवाडा प्रदेशात बोलली जाणारी मराठीची एक प्रमुख बोली आहे, जी संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांत विशेष

प्रचलित आहे. या बोलीवर उर्दू, कानडी आणि तेलगू या भाषांचा प्रभाव दिसून येतो, तसेच तिच्यात प्रादेशिक संस्कृतीची खास झलक आढळते. मराठवाडी बोली कमी शब्दांत अधिक सूचकता देणारी असून, अनेकदा प्रमाणभाषेतील लांब वाक्ये या बोलीत दोन शब्दांतच व्यक्त होतात. विस्तृत भौगोलिक व्याप्ती व प्रभावक्षेत्र, सूचकता, संत साहित्याचा प्रभाव, बहुभाषिक प्रभाव हे मराठवाडी बोलीचे विशेष आहेत. प्र. ई. सोनकांबळे यांच्या 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनात्मक ललितगद्यसंग्रहात मराठवाडी बोलीचे सौंदयपूर्ण उपयोजन करण्यात आले आहे.

**मराठीच्या इतर बोली :**

**ज्युदाव मराठी बोली :** बेने इस्त्रायली लोकांकडून बोलली जाणारी ज्युदाव मराठी ही मराठी भाषेची एक बोली आहे. ज्युदाव मराठी या बोलीमध्ये मराठी भाषेसोबत हिब्रू आणि अरामाइक भाषेतील शब्द तसेच काही भाषिक वैशिष्ट्ये आढळतात.सध्या ही बोलीभाषा भारत व इस्त्रायलमध्ये राहणाऱ्या बेने इस्त्रायली समाजात बोलली जाते. इस्त्राइलमध्ये बेने इस्त्रायली मराठी समाजाकडून 'मायबोली' हे मराठी त्रैमासिक प्रसिद्ध केले जाते.

**नंदभाषा :** नंद भाषा ही एक व्यापारी लोकांची सांकेतिक भाषा आहे. विसोबा खेचराचे काही शंकर स्तुतीपर अभंग, महिपतीच्या विसोबा खेचरासंबंधाच्या कांहीं ओव्या व तुकारामाचे काही क्षेपक अभंग यांत ही भाषा सांपडते. ज्ञानेश्वराच्या मध्ययुगीन यादव काळापासून आजपर्यंत म्हणजे सुमारे आठशे वर्षे ही भाषा महाराष्ट्रात अस्तित्वात आहे. ही व्यापाऱ्यांची सांकेतिक भाषा असून, यात संख्यावाचक शब्द व नाण्यांचे शब्द यांच्याबद्दलच संकेत आहेत.

**नारायणपेठी बोली :** स्वकुळ साळी समाजाची वैशिष्ट्यपूर्ण मराठी बोली म्हणजे 'नारायणपेठी बोली' होय. ही बोली बोलण्यास सहज सुलभ, ऐकण्यास गोड आणि मवाळ असून विणकर समाजाची स्वतंत्र अशी वैशिष्ट्यपूर्ण बोली आहे. हैदराबाद येथील उस्मानिया विद्यापीठाचे माजी मराठी विभागप्रमुख श्रीधर रंगनाथ कुलकर्णी यांनी 'तेलंगणातील मराठा समाज : भाषा आणि संस्कृती' या संशोधन प्रबंधामध्ये नारायणपेठी बोलीचा विस्तृत अभ्यास केलेला आढळतो.

**तंजावर मराठी :** दक्षिण भारतात तामिळनाडू मधील तंजावर या ठिकाणी प्रचलित मराठीची बोली म्हणजे 'तंजावर मराठी' किंवा 'तंजावुर मराठी' होय.एका लाखापेक्षा जास्त लोक ही बोली बोलतात. तंजावर मराठी बोली सतराव्या शतकात तंजावरच्या मराठा राज्याच्या काळात तेथे स्थलांतरित झालेल्या मराठी लोकांचे वंशज वापरतात. तंजावर मराठीत प्राचीन मराठीतील शब्द आहेत, तसेच या बोलीवर स्थानिक तमिळ भाषेचा प्रभाव दिसतो. 'दक्षिणी मराठी' हे यूट्यूब चॅनल या बोलीच्या जतनासाठी कार्यरत आहे. 'https://vishnugharforum.blogspot.com/' हा ब्लॉग तंजावुर मराठीच्या प्रसारासाठी कार्यरत होते.

**समारोप :**

थोडक्यात मराठीच्या सुमारे ५६ बोलीभाषा महाराष्ट्र, बृहन्महाराष्ट्रात दैनंदिन व्यवहारात वापरल्या जातात.मराठीचे बोलीवैविध्य हे मराठीच्या समृद्धतेचे लक्षण आहे.मराठीच्या प्रादेशिक बोलींमध्ये विविधता व वैचित्र्य आढळते.मराठीच्या बोली मराठीला समृद्ध व श्रीमंत करणाऱ्या आहेत, यात काही शंका नाही.

# ब्राह्मी लिपी : उत्पत्ती, स्थिती-गती

भारतीय परंपरा सांस्कृतिक-साहित्यिक वारश्याच्या जतनासाठी मौखिकतेवर भर देते, त्यामुळे भारतात लिपी पुष्कळ काळानंतर निर्माण झाली.लिपी हा शब्द संस्कृत शब्द 'लिप्' ह्या धातूपासून आला आहे, त्याचा एक अर्थ 'लिहिणे' असा आहे.प्राचीन फारसी भाषेत 'दिपी' हा शब्द लेखन किंवा शिलालेख ह्यासंदर्भात वापरलेला दिसतो.'दिपी' हा शब्द सुमेरियन 'डुप'वरून फरसिमध्ये आला. 'दिपी'वरूनच भारतीय भाषांमध्ये 'लिपी' शब्द रूढ झाला, असे अभ्यासक शॉर्फे मानतो.भारतात वाचता येऊ शकणारी, आज उपलब्ध असलेली सर्वात प्राचीन लिपी 'ब्राह्मी लिपी' आहे.प्राचीन काळात बहुजनांची प्राकृत भाषा आणि अभिजनांची संस्कृत भाषा ब्राह्मी लिपीतच लिहिली जात असे.इसवी सन पूर्व कालखंडात संपूर्ण भारतात लेखनासाठी ब्राह्मी लेखन पद्धतीचाच वापर केला जात असे.वायव्य भारतात 'खरोष्ठी लिपीचा वापर होत असे. ब्राह्मी लिपीला 'धम्मलिपी' असेही म्हणतात.इ.स.१८८० मध्ये लाथ, लाट, दक्षिणी अशोकन लिपी, भारतीय पाली लिपी, मौर्य लिपी ह्या नावांनी ब्राह्मी ओळखली जात असे.ब्राह्मी लिपीतील सर्वात जुने शिलालेख 'प्राकृत'भाषेत दिसतात. ब्राह्मी लिपीतील 'संस्कृत'भाषेतील शिलालेख इ.स. पूर्व पहिल्या शतकातील आहेत.१९ व्या शतकात ईस्ट इंडिया कंपनी राजवटीत कोलकात्ता येथील 'एशियाटिक सोसायटी ऑफ बॅगाल' ह्या संस्थेतील सचिव सर जेम्स प्रिन्सेप(इ.स.१७९९-१८४०) ह्या लिपीशास्त्रज्ञाने इ.स.१८३७ मध्ये ब्राह्मी लिपीची सर्वप्रथम उकल

केली. ब्राह्मी लिपीत स्वर-व्यंजनांना स्वतंत्र चिह्न आहेत.काना, मात्रा, वेलांटी, उकार हा प्रकार ब्राह्मी लिपीत दिसत नाही.पाली भाषा लिहिण्यासाठी ब्राह्मी लिपीत ८ स्वर, ३२ व्यंजने, १ अनुनासिक चिह्न अशी एकूण ४१ चिन्हे होती.पुढील काळात प्राकृत भाषा लिहिण्यासाठी ऐ, औ हे स्वर, श्, ष् ही व्यंजने लिहिण्यासाठी ब्राह्मी लिपीत चिन्हे समाविष्ट झाली, अश्याप्रकारे ४५ चिन्हे ब्राह्मी लिपीत आहेत.इ.स.पूर्व तिसऱ्या शतकात ब्राह्मी लिपी पूर्णपणे विकसित झाली.ब्राह्मी लिपीत डावीकडून उजवीकडे लिहिण्याची पद्धत आहे.मौर्य काळ (इ.स.पू.तिसरे शतक) ते गुप्त काळ (इ.स.चौथे शतक) हा ब्राह्मी लिपीचा कालखंड मानला जातो.सर्वात जुने ब्राह्मी शिलालेख सम्राट अशोकाचे असून, इ.स.पू.२५० ते २३२ ह्या काळातील आहेत. ब्राह्मी लिपी तत्कालीन एका किंवा अधिक सिमेटिक लिपीनतून निर्माण झाली, असे काही लिपी अभ्यासकांचे मत आहे.काही लिपीशास्त्रज्ञ ब्राह्मीचा संबंध सिंधुलिपीशी जोडतात. अलेक्झांडर कनिंगहॅम (१८१४-९३) यांच्या मताप्रमाणे भारतीय चित्रलिपीवरून ब्राह्मी लिपीची उत्पत्ती झाली असावी.काही विद्वान ब्राह्मी लिपीचा उद्गम दक्षिण भारतात झाला, असे मानतात.जैन परंपरेत प्रथम तीर्थंकर ऋषभदेवाची कन्या ‘बांभी’ ही ब्राह्मी लिपी निर्माती आहे, असे म्हटले आहे. ‘पन्नवणा सूत्र’, ‘प्रज्ञाप्तिसूत्र’, ‘समवायांग सूत्र’ ह्या जैन ग्रंथात ब्राह्मीचा उल्लेख ‘बांभी लिपी’ असा आला आहे.बौद्ध ग्रंथ ‘ललितविस्तर सूत्र’(इस.२००-३००) मध्ये ‘लिपिशाला समदर्शन परिवार्ता’ ह्या दहाव्या अध्यायात ६४ लिपींची सूची दिली आहे, ज्याची सुरुवात ब्राह्मीने होते.ब्राह्मण परंपरेत ब्राह्मणांनी ब्राह्मी लिपीचा अगोदर वापर केला, असे म्हटले आहे.अल्-बीरूनीच्या मते पाराशर ऋषीचा पुत्र व्यास ह्याने ब्राह्मी लिपी निर्माण केली.शार्फे ह्या अभ्यासकाने ब्राह्मी

लिपीचा उद्भव ‘अॅरेमाईक लिपी’वरून झाला असे गृहितक मांडले आहे.“ब्राह्मी अशोकाच्या राजवटीपूर्वी दीर्घ कालावधीत निर्माण झाली असावी” असे केनेथ नॉर्मन(२००५) सुचवतात.संगणक शास्त्रज्ञ सुभाष काक, आध्यात्मिक शिक्षक डेव्हिड फॉली, सामाजिक मानववंशशास्त्रज्ञ जॉर्ज स्टाईन ह्यांच्याकडून ब्राह्मीच्या स्वदेशी उत्पत्तीचा सिद्धांत मांडण्यात आला आहे.ब्राह्मीचा ‘ब्रह्माची स्त्री शक्ति’ असा अर्थ होतो.ब्राह्मी लिपीचिन्हे काठी आकृतीसारख्या दिसतात, म्हणून एके काळी इंग्रजीत ब्राह्मी लिपीला ‘पिन मॅन स्क्रिप्ट’ किंवा ‘स्टिक फिगर स्क्रिप्ट’असेही म्हणत.

**ब्राह्मी लिपीचे कालानुक्रमानुसार प्रकार**

ब्राह्मी लिपीचे अशोककालीन ब्राह्मी लिपी, कुषाणकालीन ब्राह्मी लिपी, गुप्तकालीन ब्राह्मी लिपी असे तीन कालानुक्रमानुसार प्रकार पडतात.

१. अशोककालीन प्रारंभिक ब्राह्मी लिपी(इ.स.पू.तिसरे शतक ते इ.स.पू.पहिले शतक) - अशोककालीन ब्राह्मी लिपी नियमित व भौमितिक दिसते. ह्या कालखंडातील ब्राह्मी लेखन अधिक तर्कसंगत दिसते.नेपाळमधील लुंबिनी शिलालेख, विदिशा शिलालेख हे शिलालेख अशोककालीन ब्राह्मी लिपीत दिसतात.


२. मध्य ब्राह्मी लिपी/कुषाणकालीन ब्राह्मी लिपी(इ.स. पहिले शतक ते इ.स.तिसरे शतक) - मध्य ब्राह्मी लिपी अधिक गोलाकार दिसते.ह्या कालखंडात ब्राह्मी लेखनात चिन्हाच्या आकारात लक्षणीय बदल झाला.चष्टनच्या नाण्यांवरील ब्राह्मी, क्षत्रपांचे शिलालेख, मनमोडी

शिलालेख हे शिलालेख मध्य ब्राह्मी लिपी/कुषाणकालीन ब्राह्मी लिपीत दिसतात.

३. उत्तरकालीन ब्राह्मी लिपी/गुप्तकालीन ब्राह्मी लिपी(इ.स.चौथे शतक ते इ.स.पाचवे शतक) - कान्हेरी लेण्यातील शिलालेख, बाराबार शिलालेख(बिहार), गोपिका गुहा(अनंतवर्मन) शिलालेख, सांची शिलालेख हे शिलालेख उत्तरकालीन ब्राह्मी लिपी/गुप्तकालीन ब्राह्मी लिपीत दिसतात.

एका सहस्त्रकाच्या काळात ब्राह्मी लिपी अनेक प्रादेशिक लिप्यांमध्ये परिवर्तीत झाली. गुप्तकालीन ब्राह्मी लिपी-सिद्ध लिपी-शारदा लिपी-नागरी लिपी अशी लिपी परिवर्तने झाली. नागरी लिपीचे देवनागरी आणि नंदिनागरी असे परिवर्तन झाले. दक्षिण भारतीय ब्राह्मी लिपीवर आधारित बेबायिन लिपी(फिलिपाईन्स), जावनीज लिपी(इंडोनेशिया), ख्मेरलिपी(कंबोडिया), मोन लिपी(म्यानमार) ह्या उदयाला आल्या.

# ब्राह्मी लिपीचा विकास


इजिप्तशियन चित्रलिपी
आद्य सिनाई लिपी (प्रोटो सिनेटिक लिपी)
फोनिशियन लिपी
ॲरेमाईक लिपी
ब्राह्मी लिपी
उत्तर भारतीय ब्राह्मी
दक्षिण भारतीय ब्राह्मी (तमिळ ब्राह्मी)
गुप्तकालीन ब्राह्मी लिपी
वट्टेळुत्तु लिपी
सिद्ध लिपी
तमिळ लिपी
नागरी लिपी

## ब्राह्मी लिपीची वैशिष्ट्ये

१. ब्राह्मी लिपी ही भारतातील सर्वात जुन्या ज्ञात लिप्यांपैकी एक आहे.

२. ब्राह्मी लिपीची उत्पत्ती इ.स.पू.तिसऱ्या शतकातील असल्याचे मानले जाते.

३. ब्राह्मी लिपीचे लेखन सामान्यतः डावीकडून उजवीकडे केले जाते.

४. ब्राह्मी लिपी ‘अबुगिडा’ लेखनपद्धतीत येते, ज्यामध्ये व्यंजने आणि स्वर वेगळे दर्शविले जातात.

५. ब्राह्मी लेखनपद्धतीत विरामचिन्हे अपवादात्मक स्थितीमध्येच दिसतात.

६. सम्राट अशोकाच्या शिलालेखांमध्ये ब्राह्मी लिपीचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात गेला आहे.

७. भारतातील संस्कृत, प्राकृत, पाली ह्या प्राचीन भाषा आणि भारतीय संस्कृती समजून घेण्यासाठी ब्राह्मी लिपीचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

# ब्राह्मी लिपी वर्णमाला



## ब्राह्मी लिपी आणि महाराष्ट्री प्राकृत(आद्य मराठी)


सातवाहन काळात आजचा महाराष्ट्र हा महारठी प्रदेश होता.महारठ्ठी भाषा बोलणारे ;लोक ज्या प्रदेशात राहतात तो प्रदेश म्हणजे 'महारठी प्रदेश' होय.सातवाहन कालखंडात महाराष्ट्री प्राकृत(आद्य मराठी) ही प्रशासकीय आणि राजभाषा होती.नाणेघाट हा आजच्या जुन्नर म्हणजे तत्कालीन जीर्णनगर व कोकण ह्यांना जोडणारा व्यापारी मार्ग होता.ह्या नाणेघाटमध्ये सातवाहन शासक गौतमीपुत्र सातकर्णीची राणी आणि अंगियकुलवर्धन वंशातील त्रनकयिरनामक महारठीची कन्या नागणिका हिने निर्माण केलेला २२३१ वर्षापूर्वीचा शिलालेख(निर्मिती काळ - इ.स.पू.दुसरे-पहिले शतक) आहे, ह्या शिलालेखामध्ये तिने केलेल्या वैदिक यज्ञाचे, दानांचे वर्णन आहे.ह्या शिलालेखात तत्कालीन सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक परिस्थितीचे वर्णन मिळते.हा शिलालेख महाराष्ट्री प्राकृतात(आद्य मराठी) असून ब्राह्मी लिपीत आहे. "महारठीनो अंगीय कुल वधनस सगरगिरीवलयाय पथविय पथम विरस वस य महतो मह." असा उल्लेख शिलालेखात आहे, ज्याचा अर्थ "महारठी अंगीय कुळातील गिरीसमुद्र वलयांकित पृथ्वीवरील वीरश्रेष्ठ असा पुरुष." असा होतो.हा मराठी भाषेचा उल्लेख प्रस्तुत ब्राह्मी शिलालेखात मिळतो.ह्या शिवाय कार्ला लेणी, नाशिक त्रिरश्मी लेणी इत्यादी ठिकाणी महाराष्ट्री प्राकृतातील(आद्य मराठी) शिलालेख ब्राह्मी लिपीत आढळतात. कार्ला लेणी चैत्यगृहासमोरील सिंहस्तंभावर "महारठीस गोतिपुत्रस अगिमित्रणकस सिहय भी दानं." असा मराठी भाषेचा स्पष्ट उल्लेख आहे, ज्याचा अर्थ "गोटीचा मुलगा महारठी अग्निमित्र याने सिंहस्तंभाची देणगी

दिली.” असा आहे.एकूणच प्राचीन काळात मराठी भाषा ब्राह्मी लिपीत लिहिली जात असे, हे समजते.

संदर्भ ग्रंथसूची


१. ओझा गौरीशंकर, भारतीय प्राचीन लिपिमाला, दिल्ली, १९५९.
२. गोखले शोभना, ‘ब्राह्मी लिपि’ नोंद लेख, मराठी विश्वकोश

# ब्राह्मी लिपी



**सारनाथ अशोक स्तंभावरील ब्राह्मी लिपी (इ.स.पू. २५०)**



**पाले जैन लेणीमधील महाराष्ट्री प्राकृतातील आद्य शिलालेख**

# देवनागरी लिपी : उद्गम आणि विकास

आज संपूर्ण विश्वात एकूण ७१५१ भाषा बोलल्या जातात. भाष् म्हणजे बोलणे. 'भाष्' ह्या धातूपासून 'भाषा' हा शब्द निर्माण झाला आहे. बोलली जाते ती भाषा होय. भाषा 'ध्वन्यात्मक'असते, तसेच भाषा चिन्हात्मक देखील असते. लिपी शब्द 'लिप्' ह्या मूळ धातूपासून निर्माण झाला आहे. 'लिप्' म्हणजे लिंपणे, माखणे, सारवणे होय. 'लिख्' म्हणजे कोरणे, त्यापासून लेखन हा शब्द निर्माण झाला. जगात बोलल्या जाणाऱ्यां ७०% भाषा 'रोमन'(लॅटिन) लिपीमध्ये लिहिल्या जातात. भाषा आणि लिपी ह्या दोन वेगवेगळया संकल्पना आहेत. कोणतीही भाषा कोणत्याही लिपीत लिहिली जाऊ शकते. जगात भाषेसाठी वापरली गेलेली पहिली लिपी चित्रलिपी होती. भारतात देखील सिंधू संस्कृतीमध्ये चित्रलिपीचा वापर केला गेला.


भारतात प्राचीन कालखंडात ब्राह्मी, खरोष्ठी ह्या लिपी भाषा लेखनासाठी वापरल्या जात होत्या. सम्राट अशोकाने आपले शिलालेख ब्राह्मी लिपीत कोरलेले आहेत. आजची मराठी भाषा तिच्या जन्मकाळापासूनच 'देवनागरी' लिपीत लिहिली जाते. मध्ययुगीन काळात देवनागरी बाळबोध लिपीबरोबरच मोडी लिपीचा वापर मराठी भाषा लेखनासाठी केला जाई. देवनागरी ही बऱ्याच भारतीय भाषांची प्रमुख लेखन पद्धती आहे. देवनागरी लिपी भारतातील एकूण १९४ भाषा लिहिण्यासाठी वापरली जाते. भारतात हिंदी, मराठी, नेपाळी, कोकणी, संस्कृत व बोडो या सहा अधिकृत भाषांसाठी देवनागरी वापरली जाते. राजस्थानी ही भारतात अधिकृत स्थान नसलेली, परंतु

साहित्य अकादमीने मान्यता दिलेली भाषादेखील देवनागरीमध्ये लिहिली जाते. भारत आणि नेपाळ ह्या राष्ट्रांमध्ये देवनागरी लिपीला अधिकृत लिपीचे स्थान प्राप्त आहे.

**देवनागरीचा परिचय :**

देवनागरी लिपी ही अबुगिडा लेखनपद्धतीमध्ये मोडते. देवनागरी लिपी डावीकडून उजवीकडे लिहिली जाते. देवनागरीला 'नागरी लिपी' असेही म्हणतात. देवनागरीचा विकसन काळ बराच मोठा आहे. तिसऱ्या शतकातील ब्राह्मी ही सर्व भारतीय लिप्यांची मातृलिपी आहे. देवनागरीचा विकास ख्रिस्तपूर्व ५०० मध्ये असलेल्या तत्कालीन ब्राह्मी लिपीपासून झालेला आहे. देवनागरीचा इसवी सन आठव्या शतक ते इसवी दहावे शतक ह्या कालखंडात विकास झालेला दिसतो. इसवी १० व्या शतकाच्या आरंभी अखिल भारतात देवनागरी लिपीचा अंगीकार केलेला दिसतो. साधारणतः इसवी सनाच्या बाराव्या शतकात देवनागरी लिपी लेखनपद्धती स्थिरावली. देवनागरी लिपीत प्रत्येक शब्दावर शिरोरेषा ओढली जाते. देवनागरी ही एक ध्वन्यात्मक लिपी आहे, त्यामुळे ती एक वैज्ञानिक लिपी मानली जाते. देवनागरी लिपीत बहुतांश ध्वनींसाठी स्वतंत्र वर्ण आहे. मराठी देवनागरी लिपीला 'बाळबोध लिपी' असेही म्हटले जाते.देवनागरी लिपीत एकूण ५२ अक्षरे असून त्यात १६ स्वर आणि ३६ व्यंजने आहेत. देवनागरी वर्णमालेतील स्वर-व्यंजन, कोमल-कठोर, अल्पप्राण-महाप्राण, अनुनासिक, अन्तस्थ, उष्म हे वर्गीकरण वैज्ञानिक आहे. देवनागरी लिपीतील अक्षरांचा क्रम देखील वैज्ञानिक आहे. देवनागरी लेखनाच्या दृष्टीने सरळ, सुंदर लिपी असून वाचनाच्या दृष्टीने सुपाठ्य लिपी

मानली जाते. देवलोक आणि नागरलोक यासंबंधी विविध प्रकारच्या लेखनासाठी उपयोजिली जाणारी लिपी ती ‘देवनागरी लिपी ‘होय. देवनागरीला ‘नागरी’, ‘देवनागर’, ‘लोकनागरी’, ‘नंदिनागरी’ असे पर्यायवाची शब्द देखील वापरले जातात.





असा देवनागरी लिपीचा क्रमशः विकास झालेला दिसतो. देवनागरी ही जगातील चौथी सर्वात जास्त वापरली जाणारी लेखनपद्धती आहे.

ब्राह्मी लिपीपासून देवनागरीचा विकास



## .स.१८४३ मधील ज्ञानेश्वरीचे हस्तलिखित



# मराठी मुळाक्षरे

## स्वर

अ आ इ ई उ ऊ ए ऐ ओ औ अं अः ॲ ऑ ऋ

## व्यंजन

क ख ग घ ङ च छ ज झ ञ


ट ठ ड ढ ण त थ द ध न

प फ ब भ म य र ल व


श ष स ह ळ

क्ष ज्ञ त्र

मराठी मुळाक्षरे.कॉम



भारतीय भाषा आणि लिपी




देवनागरी वर्णमाला

**देवनागरीचा इतिहास :**

देवनागरी लिपी सुमारे १००० वर्षे प्राचीन लिपी आहे. इसवी सातव्या शतकापासून वापरात असलेली देवनागरी लिपी इसवी सनाच्या अकराव्या शतकात परिपक्व झालेली दिसते. जैनांच्या प्राचीन 'ललित विस्तार' नामक ग्रंथात भारतात वापरल्या जाणाऱ्या ६४ लिप्यांचा उल्लेख आहे, त्यातल्या एका लिपीचे नाव नागरी लिपी आहे. देवनागरीतील प्राचीनतम शिलालेख, ताम्रपट दक्षिण भारतात आढळतात. देवनागरीतील शिलालेख दक्षिण भारतात इसवी आठव्या शतकातील सापडतात, तर उत्तर भारतात देवनागरीतील शिलालेख इसवी सनाच्या दहाव्या शतकानंतरचेच आढळले आहेत. कर्नाटकातील पट्टदकल शिलालेख (इ.स.आठवे शतक), हिमाचल प्रदेशातील ज्वालामुखी शिलालेख, मध्यप्रदेशातील उदयगिरी शिलालेख (इ.स.अकरावे शतक) इत्यादी शिलालेखांमध्ये देवनागरीचा वापर केलेला आढळतो. देवनागरी लिपीतील पहिला शिलालेख गुजरातमध्ये असून तो राजा जयभट्ट ह्याचा आहे. वाङ्मयेतिहासानुसार इसवी सनाच्या आठव्या शतकात राष्ट्रकुट राजवटीतील राजांनी देवनागरी लिपी प्रचलित केली. इसवी सनाच्या नवव्या शतकात बडोद्याचा ध्रुवराज ह्याने आपले सर्व शासन आदेश देवनागरीत काढले. देवनागरी लिपीचा संबंध गुजरातच्या नागर ब्राह्मणांशी जोडला जातो. देवनागरीचा प्रथम उल्लेख इसवी सनाच्या ८५३ मधील जैन ग्रंथांमध्ये मिळतो. देवनगर काशीत देवनागरीचे प्रचलन असल्याने तिला ‘देवनागरी’ म्हटले असा देखील एक कयास लावला जातो. महाराष्ट्रातील ‘नंदीनगर(नंदिग्राम)’मध्ये

देवनागरी लिपीचा जन्म झाला म्हणून तिला ‘देवनागरी’ नाव पडले असे काही अभ्यासकांचे मत आहे. राष्ट्रकुट राजा दंतदुर्ग ह्याचे सर्व ताम्रपट देवनागरीतच आहेत. राष्ट्रकुट राजवटीत देवनागरीला ‘नंदिनागरी’ म्हणत. इसवी सनाच्या १६ व्या शतकापर्यंत हेच नाव प्रचलित होते.राष्ट्रकुट राजा तिसरा गोविंद ह्याच्या ताम्रपटात देवनागरी संमिश्रित स्वरुपात आढळते. वणी-दिंडोरी व राधणपूर (बनासकाठा) ताम्रपटात नागरी लिपीचे जुने स्वरूप दिसते. गुर्जर वंशीय राजांच्या ताम्रपटात सह्या देवनागरीत मात्र ताम्रपट दक्षिणात्य ब्राह्मी लिपीत आढळतो. परमारवंशीय राजा दुसरा वाक्पतीराज ह्या राजाच्या ताम्रपटात सह्या देवनागरीतच आहेत. विजयनगर साम्राज्यात अनेक शिलालेख, दानपत्रांमध्ये देवनागरीचा वापर केलेला दिसतो. इसवी सन ८०० ते ११०० ह्या काळात उत्तरेकडील नागरी लिपी दक्षिण नागरी लिपीपेक्षा भिन्न होती.

प्राचीन कालखंडात देवतांच्या प्रतिमा बनविण्याच्या पूर्वी देवतांची सांकेतिक चिन्हांद्वारे पूजा केली जात असे, त्यात अनेक प्रकारच्या त्रिकोणासारख्या यंत्रांचा समावेश असायचा. ह्या यंत्रांना ‘देवनगर’म्हणतात. त्या देवनगरामध्ये लिहिली जाणारी सांकेतिक चिन्हे नंतर अक्षर मानली गेली. ह्या अक्षरांनाच ‘देवनागरी’ हे नाव दिले गेले, असा रुद्रपट्टण शामाशास्त्री ह्यांचा सिद्धांत आहे. देवनागरीपासूनच कैथी(मैथिली भाषा), मोडी(मराठी भाषा), गुरमुखी(पंजाबी भाषा), महाजनी(मारवाडी भाषा), शारदा(काश्मिरी भाषा) ह्या लिप्या निर्माण झाल्या. देवनागरी अक्षरांना मुरड घालून घसरत्या पद्धतीने लिहिण्याच्या प्रथेतून ‘मोडी’ ही मराठीची लिपी निर्माण झाली. दहाव्या शतकात देवनागरीपासूनच ‘पूर्व नागरी लिपी’(बंगाली आसामी लिपी) चा उद्भव झाला.

**देवनागरी : मराठीची आद्यलिपी**

मराठीच्या जन्मापासूनच मराठी भाषेची लिपी ‘देवनागरी’आहे. मराठीतील आद्य शिलालेखांपैकी श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराच्या मुर्तीखालील डाव्या बाजूचा “श्रीचामुंडराये करवियले श्रीगंगाराजे सुत्ताले करवियले” हा शिलालेख देवनागरी मराठीतच आहे. रायगड जिल्ह्यातील मराठीतील आद्य असा “गीं सुष संतु। स्वस्ति ओं। पसीमस-मुद्राधिपती। स्री कोंकणा चक्री-वर्ती । स्री केसीदेवराय ।........” हा अक्षीचा शिलालेख (इ.स.१०१२) देवनागरी लिपीतच आहे. सोलापूर उमरगा रस्त्यावर हत्तरसंग कुडल संगम येथील हेमाडपंथी संगमेश्वर मंदिराच्या गर्भगृहाच्या तुळईवर शके ९४०(इ.स.१०१८) मध्ये कोरलेला ‘यवाछि तो विजेया हो ऐवा’ हा मराठी शिलालेख देवनागरीतच आहे. दिवेआगरचा ताम्रपट हा शके ९८२ (इ.स.१०६०) मधील देवनागरी मराठी ताम्रपट आहे. इ.स. १६६४ ते १९०० ह्या काळातील मराठा साम्राज्यातील शिक्के, राजमुद्रा देवनागरीतच होत्या. तंजावूर (तंजावर), तामिळनाडू येथील बृहदेश्वर मंदिराच्या भिंती व खांबांवर अनेक देवनागरी मराठी शिलालेख कोरलेले आहेत.


**देवनागरी लिपीची वैशिष्ट्ये:**

१. ध्वन्यात्मकता : प्रत्येक चिन्हासाठी एक विशिष्ट ध्वनी असतो.
२. वैज्ञानिकता : प्रत्येक अक्षराचा एक निश्चित अर्थ असतो व ते एकापेक्षा जास्त ध्वनी दर्शवत नाही.
३. सरळता : देवनागरी लिपी शिकणे सोपे आहे, कारण तिची अक्षरे आणि रचना स्पष्ट आहे.

४. व्यापकता : देवनागरी लिपी अनेक भाषांमध्ये वापरली जाते, ज्यामुळे ती एक व्यापक लिपी आहे.
५. लेखन : नेहमी देवनागरी डावीकडून उजवीकडे वाचता येते तसेच लिहिता येते. देवनागरी लिपीतील चिन्हे (वर्ण) हे उभ्या, आडव्या तसेच गोलाकार, वक्र आणि तिरप्या अशा रेषाखंडांनी बनलेले आहेत.
६. परिपूर्णता : देवनागरी लिपी ही इतर लिप्यांपेक्षा पुष्कळशी पूर्ण लिपी आहे.

८ सप्टेंबर १९४९ मध्ये राज्यघटना कलम ३४३ नुसार ‘देवनागरी’ लिपीला ‘राष्ट्रीय लिपी म्हणून घोषित करण्यात आले. भारत शासनाने जुलै २०१० मध्ये भारतीय रुपया ह्या चलनाचे प्रतीक चिन्ह म्हणून ‘Rs’ चा स्वीकार केला. ‘Rs’ हे भारतीय चलन चिन्ह देवनागरी ‘र’ ह्या अक्षरापासुनच तयार केलेले आहे. जानेवारी २०२२ मध्ये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्रातील सर्व दुकाने, आस्थापनांवर देवनागरी लिपीतील  मराठी भाषेत साईन बोर्ड लावणे अनिवार्य केले आहे.

मराठीच्या विकासात देवनागरीचे अतुल्य योगदान आहे. देवनागरीमुळेच ‘मराठी’ने भाषिक प्रदेशाच्या सीमारेषा ओलांडल्या आहेत.




**श्रवणबेळगोळ शिलालेख**

बृहदेश्वर मंदिर, तंजावर



# दिवेआगर ताम्रपट



मराठीतला आद्य ताम्रपट-दिवेआगर ताम्रपट शकवर्ष ९८२

# मोडी लिपी : उद्गम, विकास आणि ऱ्हास

## भाषा आणि लिपी

ऋषीचे कुळ आणि नदीचे मूळ शोधण्यासारखेच मानवी भाषेचे वय व उत्पत्ती शोधणे क्लिष्ट आहे.उत्खननात सापडलेले अवशेष, भाषांचा ऐतिहासिक अभ्यास, संप्रेषण पद्धतीचा तुलनात्मक अभ्यास इ. सहाय्याने भाषाभ्यासकांनी मानवी भाषेच्या उत्पत्ती संदर्भात कयास बांधले आहेत.सामान्यतः दोन लाख ते साठ हजार वर्षापूर्वी मानवी भाषा अस्तित्वात आली, असे बहुतांश भाषाभ्यासक म्हणतात.संवादाच्या गरजेतून भाषा निर्मिती झाली. 'बोलणारा प्राणी' अशी माणसाची व्याख्या केली जाते.भाषा हे माणसाचे व्यवच्छेदक लक्षण आहे.भाषांच्या लिपींची परंपरा पाच हजार वर्षांपेक्षा अधिक नाही.'चिन्हात्मकता' हे भाषेचे वैशिष्ट्य लिपीमुळेच प्राप्त होते.आज संपूर्ण जगात अनेक लिप्या अस्तित्वात आहेत.बोलली जाते ती भाषा.भाषा लिहिण्याची लेखनपद्धती म्हणजे 'लिपी' होय.लिपी हे मौखिक भाषेला दृश्य परिमाण देणारे साधन आहे. कोणतीही भाषा कोणत्याही लिपीत लिहिली जाऊ शकते.

जगात चित्रलिपी ही भाषा लेखनासाठी वापरली जाणारी पहिली लिपी मानली जाते.प्राचीन इजिप्त संस्कृती, भारतीय सिंधु संस्कृती, प्राचीन चीनी संस्कृती, माया संस्कृती इत्यादी संस्कृतीत भाषा लेखनासाठी चित्रलिपीच वापरली गेली.आज प्राचीन इजिप्त संस्कृतीतील चित्रलिपी वाचता येते, परंतु भारतीय सिंधु संस्कृतीतील चित्रलिपी वाचता येत नाही.रोमन-लॅटिन लिपी, फारसी-

अरबी लिपी, देवनागरी लिपी ह्या जगातील सर्वात जास्त वापरल्या जाणाऱ्या लिप्या आहेत.जगातील ७० टक्के भाषा रोमन-लॅटिन लिपीत लिहिल्या जातात.जगातील १५ ते ३० भाषा फारसी-अरबी लिपीत लिहिल्या जातात, तर १९४ भाषा लिहिण्यासाठी देवनागरी लिपीचा वापर केला जातो. आज IPA (International Phonetic Alphabets) ह्या आंतरराष्ट्रीय उच्चाराधिष्ठित लिपीचा वापर केला जातो.

**मोडी लिपीचा कालक्रमिक विकास**

मराठी भाषा बाळबोध देवनागरी लिपीत लिहिली जाते, परंतु मराठी मोडी लिपीत देखील केली जात असे. मध्ययुगीन कालखंडात मराठी लिहिण्यासाठी देवनागरी तसेच मोडी लिपीचे उपयोजन केले जात असे. मराठीतील मध्ययुगीन ऐतिहासिक दस्तऐवज मोडीतच आहे. मध्ययुगीन कालखंडात मराठी धार्मिक ग्रंथ लेखन करण्यासाठी देवनागरी लिपी वापरले जात असे, तर प्रशासकीय कामे पत्रव्यवहार ह्यांमध्ये मोडी लिपीचा वापर केला जात असे. मोडी लिपी इसवी सनाच्या बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात यादव राजवटीत अस्तित्वात आली.यादव राज्यसभेतील मुख्य प्रधान किंवा श्रीकरणाधिप 'हेमाद्री पंडित' उपाख्य 'हेमाडपंत' ह्यांच्या पुढाकाराने मोडी लिपीला राज्यव्यवहारात स्थान मिळाले. मोडी ही मराठी भाषेची दुसरी व जलद लिपी मानली जाते. इसवी सनाचे बारावे शतक ते विसावे शतक ह्या शतकांपर्यंत मराठी भाषा देवनागरीबरोबर मोडी लिपीमध्ये देखील लिहिली जात असे. इतका प्रदीर्घ काळ मोडी लिपी मराठी लेखन व्यवहारात उपयोजली जात होती. १५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मोडी लिपीला उतरती कळा लागली

आणि मोडी अज्ञातवासात गेली.आज मराठी लेखन व्यवहारात मोडी लिपी वापरात नसली, तरी महाराष्ट्राच्या इतिहास संशोधनाचे कार्य मोडी लिपीविना पूर्ण होणे अशक्य आहे,  यासाठीच मोडी जतन मोडीचे संवर्धन होणे अत्यावश्यक आहे.

**मोडी लिपीची वैशिष्ट्ये**

१. मोडी लिपी मराठी भाषेची जलद लिपी आहे.
२. जलद लेखन : मोडी लिपीतील अक्षरे एकमेकांना जोडलेली असल्याने आणि कमी वळणांची असल्याने ती देवनागरी लिपीपेक्षा वेगाने लिहिता येते, त्यामुळे ऐतिहासिक कागदपत्रे, पत्रव्यवहार आणि इतर लिखाण जलद करण्यासाठी मोडीचा वापर केला गेला.
३. मोडी लिपी देवनागरी लिपीतूनच निर्माण झाली आहे.
४. अक्षरांची वेगळी रचना : मोडी लिपीतील अक्षरे देवनागरी लिपीतील अक्षरांपेक्षा वेगळी दिसतात. काही अक्षरे थोडीशी वक्र किंवा जोडलेली असतात.
५. शब्दावरील शिरोरेघ, सर्व वेलांटी दीर्घ असणे, सर्व उकार ऱ्हस्व असणे हे मोडी लिपीचे विशेष आहेत.
६. कमी वळणे : मोडी लिपीतील अक्षरे काढायला सोपी आणि कमी वळणे असलेली आहेत, ज्यामुळे लिखाण जलद होते.
७. मोडी लिपीतील सर्व ई-कार दीर्घ असतात, तर सर्व उ-कार ऱ्हस्व असतात.
८. मोडी लिपीतील दहा अक्षरे देवनागरीसारखी असून,काही अक्षरे स्वतंत्र स्वरूपाची आहेत.

आज उपलब्ध असलेला सर्वात जुना मोडी लिपीतील मराठी लेख इसवी सन १३८९ चा आहे. मोडी लिपी इसवी सन १२६० ते १३०९ पर्यंत राज्य करणाऱ्या महादेव यादव व रामदेव यादव यांच्या कारकिर्दीत हेमाडपंतांनी सुरू केली, असे इतिहासाचार्य वि.का.राजवाडे म्हणतात. ‘लिपी’(१९२९) ह्या पुस्तकात लेखक गो.का.चांदोरकर मोडी लिपी हेमाडपंतांनी लंकेतून आणली अशी दंतकथा सांगतात, परंतु ही दंतकथा खरी मानता येत नाही. मुद्रण युगामुळे मोडी लिपी मागे पडली. मोडी लिपी इसवी सनाच्या तेराव्या शतकापासून विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत मराठी भाषा लेखनाची प्रमुख लिपी होती.हेमाद्री पंडिताने मोडी लिपीचा विकास केला. शिकस्ता लिपीप्रमाणे मोडी लिपी देखील हात न उचलता जलद लिहिता येते.पेशवेकालीन मोडी लिपीत चिटणिशी, महादजीपंती, बिवलकरी, रानडी अशी वळणे प्रसिद्ध आहेत.मोडी लिपी महाराष्ट्रात मराठी लेखनासाठी कमीतकमी ९०० वर्षे वापरात होती. मोडी लिपी पेशवाई काळात अत्यंत उत्कर्षावस्थेत होती.

**मराठी मोडी लेखनाबद्दल ज्ञानेश्वरीतील उल्लेख**

१. हे बहु असो पंडितु ! धरूणु बालकाचा हातु !!
वोळी लेहे वेगवंतु ! आपणाची !! (ज्ञानेश्वरी अध्याय क्र.१३, ओवी क्र.३०७)

२. सुखाची लिपी पुसिली !! (ज्ञानेश्वरी अध्याय क्र.३, ओवी क्र. ३४६)

३. दोषांची लिहिली फाडी !! (ज्ञानेश्वरी अध्याय क्र ४, ओवी क्र. ५३)

४. आखरे पुसलिया ना पुसे ! अर्थ जैसा !! (ज्ञानेश्वरी अध्याय क्र ८, ओवी क्र. १७४)

डेव्हिड डिरिंजरच्या ‘अल्फाबेट’ ह्या ग्रंथामध्ये मध्ये मोडी लिपी शिवाजी महाराजांचा चिटणीस बाळाजी आवजी यांनी शोधली, अशी दंतकथा दिली आहे; पण ती चुकीची आहे. मोडी लिपी तिरकस वळण, अधिक वर्तुळाकार आणि सुटसुटीत अक्षरे लिहिण्याचा उपक्रम छत्रपती शिवाजी महाराजांचे चिटणीस बाळाजी आवजी यांनी सुरू केला. शिवकाळापर्यंत मोडी टाकाने लिहिली जात असे.पेशवेकाळात मराठी मोडी लेखन बोरूने होत असे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रजी राजवटीत मराठी मोडी लेखनासाठी फाउंटन पेनचा वापर सुरू झाला. कर्नाटकात नवव्या शतकातील मराठी भाषेतील शिलालेख मोडी लिपीतील आढळले आहेत.

प्राचीन काळात भूर्जपत्र-ताडपत्रावर लेखन केले जात असे.कागदावरील लिखाण ही पद्धती नंतरच्या काळात अस्तित्वात आली.प्राचीन काळात पक्ष्यांची पिसे, बोरू इत्यादी सामग्रीच्या सहाय्याने लेखन केले जात असे.देवनागरी लेखन कागदावर करणे, त्याच्या मुळाबरहुकुम नक्कल प्रती निर्माण करणे अतिशय क्लिष्ट होते.लेखनात सहजता-सुकरता व्हावी, ह्यासाठी मोडी लिपी निर्माण झाली. ‘वेगवान व वेळ वाचवणारी लिपी’ म्हणून मोडी लिपी अस्तित्वात आली.मोडी ही मध्ययुगातील मराठी भाषेची लिपी आहे, ती भाषा नव्हे.मोडी लिपी कधी निर्माण झाली? ह्या प्रश्नाचे उत्तर स्पष्ट देता येणार नाही.काही अभ्यासक मोडी लिपीचा उद्गम सम्राट अशोकाच्या काळापर्यंत नेतात. इ.स.१२६० मध्ये यादव साम्राज्यातील करणाधिप हेमाडपंडित किंवा हेमाद्रीपंतांनी मोडी लिपीचा शोध लावला, असा काही लिपी अभ्यासकांचा कयास आहे

**<u>मोडी लिपीचा विकास</u>**

आद्य सिनाई लिपी (प्रोटो सिनेटिक लिपी)

↓

फोनिशियन लिपी

↓

अॅरेमाईक लिपी

↓

ब्राम्ही लिपी

↓

गुप्त लिपी

↓

सिद्ध लिपी

↓

नागरी लिपी

↓

मोडी लिपी

मराठी देवनागरी आणि मोडी वर्णमाला

**स्वर**


अ, आ, अॅ, ऑ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ऌ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः

**व्यंजन**

क, ख, ग, घ, ङ, च, छ, ज, झ, ञ, ट, ठ, ड, ढ, ण, त, थ, द, ध, न, प, फ, ब, भ, म, य, र, ल, व, श, ष, स, ह, ळ, क्ष, ज्ञ

**मराठी देवनागरी वर्णमाला – एकूण ५२ वर्ण**

# मराठी मोडी वर्णमाला


अ आ इ ई उ ऊ ऋ ॠ ऌ ॡ ए ऐ ओ औ अं अः
क ख ग घ ङ च छ ज झ ञ ट ठ ड ढ ण
त थ द ध न प फ ब भ म य र ल व श
ष स ह ळ ळ का कि की कु कू के कै को कौ कं कः
१ २ ३ ४ ५ ६ ७ ८ ९

मोडी हे मोडी लिपीचे नाव म्हणून नाही, तर लेखनाची शैली म्हणून प्राप्त झाले.फारसी-उर्दू भाषा लिहिण्यासाठी नस्तालिक लिपीचे जलद रूप म्हणून 'शिकस्ता' वापरली गेली.शिकस्ता ह्या संज्ञेचे मराठी हुबेहूब रुपांतर म्हणजे 'मोडी' होय.मोडी म्हणजे मोडून-मुरडून लिहिणे होय.कागदावर अखंड, जलद लिहिण्यासाठी देवनागरी लिपी मोडून मोडी अस्तित्वात आली.इतिहासाचार्य वि.का.राजवाडे ह्यांनी 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' ह्या ग्रंथात आठव्या खंडात मोडी लिपी उद्गम, विकास, नामकरणाबद्दल सांगितले आहे.मध्ययुगीन काळातील मराठा साम्राजाची ९० टक्के कागदपत्रे, दस्तऐवज, कार्यालयीन पत्रे, खाजगी कागद, जन्म-मृत्युच्या नोंदी, जमिनीचे कागद, वंशावळ, मृत्युपत्र(उईलपत्र), बक्षिसपत्र, कर्जखाते, दस्त इत्यादी प्रशासकीय कागदपत्रे तसेच बखर वाड्मय, रुमाल वाड्मय हे साहित्य मोडी लिपीतच आहेत.मध्ययुगीन काळात महाराष्ट्रात राज्यकारभारात मोडीचा वापर होत होता. काळानुरूप मोडी लिपीत बदल होत गेलेला दिसतो.इ.स.१९५० मध्ये तत्कालीन मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर ह्यांनी शासनव्यवहारातून मोडी लिपीला वगळले.मोडीचे अस्तित्व सुमारे ९०० वर्ष अबाधित राहिले आहे.यादव राजवटीत मोडी लिपीचा मराठी भाषा लिहिण्यासाठी वापर सुरु झाला.मोडी लिपीचे सहा ऐतिहासिक कालखंड खालीलप्रमाणे

१. यादवकालीन मोडी लिपी कालखंड – इ.स.११ वे शतक ते इ.स.१२ वे शतक
२. बहामनीकालीन मोडी लिपी कालखंड – इ.स.१३ वे शतक ते इ.स.१५ वे शतक

३. शिवकालीन मोडी लिपी कालखंड – इ.स.१६५६ ते इ.स.१७०० पर्यंत
४. पेशवेकालीन मोडी लिपी कालखंड – इ.स. १८ वे शतक
५. आंग्लकालीन मोडी लिपी कालखंड – इ.स. १८०० ते इ.स.१९५० पर्यंत
६. अर्वाचीन मोडी लिपी कालखंड – इ.स.१९५० नंतरचा कालखंड

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण ह्यांनी १९६० मध्ये मोडी लिपी पुनरुज्जीवनाचा प्रयत्न केला. इ.स.२०१६ मध्ये आलेल्या ‘ह्युएन-त्सांग(Xuanzang)’ ह्या चीनी चित्रपटात मोडी लिपीचा वापर केला गेलेला दिसतो.

मोडी लिपीच्या वैशिष्ट्यामुळे मोडी लिपीला पिशाच्च लिपी, राक्षस लिपी, भूत लिपी असे देखील म्हटले गेले.मोडीवर इतर लिपींचा प्रभाव दिसतो, परंतु देवनागरीपासूनच मोडी आविष्कृत झाली आहे.मोडी लिपी ही मराठीची स्वतःची लिपी व स्वतंत्र ओळख आहे.मोडी ही मराठीची शीघ्र लिपी मानली जाते.मराठा साम्राज्याचा बराचसा इतिहास मोडी लिपीतच आहे.मोडी लिपी हा मराठीचा अमूल्य ऐतिहासिक ठेवा आहे.मोडी लिपीतील कागदपत्रे महाराष्ट्राबरोबर गुजरात, राजस्थान, गोवा, कर्नाटक ह्या भारतीय राज्यात, तर डेन्मार्क, इंग्लंड ह्या देशात आढळतात. मराठ्यांचे राजकारण जेथे जेथे गेले तेथे तेथे सार्वजनिक व खाजगी पत्रव्यवहार, हिशेब, ताळेबंद इ. मोडीत लिहिला जाई.राजस्थानातील बिकानेर आदी अभिलेखागारे, मद्रासच्या कोनेमारा विद्यापीठाचा ओरिएंटल मॅन्युस्क्रिप्ट विभाग, गोवा व केरळ येथील अभिलेखागारे आणि तंजावरच्या सरस्वतीमहालातील शेकडो कागद व

कैफियती मोडीत आहेत. भारत इतिहास संशोधक मंडळ, धुळ्याचे राजवाडे संशोधन मंदिर, लंडन-पॅरिस-स्पेन-हॉलंडच्या संग्रहालयांतही मोडी कागदपत्रांचा संग्रह आहे.


मोडी लिपीचे देवनागरी, गुर्जरी(महाजनी), पूर्व नागरी(बंगाली) लिपींशी साधर्म्य आहे.पूर्वी गुजराथी आणि बंगाली भाषा देवनागरी लिपीत लिहिल्या जात असत, परंतु तेथील भाषा बोलणाऱ्यांनी हट्टाने वेगळ्या लिपीची उभारणी करून ती वापरण्यास सुरुवात केली, परंतु मराठीने मात्र मोडी लिपीचा त्याग केला.विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत देवनागरी लिपीबरोबर मोडी लिपीचा वापर मराठी लेखनासाठी केला जात असे मराठी भाषेची मूळ असलेली मोडी लिपी पुन्हा लेखन करण्यास वापरात आणली, तर मराठी भाषेचा प्रभाव आणखी वाढेल. असे काही भाषाभिमान्यांना वाटते.आज मराठी भाषा-इतिहास ह्यांचा संशोधकात्मक अभ्यास करण्यासाठी मोडी लिपी शिकणे क्रमप्राप्त झाले आहे.

**संदर्भ ग्रंथसूची**


१. ओझा गौरीशंकर, भारतीय प्राचीन लिपिमाला, दिल्ली, १९५९
२. चांदोरकर, गो. का., आर्यलिपी, धुळे, १९२९.
३. फाटक, गो. वि., लेखनविज्ञान अथवा (मोडी लेखन पद्धती), मुंबई, १९३५.
४. गोखले शोभना, ‘ब्राह्मी लिपि’ नोंद लेख, मराठी विश्वकोश.

# मोडी लिपी

मोडी वर्णमाला




**मोडी लिपीत ज्ञानेश्वरीतील ओवी**



# महाराष्ट्री प्राकृतातील साहित्य : एक मागोवा

आद्य मराठीतील म्हणजेच महाराष्ट्री प्राकृतातील साहित्याचे वर्गीकरण महाकाव्ये, खंडकाव्ये, चरितकाव्ये, मुक्तक काव्ये, गद्यचरित्रे असे केले जाते. महाराष्ट्री प्राकृत भाषेतील साहित्याला इ.स. दहाव्या शतकानंतर बहर आलेला दिसतो. हेमचंद्र ह्या प्राकृत व्याकरणकाराने महाराष्ट्री प्राकृताचे व्याकरण लिहिले.




## महाराष्ट्री प्राकृतातील महाकाव्ये

महाराष्ट्री प्राकृतातील महाकाव्यांवर संस्कृत महाकाव्याचा प्रभाव दिसतो. महाराष्ट्री प्राकृतात सेतुबंध(इ.स.पाचवे शतक), गउडवहो (इ.स.७२५), लीलावई (इ.स.आठवे शतक), कुमार वालचरिय (इ.स.बारावे शतक), गोविंदाभिषेक (इ.स.तेरावे शतक) इत्यादी महाकाव्ये उल्लेखनीय दिसतात. प्रवरसेन वाकाटकाचे सेतुबंध महाकाव्याला रावणवहो, दशमुखवध अशीही

नावे आहेत.वानरसेनेने लंकेवरील स्वारीकरिता बांधलेला सेतू व रामाने रावणाचा केलेला वध ह्या विषयसूत्रावर सेतुबंध महाकाव्य आधारलेले आहे.'सेतुबंध' हे महाराष्ट्री प्राकृतातील सर्वश्रेष्ठ महाकाव्य मानले जाते.वाक्पतीराज हा गउडवहो ह्या महाकाव्याचा कर्ता आहे.कनौजचा राजा यशोवर्मा ह्याचा दिग्विजय व गौड राजाचा वध ह्या कथानकावर गउडवहो हे महाकाव्य आधारित आहे.लीलावई ह्या महाकाव्याचा निर्माता कौऊहल (कौतुहल) हा आहे, ह्या महाकाव्याचा विषय ' प्रतिष्ठानचा राजा सातवाहन आणि सिंहल देशाची राजकन्या लीलावती ह्याची प्रेमकथा' हा आहे. कुमार वालचरिय ह्या महाकाव्याचा कवी वैय्याकरणी हेमचंद्र असून ह्या महाकाव्याला 'द्वाश्रय काव्य' असेही म्हणतात.ह्या महाकाव्याच्या निर्मितीमागे कवी हेमचंद्राचे दोन हेतू दिसतात. 'सिद्धहेम' ह्या व्याकरणग्रंथातील नियम समजावून सांगणे व जैनधर्मोपासक राजा कुमारपाल ह्याचे चरित्रकथन करणे. गोविंदाभिषेक हे महाराष्ट्री प्राकृतातील महाकाव्य बारा सर्गाचे असून, पहिले आठ सर्ग केरळकवीने रचलेले आहेत.उर्वरित चार सर्ग दुर्गाप्रसाद कवीने लिहिले आहे.वररुचीच्या 'प्राकृत प्रकाश' व त्रिविक्रमाच्या 'प्राकृत प्रकाश' ह्या दोन व्याकरण ग्रंथातील नियमाच्या विवेचनाची गोविंदाभिषेकाची निर्मिती झाली आहे.गोविंदाभिषेक ह्या काव्यातील प्रत्येक सर्गाच्या अखेरीस 'श्री'कार असल्याने ह्या काव्याला 'सिरीचिंधकाव्य'(श्रीचिन्हकाव्य)असेही म्हणतात. ह्या काव्यात काव्यसौष्ठव व रसवत्ता नाही. 'सोरिचरित'(शौरिचरित) हे इ.स.१७०० ह्या वर्षातील कवी कंठ ह्याने 'श्रीकृष्ण चरित्रा' वरील अपूर्ण काव्य असून ह्या काव्याचे केवळ चार आश्वास उपलब्ध आहे.'सोरिचरित' काव्यात काव्यचातुर्य दिसते, तसेच संस्कृत काव्याचा प्रभाव दिसतो.

## महाराष्ट्री प्राकृतातील खंडकाव्ये

महाराष्ट्री प्राकृतात कंसवहो(कंसवध), उसणिरुद्ध(उषा-अनिरुद्ध) ही खंडकाव्ये दिसतात.रामपाणिवाद ह्या केरळी कवीने ही दोन्ही खंडकाव्ये लिहिली आहेत. कंसवहो(कंसवध), उसणिरुद्ध(उषा-अनिरुद्ध) ही दोन्ही श्रीमद्भगवतावर आधारित खंडकाव्ये आहेत. उसणिरुद्ध(उषा-अनिरुद्ध) हे खंडकाव्य चार सागाचे असून त्यात २३३ पद्ये आहेत.उसणिरुद्ध(उषा-अनिरुद्ध) हे अलंकारिक काव्य असून त्यात विविध छंदांचे उपयोजन केले आहे.उसणिरुद्ध(उषा-अनिरुद्ध) ह्या काव्यावर संस्कृत काव्याचा विशेषतः 'शिशुपालवधा'चा प्रभाव दिसतो तसेच राजशेखराच्या प्राकृतातील 'कर्पूरमंजिरी' ह्या सट्टकाचा प्रभाव दिसतो. कंसवहो ह्या खंडकाव्यात शार्दूलविक्रीडित,उपजाति, उपेंद्रवज्रा, वसंततिलका, वंशस्थ या प्रसिद्ध वृत्तांसोबतच शालिनी, स्वागता, रथोद्धता, प्रहर्षिणि त्यांमध्ये या वृत्तांचाही समावेश आहे. तसेच वर्णन करताना उपमा, उत्प्रेक्षा, दृष्टांत, रूपक असे विविध अलंकार योजलेले आहेत. **कंसवहो**मध्ये **रामपाणिवाद** यांचा प्रचंड शब्दसंग्रह आढळतो. त्यांची भाषा अत्यंत साधी, सोपी असून संवाद, वर्णने या स्वरूपात त्यांनी विषयमांडणी केली आहे. काही ठिकाणी मोठे समास केले असून, त्यातून त्यांचे भाषाप्रभुत्व लक्षात येते. रामपाणिवाद यांची काव्यशैली फार सुंदर नसली तरी ती सामर्थ्यवान आहे. कंसवहोत कथानकाची उत्तम मांडणी, विषय हाताळण्याची सचोटी, भाषाप्रभुत्व तसेच उत्तम सादरीकरण ही वैशिष्टये आढळतात.

**महाराष्ट्री प्राकृतातील चरितकाव्ये**

धर्ममतांच्या प्रसारासाठी जैन पुराणांतर्गत चरितकाव्ये जैन कवींनी रचली. काही चरितकाव्ये काल्पनिक पात्रांभोवती गुंफलेली आढळतात. चरित्रनायकाच्या पूर्वजन्माचे वर्णन, उपाख्याने व धार्मिक प्रवचने, नायकाचे चरित्रवर्णन, नायकाच्या जन्मनगरीच्या सौंदर्याचे वर्णन, नायकाच्या मातापितरांचे वर्णन, जन्मादि पंचकल्याण, नायकाची कठोर तपस्या, समवशरण रचना, धर्मोपदेश, देशविहार, निर्वाण असा महाराष्ट्री प्राकृतातील चरितकाव्यांचा ठराविक साचा दिसतो. वाल्मिकी रामायणावर आधारित विमलसूरींचे 'पउमचरिउ'(पद्मचरित)हे इसवी सनाच्या तिसऱ्या-चौथ्या शतकातील चरितकाव्य महाराष्ट्री प्राकृतातील आद्य चरितकाव्य आहे. महाराष्ट्री प्राकृतातील इतर चरितकाव्ये इसवी सनाच्या दहाव्या शतकानंतरची आहेत.'पउमचरिउ' हे रामाचे चरित्र असून जैन मतानुसार रामकथा मांडली आहे.ह्यात रावण हा जिनेंद्रचा भक्त असून अग्निदिव्यातून बाहेर पडल्यानंतर सीता जैन धर्माची दीक्षा घेते, असे कथानक दिसते.

धनकेश्वराचे 'सुरसुंदरीचरिय' (इ.स.अकरावे शतक) हे सोळा परिच्छेदांचे काव्य असून प्रत्येक परिच्छेदात २५० पद्ये दिसतात.'सुरसुंदरीचरिय' ही एक सुंदर व प्रदीर्घ प्रेमकथा आहे. **चंद्रप्रभ महत्तराचे 'सिरि विजयचंद केवलिचरित** (इ.स.अकरावे शतक) ह्या चरितकाव्यात पूजेच्या अष्टविध द्रव्यांवर आठ कथा असून, त्या पार्श्वभूमीवर केवलिचे चरित्र दिले आहे. **वर्धमानसूरीकृत आदिनाहचरिय** (इ.स. अकरावे शतक), **श्रीचंद्रसूरीकृत मुणिसुव्वयसामिचरिय** (मुनीसुव्रतस्वामीचरित), **देवसूरीकृत**

**संतिनाहचरिय** (शांतिनाथचरित), **मलधारी हेमचंद्रकृत नमिनाहचरिय** (नेमिनाथचरित), **लक्ष्मणगणीकृत सुपासनाहचरिय**(सुपार्श्वनाथचरित), **वाटगच्छीय हरिभद्रकृत चन्दप्पहचरिय** (चंद्रप्रभचरित), **मल्लीनाहचरिय** (मल्लिनाथचरित), **नेमिनाहचरिय**(नेमिनाथचरित) ही चरिते, **सोमप्रभसूरींचे सुमतिनाहचरिय** (सुमतिनाथचरित), **मुनिभद्राचे संतिनाहचरिय** (शांतिनाथचरित) ही महाराष्ट्री प्राकृतातील काही उल्लेखनीय चरितकाव्ये आहेत.

**महाराष्ट्री प्राकृतातील गद्य-पद्यमिश्रित चरितकाव्ये**

शीलांकाचार्य(शिलाचार्य) ‘**चउपन्न-महापुरिस-चरिय**’ हे चरितकाव्य इ.स. नवव्या शतकात लिहिले. जैन धर्मातील शेवटच्या केवलीचे जंबूस्वामींचे चरित्र **'जंबूचरिय'** ह्या चरितात आले आहे.ह्या चरितात कालिदास, बाणभट्ट, माघ ह्या संस्कृत कवींच्या प्रभावाचा प्रत्यय येतो, तसेच मधून मधून संस्कृत श्लोक दिसतात. ह्यातील अनेक पदे **अवहट्ट** भाषेत म्हणजेच गुजरातच्या नागर अपभ्रंश भाषेत दिसतात. **गुणचंद्रकृत पासनाहचरिय** (पार्श्वनाथचरित), **नेमिचंद्रकृत रयणचूडरायचरिय** (रत्नचूडराजचरित) (इ.स.बारावे शतक) ह्या चरितांवर संस्कृतचा प्रभाव दिसतो. **बृहदगच्छीय नेमिचंद्राने भगवान महावीरांचे केवलज्ञानप्राप्तीपर्यंतचे महावीरचरिय** (इ.स.बारावे शतक)लिहिले, ह्यावर कालिदास, बाण इ.संस्कृत कवींच्या काव्याचा प्रभाव दिसतो.

## महाराष्ट्री प्राकृतातील मुक्तक काव्ये

एक श्लोकी स्वतंत्र रचना म्हणजे मुक्तक होय. महाराष्ट्री प्राकृतात **गाहासत्तसई** (गाथासप्तशती) आणि **वज्जालग्ग** हे मुक्तक रचनेचे संग्रह आहेत. गाहासत्तसई (गाथासप्तशती) ही गाथा छंदात लिहिलेला सातशे कवितांचा संग्रह सातवाहन राजा हाल ह्याने इसवी सनाच्या पहिल्या शतकात संकलित केला आहे.ह्या ग्रंथातील प्रत्येक गाथेतील कल्पना स्वयंपूर्ण असून ती वेचक व सूचक शब्दांत मंडळी आहे.विविध प्रकारच्या स्त्रियांच्या मनःस्थितीचे, प्रेमाच्या विविध अवस्थांचे, सुंदर निसर्गदृश्याचे, मदनोत्सवासारख्या विशेष प्रसंगांचे चित्रण ह्या गाथांतून केले आहे.गाथा छंद, ज्याला गाथा असेही म्हणतात, हा भारतीय साहित्यात, विशेषतः प्राकृत भाषेतील कवितांमध्ये आढळणारा एक प्रकारचा श्लोक आहे. हा ३२ मात्रांचा श्लोक आहे, ज्यामध्ये प्रत्येकी १६ मात्रांच्या दोन ओळी असतात. प्रत्येक ओळीत १२+४ मात्रांचा क्रम असतो. गाथा हा छंद कथात्मक श्लोक, लोकगीते आणि धार्मिक ग्रंथांमध्ये वापरला जातो.

वज्जालग्ग ह्या गाथांचे संकलन जयवल्लभाने इसवी सनाच्या चौदाव्या शतकापूर्वी केले आहे. एकाच विषयावर जेथे अनेक गाथा म्हटल्या (संगृहीत केल्या) जातात, त्याला ‘वज्जालग्ग’ म्हणतात”. ‘वज्जा’ म्हणजे ‘पद्धती’ अशा आशयाचे स्पष्टीकरण ह्या ग्रंथातच दिलेले आहे.सज्जन, दुर्जन, दैव, दारिद्य, गज,सिंह, भ्रमर, प्रेम, ज्योतिषी, लेखन, वैद्य, वैश्या असा एकूण ९५ विषयांवरील गाथा वज्जालग्गात आहेत.

महाराष्ट्री प्राकृतात अज्ञात आचार्यकृत 'वैराग्यशतक', लक्ष्मीलाभगणीकृत 'वैराग्यसायनप्रकरण' व पद्मानंदीचे 'धम्मरसायन' ही इतर मुक्तक काव्ये लिहिली आहेत.

## महाराष्ट्री प्राकृतातील स्तोत्रे

संस्कृतप्रमाणेच महाराष्ट्री प्राकृतातील स्तोत्र वाङ्मय भक्तिपरिलुप्त दिसते, तसेच भाषाशैली व विचारांच्या दृष्टीने सुंदर आहे. महाराष्ट्री प्राकृतातील ही स्तोत्र परंपरा इ.स.१००० पूर्वीची दिसते. जोइंदूकृत 'निजात्माष्टक' हे स्तोत्र इ.स.६०० ते इ.स.१००० ह्या काळात लिहिले गेले. **नंदिषेणा**चे इ.स.नवव्या शतकातील **'अजित-संतिथव'**(अजितशांतिस्तव), **भद्रबाहू**चे **'उवसग्गहर**' (उपसर्गहर), **देवेंद्रसूरी**कृत **'शाश्वत चैत्यास्तव'**, **धनपालाचे 'ऋषभपंचाशिका', जिनवल्लभसूरीचे 'लघुअजित-संतिथव',** दिगंबर जैनांचे प्रमाणभूत स्तोत्र **'निर्वाणकांड'** ही महाराष्ट्री प्राकृतातील महत्त्वाची स्तोत्रकाव्ये आहेत. 'अजित-संतिथव' ह्या स्तोत्रात २५ छंदांची योजना आहे. 'उवसग्गहर' हे पार्श्वनाथ स्तुतीपर स्तोत्र आहे.'शाश्वत चैत्यास्तव' ह्या स्तोत्रात जैन भूगोलाची कल्पना मांडली आहे. 'लघुअजित-संतिथव' हे स्तोत्र नावाप्रमाणेच लघु असून, त्यात १७ गाथा आहेत.

## महाराष्ट्री प्राकृतातील अन्य पद्यसाहित्य

संस्कृत नाटके, प्राकृत सट्टकात महाराष्ट्री पद्ये आलेली आहेत.आनंदवर्धनाच्या 'ध्वन्यालोक', भोजाच्या 'सरस्वतीकंठाभरण', हेमचंद्राच्या 'काव्यानुशासन' ह्यात महाराष्ट्री गाथा आढळतात, ज्या गाथांमध्ये जनसामान्यांची भाव-भावना, मनमोकळा रांगडेपणा व्यक्त झालेला दिसतो. महाराष्ट्री प्राकृतातील श्रेष्ठ चंपूकाव्य उद्योतनसूरीकृत 'कुवलयमाला' (इ.स.७९९) ह्यात क्रोध इ.विकारांचे परिणाम दाखविणाऱ्या कथांची गुंफण दिसते.

## महाराष्ट्री प्राकृतातील कथाकाव्य साहित्य

**पादलिप्तसूरीची 'तरंगवईकहा'**(तरंगवतीकथा) ही महाराष्ट्रीतील अतिप्राचीन धर्मकथा आहे, परंतु आज ती उपलब्ध नाही.'तरंगवईकहा' ही एक वैराग्यप्रवर्तक प्रेमकथा आहे.'तरंगवईकहा' ह्या कथेचा संक्षेप **नेमिचंद्रगणिकृत 'तरंगलोला'** आज उपलब्ध आहे. **संघगणीदास आणि धर्मसेनगणीदास** ह्यांनी लिहिलेली '**वसुदेवहिंडी**'(इ.स.पाचवे शतक) ही कृष्णपिता वसुदेव ह्याची भ्रमणकथा असून ह्यात इतर अनेक कथा आलेल्या आहेत.'वसुदेवहिंडी' ही कथा गद्यात्मक समासान्तपदावलीत लिहिलेली असून ह्यात अधूनमधून पद्येदेखील आहेत. गुणाढ्याच्या आज लुप्त असलेल्या बृहत्कथेचे हे जैन रूपांतर असावे. 'वसुदेवहिंडी' ची तुलना **गुणाढ्याच्या 'बड्डकहा'**(बृहत्कथा)शी केली जाते. इसवी सनाच्या आठव्या शतकात **हरिभद्रसूरी**ने महाराष्ट्रीत '**धुत्तकखाण**' (धूर्ताख्यान) ह्या कथा लिहिल्या, त्यात ब्राम्हणी पुराणकथांचा विडंबनात्मक उपहास करणाऱ्या कथा आहेत. **हरिभद्रसूरीने 'समराइच्चकहा'** (समरादित्याची कथा) ही जादुई वास्तववाद असलेली कादंबरीसदृश्य कथा लिहिली.ह्या कथेवर बाणभट्टाच्या'कादंबरी', श्री हर्षाच्या 'रत्नावली'चा प्रभाव दिसतो. ह्यातील पद्यभाग आर्य छंदात आहे. श्वेतांबर आचार्य **जिनेश्वरसुरी** ह्यांनी इ.स.१०५२ मध्ये '**कहाणयकोस**'(कथाकोष प्रकरण) हा कथासंग्रह लिहिला, त्यात ३० गाथांमध्ये ३६ मुख्य व ४-५ अवांतर कथा आल्या आहेत.ह्या कथांमध्ये तत्कालीन समाज, समाजाचे आचार-विचार, राजनीती ह्यांचे प्रतिबिंब दिसते.

संवेगभावाचे प्रतिपादन करण्यासाठी जिनचंद्रसूरीने इ.स.११६८ मध्ये **'संवेगरंगशाला'** हा कथात्मक ग्रंथ लिहिला. **महेश्वरसूरी**ने **'णाणपंचमीकहा'** (ज्ञानपंचमी कथा) ह्या कथासंग्रहात २००० गाथांमध्ये ज्ञानपंचमी (कार्तिक शुद्ध पंचमी) चे महत्त्व सांगणाऱ्या कथा लिहिल्या आहेत. देवभद्रसुरी ह्याने इ.स. ११०१ मध्ये **'कहारयणकोस'** (कथारत्नकोश) ह्या कथासंग्रहात ५० गद्य-पद्य लौकिक कथा लिहिल्या असून, ह्यात महाराष्ट्रीबरोबर संस्कृत, प्राकृत भाषांचा उपयोग केला आहे**. नेमिचंद्रसूरीने 'अक्खाणमणिकोस'** (आख्यानमणिकोश) हा पद्यातील कथासंग्रह लिहिला आहे. पद्मचंद्रसूरीचा शिष्य **अज्ञातनामाने 'विक्कमसेनचरिय'**(विक्रमसेनचरित) हा चौदा कथांचा कथासंग्रह लिहिला, ह्यातील कथा दानशीलता, तप, भावना सभ्यकत्व, अनित्यता ह्या विषयांवर आहेत. ह्या संग्रहातील बारा कथा **'पाइअककहा'**(प्राकृतकथा) ह्यात देखील समाविष्ट आहेत. महेंद्रसूरीने इ.स.११३० मध्ये **'नम्मयासुंदरीकहा'**(नर्मदासुंदरीकथा)रचली, ही गद्य-पद्य मिश्रित कथा असून ह्यात पद्यभाग जास्त आहे.'नम्मयासुंदरीकहा' ही कपटाने परदेशातील वेश्यागृहात आणल्या गेलेल्या नर्मदासुंदरी ह्या विवाहित स्त्रीची कहाणी आहे. शीलरक्षणासाठी नर्मदा छळ सोसते व खंबीरपणा दाखवते असे ह्या कथेचे कथानक आहे. **सौमप्रभसुरी** ह्याने इ.स.११८४ मध्ये **'कुमारवालपडिबोह'** (कुमारपाल प्रतिबोध) ह्या ५४ कथांचा संग्रह लिहिला असून ह्यात हेमचंद्राने कुमारपालाला सांगितलेल्या धर्मबोधकथांचे संकलन आहे. ह्यातील काही भाग संस्कृत आणि अपभ्रंशामध्ये देखील आहे. **सुमतिसूरीने** गद्यपद्यात्मक **'जिनदत्ताख्यान'** ही कथा जिनदत्त नावाच्या नायकाची कथा आहे. जिनदत्ताचा चार स्त्रियांशी विवाह, त्याचे जीवनातील

अनुभव, जैन धर्माची घेतलेली दीक्षा हा कथाभाग ह्या कथेत आला आहे. इ.स.चौदाव्या-पंधराव्या शतकात देखील महाराष्ट्री प्राकृतात रचना होत होती. रत्नशेखरसूरीची इ.स.चौदाव्या शतकातील '**सिरिवालकहा**'(श्रीपालकथा) ही १३४२ आर्यछंदातील पद्ये असलेली कथा आहे.ह्यात सिद्धचक्राचे महत्त्व सांगितले आहे. **जिनहर्षगणी** ह्याने इ.स.पंधराव्या शतकात '**रयणसहेरीकहा**' (रत्नशेखरीकथा) लिहिली असून त्यात पर्व व तिथी माहात्म सांगितले आहे.

**महाराष्ट्री प्राकृतातील काही महत्त्वाचे साहित्यिक आणि त्यांची साहित्यकृती ह्यांची सूची**

| साहित्यिक | साहित्यकृती | निर्मिती काळ | साहित्यप्रकार |
|---|---|---|---|
| सातवाहन राजा हाल | गाहासत्तसई(गाथासप्तशती) | इ.स.पहिले शतक | मुक्तक काव्य |
| पादलिप्तसूरी | तरंगवईकहा | इ.स. दुसरे-तिसरे शतक | कथाकाव्य |
| विमलसूरी | पउमचरिउ(पद्मचरित) | इ.स.तिसरे-चौथे शतक | चरितकाव्य |
| प्रवरसेन वाकाटक | सेतुबंध(रावणवहो) | इ.स.पाचवे शतक | महाकाव्य |
| संघगणीदास, धर्मसेनगणीदास | वसुदेवहिंडी | इ.स.पाचवे शतक | कथाकाव्य |
| वाक्पतीराज | गउडवहो | इ.स.७२५ | महाकाव्य |
| उद्योतनसूरी | कुवलयमाला | इ.स.७९९ | पद्यसाहित्य |
| हरिभद्रसूरी | समराइच्चकहा | इ.स.आठवे शतक | कथाकाव्य |
| कौऊहल (कौतुहल) | लीलावई | इ.स.आठवे शतक | महाकाव्य |
| जयवल्लभ | वज्जालग्ग | इ.स.तेरावे शतक | मुक्तक काव्य |

## महाराष्ट्री प्राकृतातील सट्टक

**कर्पूरमंजरी हे कवी राजशेखरकृत प्राकृत सट्टक** (प्राकृतमधील एक नृत्यप्रधान नाट्यप्रकार) आहे. सट्टक हा शब्द द्राविडी ‘आट्ट’ किंवा ‘आट्टम्’ (नृत्य वा अभिनय) ह्या शब्दापासून आला. राजशेखराची कवयित्री पत्नी अवंतीसुंदरी, हिच्या मनोरंजनार्थ राजशेखराने कर्पूरमंजरी लिहिली. हे सट्टक मुख्यतः शौरसेनी प्राकृतमध्ये आहे, परंतु त्यातील काही पद्यभाग महाराष्ट्रीला जवळचा आहे. त्यात राजा चंद्रपाल व कर्पूरमंजरी यांची प्रेमकथा आहे.

## महाराष्ट्री प्राकृतातील साहित्याची वैशिष्ट्ये

महाराष्ट्री प्राकृत ही एक प्राचीन भारतीय भाषा आहे आणि तिची साहित्य-निर्मिती इसवी सनाच्या पहिल्या शतकापासून ते बाराव्या शतकापर्यंत झाली आहे. महाराष्ट्री प्राकृतातील साहित्याची काही प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:

१. **नैसर्गिक आणि लयबद्ध भाषा:** महाराष्ट्री प्राकृत ही एक नैसर्गिक आणि लयबद्ध भाषा आहे. तिच्यात सहजता आणि गोडवा आहे, ज्यामुळे ती वाचायला आणि ऐकायला खूप आनंददायी वाटते.
२. **गीत-काव्य आणि नाट्य साहित्य:** महाराष्ट्री प्राकृतामध्ये गीत-काव्याला (lyrical poetry) खूप महत्त्व आहे.'गाहा' (गाथा) हा प्रसिद्ध काव्य छंदप्रकार ह्याच भाषेत आहे.
३. **सौंदर्य आणि भावनांचा आविष्कार:** महाराष्ट्री प्राकृतातील साहित्यात निसर्गाचे, भावनांचे आणि मानवी जीवनाचे सुंदर आणि प्रभावी चित्रण आढळते.

४. **व्याकरण आणि शैली:** महाराष्ट्री प्राकृताचे स्वतःचे व्याकरण आणि विशिष्ट लेखनशैली आहे. त्यामुळे ती इतर प्राकृत भाषांपेक्षा वेगळी ओळख निर्माण करते.

५. **सांस्कृतिक आणि सामाजिक प्रतिबिंब:** महाराष्ट्री प्राकृत भाषेतील साहित्यात तत्कालीन समाज, चालीरिती, आणि लोकांच्या श्रद्धा-अंधश्रद्धा यांचे प्रतिबिंब उमटलेले दिसते.

६. **धार्मिक आणि लौकिक साहित्य:** महाराष्ट्री प्राकृतामध्ये धार्मिक (जैन आणि बौद्ध साहित्य) आणि लौकिक (प्रेम, वीरगाथा) दोन्ही प्रकारचे साहित्य उपलब्ध आहे.

७. **मराठी भाषेवरील प्रभाव:** महाराष्ट्री प्राकृत ही मराठी भाषेची जननी मानली जाते. त्यामुळे मराठी भाषेच्या विकासावर आणि तिच्या साहित्यावर महाराष्ट्री प्राकृताचा मोठा प्रभाव आहे.

८. **लवचिक आणि प्रभावी अभिव्यक्ती:** महाराष्ट्री प्राकृत ही एक लवचिक भाषा आहे, जी वेगवेगळ्या प्रकारच्या भावना आणि कल्पना व्यक्त करण्यासाठी प्रभावी ठरते.

९. **लोकसाहित्याचे मूळ:** महाराष्ट्री प्राकृतातील अनेक लोकगीते, म्हणी आणि वाक्प्रचार आजही मराठी भाषेत वापरले जातात, ज्यामुळे या भाषेचे महत्त्व अधिक वाढते.

१०. **सांस्कृतिक आणि ऐतिहासिक ठेवा:** महाराष्ट्री प्राकृतातील साहित्य हे प्राचीन भारताच्या इतिहासाची आणि संस्कृतीची माहिती देणारे अमूल्य साधन आहे.

## समारोप

**एकूणच प्राचीन-मध्ययुगीन काळातील महाराष्ट्री प्राकृत भाषेमध्ये वैपुल्याने, वैविध्यपूर्ण साहित्य निर्माण झाले.महाराष्ट्री प्राकृतातील साहित्य हे एक मौल्यवान सांस्कृतिक आणि ऐतिहासिक संचित आहे .**

## संदर्भ ग्रंथसूची


१. जैन, जगदीशचंद्र, प्राकृत साहित्य का इतिहास, वाराणसी, १९६१.

२. नेमिचंद्र शास्त्री, प्राकृत भाषा और साहित्य का आलोचनात्मक इतिहास, वाराणसी, १९६६.

३. तगारे ग.वा., 'माहाराष्ट्री साहित्य', नोंद लेख, मराठी विश्वकोश

# अपभ्रंश साहित्य एक मागोवा

अपभ्रंश भाषा साहित्याचा प्रारंभ इसवी सनाच्या सहाव्या शतकानंतर झाली.भास आणि कालिदासाच्या संस्कृत नाटकात अपभ्रंश भाषेचे उपयोजन केलेले आढळते.आज उपलब्ध असलेले अपभ्रंश भाषांतील साहित्य प्रामुख्याने जैन ग्रंथ भांडारातील आहे.जैनेतरांची बरीचशी अपभ्रंश साहित्य रचना कालौघात नष्ट झाली आहे.बहुतांश अपभ्रंश साहित्य आजही अप्रकाशित आहे.बहुतांश अपभ्रंश साहित्य पद्यात दिसते.अपभ्रंश भाषांतील साहित्याचे वर्गीकरण कथात्मक प्रबंध, खंडकाव्य, मुक्तक असे तीन साहित्यप्रकार केले जातात.कथात्मक प्रबंधात पुराण, धार्मिक व लौकिक चरित्रे दिसतात.संस्कृत नाटकातील काही संवाद, वाक्ये व कुवलयमाला  महाराष्ट्री प्राकृतातील चंपूकाव्यात संवादाचा काही भाग अपभ्रंश गद्यरचना आढळते.मैथिलीचा महाकवी विद्यापतीकृत 'कीर्तिलता' ह्या काव्यात देखील अपभ्रंश भाषा दिसते.भासाच्या 'पंचरत्न'ह्या संस्कृत नाटकात " शादमंडलु शुय्यो "(शतमंडल: सूर्यः) असे मागधी अपभ्रंशातील शब्द गोपाळांच्या तोंडी आहेत.शूद्रकाच्या ‘मृच्छकटिक’ ह्या नाटकात दुसऱ्या अंकात माथुराची भाषा टक्की किंवा ढक्की आहे, असे पृथ्वीधर टीकाकार म्हणतो. हिलाच वैय्याकरणी मार्कंडेय व पुढे 'पिशेल' हा भाषावैज्ञानिक 'मागधी अपभ्रंश' म्हणतो. उद्योतनसूरीच्या 'कुवलयमाला' ह्या ग्रंथात व्यवहारातील अपभ्रंश भाषेचे रूप दिसते.




## अपभ्रंशांतील कथात्मक प्रबंधकाव्य

१.मंगलाचरण, २.आत्मपरिचय, ३.विनयप्रगटन, ४.सज्जन-दुर्जन वर्णन, ५.कथानिरूपण, ६.प्रशस्तिपर उपसंहार अशी अपभ्रंशातील कथाकाव्याचे रचनातंत्र दिसते. अपभ्रंशातील प्रबंधकारांनी अक्षरगणवृत्तांऐवजी मात्रावृत्तांचा उपयोग केलेला दिसतो.अपभ्रंशातील कथात्मक प्रबंध काव्यात पध्दडिया, द्विपदी, चतुष्पदी ही गेय छंदरचना वापरलेली दिसते. अपभ्रंशातील कथात्मक प्रबंध काव्यात लोकगीतांच्या चालीची कवडके आहेत.मराठीतील अभंग, ओवी, चौपाई, धवळे ह्या छंदप्रकारांची पूर्वरूपे दिसतात.धर्मप्रचार हे अपभ्रंशातील कथात्मक प्रबंधरचनेचे उद्दिष्ट आहे. अपभ्रंशातील कथात्मक प्रबंध काव्यातील पुराण व चरित असे दोन प्रकार आहेत.चरित कथात्मक प्रबंध काव्याचे धार्मिक व लौकिक असे उपप्रकार आहेत.पुराण कथात्मक प्रबंध काव्यांचे नायक शलाका पुरुष म्हणजे जैन पुराणातील महापुरुष आहेत. अपभ्रंशातील पुराण कथात्मक प्रबंध काव्यात मुख्य कथेबरोबर अवांतर, अलौकिक घटनांनी भरलेली आख्याने दिसतात. पुराण कथात्मक प्रबंध काव्यात ठिकठिकाणी धार्मिक प्रवचने, स्तुतिस्तवने ह्यांची विपुलता आढळते.

चरित कथात्मक प्रबंध काव्यांत धार्मिकता दिसते. चरित कथात्मक प्रबंध काव्यांत उपकथानके, कथावस्तुची बांधीव गुंफण दिसते. लौकिक कथात्मक प्रबंध काव्यांत अद्भुतता, अतिशयोक्ती असे विशेष दिसतात.लौकिक कथात्मक प्रबंध काव्यात नायक क्षत्रियकुमार किंवा वैश्यपुत्र दिसतात.शृंगार-वीर रसांनी नटलेली साहसी लौकिक चरित कथात्मक प्रबंध काव्ये म्हणजे छंदोबद्ध कादंबऱ्याच होय. अपभ्रंशातील रासो काव्य आणि चरितकाव्य ह्यांच्या प्रेरणा भिन्न आहेत, रासो काव्याची प्रेरणा राजभक्ती, तर चरित काव्याची प्रेरणा धर्मप्रसार आहे. अपभ्रंशातील धार्मिक चरितांचे नायक तीर्थंकर, राम, कृष्ण ह्यांपैकी आहेत.

अपभ्रंशातील पहिला महाकवी चतुर्मुख (इ. स. ६०० ते ८००) मानला जातो.महाकवी **चतुर्मुख ह्याने रामकथेवरील पउमचरिउ तसेच हरिवंश आणि पंचमीचरित अशी तीन महाकाव्ये रचिली असावीत**, असे उत्तरकालीन उल्लेखांवरून वाटते, आज त्याचे कोणतेही ग्रंथ उपलब्ध नाही. महाकवी **स्वयंभू (इ.स.आठवे शतक) ह्याने रामकथेवर 'पउमचरिउ', तर कृष्णकथेवर 'रिठ्ठणेमिचरिउ'** लिहिले.स्वयंभूच्या 'पउमचरिउ' वर रविषेणकृत संस्कृत पद्मचरिताची छाप आहे.'स्वयंभू छंद' हा महाकवी स्वयंभू ह्याचा छंदशास्त्रावरील ग्रंथ असून त्यात अनेक अज्ञात प्राकृत, अपभ्रंश कवींची रचना उद्धृत केली आहे.अपभ्रंश भाषेतील महाकवी पुष्पदंत ह्याने 'तिसत्थि-महापुरिस-गुणालंकार किंवा महापुराण' ह्याची रचना केली.ह्या प्रबंध कथाकाव्यात त्याने त्रेसष्ट शलाका पुरुषांची साचेबद्ध चरित्रे काव्यशैलीने नटवून त्यात वैविध्य आणि

नावीन्य आणले.इ.स.अकराव्या शतकात धवल ह्या कवीने 'हरिवंशपुराण' अपभ्रंशामध्ये लिहिले, जे आजही अप्रकाशित आहे.

लौकिक चरितांमध्ये महाकवी **पुष्पदंताने लिहिलेली 'णायकुमारचरिउ' (नागकुमारचरित) आणि 'जसहरचरिउ' (यशोधरचरित)** ही इसवी सनाच्या दहाव्या शतकातील चरिते काव्यात्मकता व भाषासौंदर्य ह्या गुणांनी परिपूर्ण आहेत.वैश्यकुमार नायक असलेली व श्रुतपंचमीचे महत्त्व सांगणारी धनपालाची इ.स.दहाव्या शतकातील **'भावसयत्तकहा'** (भविष्यदत्तकथा) ही काव्यमय दिसते. इ.स.अकराव्या शतकातील **कनकामरमुनींची 'करकंडचरिउ'**(करकंदडचरित) ही महाराष्ट्री अपभ्रंशातील रचना अद्भुत कथा व नऊ उपकथा ह्याच्या चातुर्यपूर्ण गुंफणीतून आकाराला आली आहे.ह्या लौकिकचरिताला धाराशिव जवळील तेरापूरच्या लेण्यांची पार्श्वभूमी आहे. इसवी सनाच्या बाराव्या शतकात **धाहिल** ह्या कवीने अपभ्रंशात **'पउमसिरीचरिउ'**(पद्मश्रीचरित) लिहिले, ह्या काव्यात कर्मसिद्धांत, धर्ममाहात्म ह्यांचे विवेचन केले आहे.'**पउमसिरीचरिउ**' हे अद्भुतरम्य प्रेमकथा असलेले श्रेष्ठ काव्यगुण असलेले काव्य आहे.धाहिल हा कवी संस्कृत महाकवी माघ ह्याचा वंशज होता. इ.स.१२०० नंतर अर्वाचीन भारतीय भाषांच्या उदयानंतरही अपभ्रंश भाषांमध्ये चरितकाव्ये लिहिली गेली.अपभ्रंश भाषेतील शेवटचे चरितकाव्य म्हणजे मैथिली महाकवी **विद्यापती ह्याचे 'कीर्तीलता'** होय. आधुनिक भारतीय भाषांतील रासो काव्य आणि अपभ्रंश भाषांतील चरितकाव्ये ह्यांच्यात भाषा, रचना, चांद ह्याबाबतीत इतके साम्य आढळते की,

अर्वाचीन भारतीय आर्य भाषांच्या नव्या कालखंडात आपण शिरत आहोत ह्याची जाणीव देखील होत नाही.

## अपभ्रंशांतील खंडकाव्य

अपभ्रंशातील एकच खंडकाव्य आज प्रकाशित आहे, ते म्हणजे इ.स.११०० ते १४०० च्या दरम्यान **अद्दहमाण**(अब्दुल रहमान) ह्याने लिहिलेले '**संदेशरासक**' होय.'संदेशरासक' ह्या खंडकाव्यात दूरदेशी गेलेल्या आपल्या पतीस एका विरहिणीने दिलेला काव्यमय संदेश आहे.जायसीकृत 'पद्मावत' व उत्तरकालीन इतर काव्यावर 'अपभ्रंश खंडकाव्य 'संदेशरासक' चा प्रभाव आढळतो.

## अपभ्रंशांतील मुक्तक काव्य

संस्कृत मुक्तक काव्य अपभ्रंशात दोहे व गीते ह्या स्वरूपात आढळते.संस्कृत महाकवी कालिदास ह्याच्या '**विक्रमोर्वशीय**' ह्या नाटकात चवथ्या अंकात आलेली **'चर्चरी पद्ये'**-मुक्तके अपभ्रंश भाषेतच आहेत. ही अपभ्रंश काव्यत्रयी मुक्तक रचना गेय गीते, नृत्यानुकुल चर्चरी पद्ये, कालस्वरूपकुलक गीत रागदारीयुक्त आहेत.

अपभ्रंशातील दोहे हे ऐहिक स्वरूपाचे, शृगांर-वीर रसांचा आविष्कारयुक्त आहेत. अपभ्रंश भाषांमध्ये धार्मिक विषय, गूढ आध्यात्मिक अनुभवांचा आविष्कार करणारे दोहे देखील आढळतात.अपभ्रंश दोह्यांचे रचनाकार हिंदू, बौद्ध, जैन असे भिन्न धर्माचे जरी असले तरी, त्या दोह्यांमध्ये आशयाभिव्यक्तीचे साम्य दिसते. अपभ्रंश भाषांतील लौकिक विषयांवरील दोह्यांचे रचनाकार अज्ञात आहेत. वैय्याकरणी हेमचंद्र ह्याच्या 'प्राकृत व्याकरण'

ह्या ग्रंथाच्या 'छंदोनुशासन' ह्या अध्यायात, **सोमप्रभकृत 'कुमारपाल प्रतिबोध'**(इ.स.११९५), मेरुतुंगकृत 'प्रबंधचिंतामणी' (इ.स.१४००) राजशेखरकृत **'प्रबंधकोश'**(इ.स.चौदावे शतक), **प्राकृत पैंगल**(इ.स.पंधरावे शतक) ह्या ग्रंथातून अपभ्रंश दोहे उपयोजलेले दिसतात. संस्कृत साहित्यकारांनी अलंकारांची उदाहरणे म्हणून अपभ्रंशातील दोहे उद्धृत केले आहेत.अपभ्रंश भाषांमध्ये संस्कृत सुभाषितांसारखे सज्जन, दुर्जन, दारिद्र्य इ. विषयांवर दोहे दिसतात.शैव, जैन, बौद्ध मतांच्या अध्यात्मवादी कवींचे अपभ्रंश आज उपलब्ध आहे.ह्या दोह्यांमध्ये अध्यात्मिक गूढ अनुभूतीवर भर असला, तरी रचनेत सुबोधता व सुभाषितता दिसते.

अध्यात्मवादी जैन कवी **जोइंदू** (इ.स. ६०० ते १०००) हा पहिला दोहे रचनाकार आहे, त्याने **'परमप्पपयासु'**(परमात्मप्रकाश) व 'योगसार' ह्या ग्रंथात शैव, बौद्ध गूढवाद्यांशी जुळणाऱ्या कल्पना आपल्या दोह्यात मांडल्या आहेत. **मुनी रामसिंह** (इ.स.दहावे शतक) ह्याच्या **'पाहुड दोहा'** (प्राकृत दोहा) ह्या ग्रंथात  एकूण २२२ दोहे आहेत, त्यात निवृत्तिमार्गाचा उपदेश केला आहे.मुनी रामसिंहाबाबत फारशी माहिती उपलब्ध नाही, परंतु तो शैव, योग व तंत्र मार्गांशी परिचित असावा असे त्याच्या दोह्यावरून वाटते.रामसिंहाच्या एका दोह्यात शक्तीशिवाय शिव व शिवाविना शक्ती काहीच करू शकणार नाही, असा विचार केला आहे.दिगंबर पंथीय जैन कवी **देवसेन ह्याने 'सावयधम्मदोहा'** (श्रावकधर्मदोहा) हा दोहा ग्रंथ इ.स.९३२ मध्ये लिहिला, त्यात श्रावकधर्माचे वर्णन आहे.डॉ.आ.ने.उपाध्ये 'सावयधम्मदोहा' ह्या ग्रंथाचे कर्तृत्व लक्ष्मीचंद्र ह्या कवीला देतात.**सुप्रभकृत 'वैराग्यसार '** (इ.स.तेरावे शतक) ह्या ग्रंथात प्रत्येक

दोह्यात 'सुप्पउ भणइ'(सुप्रभ म्हणे....)अशी स्वतःची नाममुद्रा वापरतो.शैव व बौद्ध पंथीय रचनाकारांच्या दोह्यांमध्ये संध्याभाषेचा म्हणजे रहस्यमय द्वयअर्थी भाषेचा वापर केलेला आहे.वेदाध्ययन, मंत्र-तंत्र, व कर्मकांड ह्यांचे खंडन करून सहजमार्ग, सद्गुरू माहात्म इत्यादींचे निरूपण त्यात केलेले आहे. ह्या दोह्यांमध्ये आध्यात्मिक अनुभवांचे शृंगारिक वर्णन केलेले आढळते.इ.स. ७०० ते १००० ह्या काळात **काण्हपा**(कानिफनाथ), **सहरपा**(सरहपाद), **शबरपा, लुईपा** ह्यांनी लिहिलेल्या '**दोहाकोश**' ह्या दोहाग्रंथात शैव तत्वज्ञान मांडले आहे.ही पद्यरचना विभिन्न रागदारीत असून प्राचीन बंगाली, प्राचीन राजस्थानी भाषेच्या पूर्वज असलेल्या अपभ्रंश भाषेत आहेत.

**अपभ्रंश भाषेतील साहित्याची वैशिष्ट्ये**

अपभ्रंश भाषेतील साहित्याची काही प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:

**भाषा आणि साहित्य:**

**१.मध्ययुगीन भारतीय आर्य भाषेचा टप्पा:** अपभ्रंश ही मध्ययुगीन भारतीय आर्य भाषेच्या विकासातील एक महत्त्वाची पायरी आहे. ती प्राकृत आणि आधुनिक भारतीय भाषांच्या दरम्यानची संक्रमणकालीन भाषा आहे.

**२.भाषेचा 'भ्रष्ट' किंवा 'अशुद्ध' अर्थ:** 'अपभ्रंश' या शब्दाचा अर्थ 'भ्रष्ट' किंवा 'अशुद्ध' असा होतो. ह्याचा अर्थ असा की, संस्कृत आणि प्राकृत भाषेच्या तुलनेत ही भाषा थोडीशी वेगळी आणि 'अशुद्ध' मानली जात होती.

**३.साहित्यिक आणि बोलीभाषेचा प्रभाव:** अपभ्रंश साहित्यात साहित्यिक भाषेबरोबरच बोलीभाषेचाही प्रभाव दिसून येतो. त्यामुळे ती अधिक लोकांपर्यंत पोहोचली.

अपभ्रंशांतील काही महत्त्वाचे साहित्यिक आणि त्यांची साहित्यकृती ह्यांची सूची

| साहित्यिक | साहित्यकृती | निर्मिती काळ | साहित्यप्रकार |
|---|---|---|---|
| महाकवी चतुर्मुख | पउमचरिउ,हरिवंश,पंचमीचरित | इ. स. ६०० ते ८०० | महाकाव्य |
| महाकवी स्वयंभू | रिठ्ठणेमिचरिउ | इ.स.आठवे शतक | चरितकाव्य |
| महाकवी पुष्पदंत | महापुराण | इ.स.दहावे शतक | चरितकाव्य |
| जोइंदू | परमप्पपयासु व योगसार | इ.स. ६०० ते १००० | मुक्तक काव्य(दोहा) |
| काण्हपा | दोहाकोश | इ.स. ७०० ते १००० | मुक्तक काव्य(दोहा) |
| धनपाल | भावसयत्तकहा | इ.स.दहावे शतक | कथात्मक प्रबंधकाव्य |
| मुनी रामसिंह | पाहुड दोहा | इ.स.दहावे शतक | मुक्तक काव्य(दोहा) |
| कनकामरमुनी | करकंडचरिउ | इ.स.अकरावे शतक | चरितकाव्य |
| धाहिल | पउमसिरीचरिउ | इ.स. बारावे शतक | कथात्मक प्रबंधकाव्य |
| अद्दहमाण(अब्दुल रहमान) | संदेशरासक | इ.स.११०० ते १४०० | खंडकाव्य |

**साहित्यातील वैशिष्ट्ये:**

**१.विविध साहित्य प्रकार:** अपभ्रंश साहित्यात कथा, कविता, नाटक, जैन साहित्य आणि लोकसाहित्य अशा विविध साहित्य प्रकारांचा समावेश आहे.

**२.भावपूर्ण आणि रसाळ लेखन:** अपभ्रंश साहित्यात भावनांचे आणि रसांचे उत्कृष्ट वर्णन केलेले आढळते. प्रेम, भक्ती, वीर आणि वैराग्य यांसारख्या भावनांचे मनोज्ञ चित्रण यात केलेले आहे.

**३.नैसर्गिक आणि साधी भाषा:** अपभ्रंश साहित्याची भाषा अतिशय नैसर्गिक आणि साधी आहे. त्यामुळे ती वाचकांना लवकर समजते.

**४.सामाजिक आणि सांस्कृतिक प्रतिबिंब:** अपभ्रंश साहित्यातून तत्कालीन समाज आणि संस्कृतीची माहिती मिळते. लोकांचे जीवनमान, चालीरीती, आणि धार्मिक श्रद्धा यांसारख्या गोष्टींचे प्रतिबिंब त्यात दिसते.

**५.जैन साहित्याचा प्रभाव:** अपभ्रंश साहित्यात जैन तत्त्वज्ञानावर आधारित साहित्य मोठ्या प्रमाणावर आढळते. जैन धर्मातील कथा, चरित्र आणि तत्त्वज्ञान ह्या साहित्यातून व्यक्त झाले आहे.

**६.लोकप्रिय आणि प्रभावी:** अपभ्रंश साहित्य त्यावेळच्या लोकांमध्ये खूप लोकप्रिय झाले, कारण ती बोलीभाषा असल्याने लोकांना ती लवकर समजत होती.

**७.आधुनिक भारतीय भाषांचा विकास**: अपभ्रंश भाषेने आधुनिक भारतीय भाषांच्या विकासासाठी एक महत्त्वाचा पाया घातला, असे मानले जाते.

**८.**अपभ्रंश भाषेतील साहित्य नीति, शृंगार आणि वीर रसांनी परिपूर्ण आहे. या साहित्यात तत्कालीन सामाजिक आणि धार्मिक परिस्थितीचे प्रतिबिंब दिसते.

## समारोप

एकूणच मध्ययुगीन काळातील अपभ्रंश भाषांमध्ये वैपुल्याने साहित्य निर्माण झाले, ज्या साहित्यामध्ये तत्कालीन समाज, संस्कृती ह्यांचे प्रतिबिंब दिसते. अपभ्रंश भाषांतील साहित्य हे भारतीय साहित्याच्या इतिहासातील एक महत्त्वाचे आणि समृद्ध पर्व आहे.

## संदर्भ ग्रंथसूची


१. कोछड हरिवंश, अपभ्रंश-साहित्य, दिल्ली, १९५६.

२. जैन देवेंद्रकुमार, अपभ्रंश भाषा और साहित्य, वारासणी, १९६५.

३. कालेलकर ना.गो., अपभ्रंश भाषा, नोंद लेख, मराठी विश्वकोश.

४. तगारे ग. वा., अपभ्रंश साहित्य, नोंद लेख, मराठी विश्वकोश.

# मराठीतील अक्षर वाङ्मय

मराठी भाषा ही लोकसंख्येच्या बाबतीत भारतातील तिसऱ्या क्रमांकाची तर जगातील पंधराव्या क्रमांकाची भाषा आहे. २०११ च्या जनगणनेनुसार संपूर्ण विश्वात १४ कोटी मराठी भाषिक लोक आहेत. मराठी भाषा भारतातील प्राचीन भाषांपैकी एक भाषा असून ती भारतातील 'अभिजात भाषा' आहे. महाराष्ट्री प्राकृतचे मराठी भाषा हे 'आधुनिक रूप'आहे. मराठीचे वय सुमारे २४०० वर्ष मानले जाते.प्राचीन काळापासून आजपर्यंत मराठी भाषेत अनेक श्रेष्ठ साहित्यकृती निर्माण झाल्या आहेत.श्रेष्ठ साहित्याची अनवरत, अखंड, मौलिक परंपरा मराठीला लाभली आहे. ओव्या, अभंग, पोवाडे, लावण्या, फटके इत्यादी काव्यप्रकार फक्त मराठीच आढळून येतात. मराठीत प्राचीन काळात महाकाव्य, कथात्मक साहित्य, सट्टक(नाटक) असे साहित्यप्रकार लिहिले गेले. मध्ययुगीन काळात मराठीत संत-पंत-तंत साहित्य वैपुल्याने निर्माण झाले. आधुनिक काळात दलित, ग्रामीण, आदिवासी, महानगरीय, स्त्री-वादी, विज्ञान, जनवादी अश्या साहित्यप्रवाहात समृद्ध लेखन झाले आहे. एकूणच मराठी भाषेत प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन काळात अनेकविध प्रकारचे 'अक्षर वाङ्मय' प्रसवले गेले.

### ❖ मराठीतील प्राचीनतम अक्षर वाङ्मय

**गाथासप्तशती (गाहा सत्तसई)** : सातवाहन राजा 'हाल' याने आद्य मराठीत निवडक ७०० लोककवितांचा 'गाथासप्तशती' (गाहा सत्तसई) हा लोककाव्यसंग्रह सुमारे २००० वर्षांपूर्वी संपादित केला. या ग्रंथातील ४४ गाथा

स्वतः हाल सातवाहनाने रचलेल्या आहेत. पादलिप्त या जैनमुनीने लिहिलेला 'तरंगवईकहा' हा महाराष्ट्री प्राकृतातील आद्य काव्यग्रंथ आज उपलब्ध नाही त्यामुळे 'गाथासप्तशती' (गाहा सत्तसई) हाच आज उपलब्ध असलेला आद्य मराठीतील आद्य व अग्रगण्य ग्रंथ आहे. गोदावरी नदीकाठावरील ५० शेतकरी कवींच्या कविता या लोककाव्यसंग्रहात समाविष्ट आहेत. या ग्रंथात मानवी भावभावनांचे हृदयंगम दर्शन घडते. महाराष्ट्रातील तत्कालीन ग्रामजीवन, समाजजीवन, निसर्ग, कृषी जीवन, कुटुंब जीवन इत्यादींचे शब्दांकन 'गाथासप्तशती' मधील लोकगाथांमध्ये सौंदर्यपूर्णरित्या केले आहे. 'गाथा सप्तशती'तील मराठी भाषेची अलंकृतता आणि भाषिक सौंदर्य उल्लेखनीय आहे.

**समरादित्याची कथा(समराईच्च कहा)** : आचार्य हरिभद्रसुरी १२०० वर्षापूर्वी इ.स.८०० मध्ये लिहिलेली 'समरादित्याची कथा' (समराईच्च कहा) ही कादंबरीसदृश्य रचना एकमेकाद्वितीय अशीच आहे.त्यात हरिभद्राने जादुई वास्तववाद (Magical Realism) हा आकृतिबंध वापरलेला आहे.तत्कालीन मराठी भाषेत लिहिलेली ही आख्यानात्मक साहित्यकृती आहे.राजा समरादित्य (नायक) आणि अग्निशर्मा (प्रतिनायक) यांच्यातील जन्मजन्मांतरातील जीवनसंघर्षाचे चित्रण प्रस्तुत ग्रंथात केले आहे.

**सेतुबंध (रावणवहो)** : वाकाटक राजा प्रवरसेन याने निर्माण केलेले 'सेतुबंध'(रावणवहो) हे आद्य मराठीतील उल्लेखनीय काव्य मानले जाते.वाल्मिकी रामायण या आर्ष महाकाव्यावर आधारित असे हे १५

आश्वासांचे (कांडांचे)महाकाव्य आहे.काही साहित्य अभ्यासक ‘सेतुबंध’(रावणवहो) महाकाव्याचे कर्तृत्व कालिदासाला देतात.

### ❖ मराठीतील मध्ययुगीन अक्षर वाङ्मय

**लीळाचरित्र** : महाराष्ट्रीय भक्तीसंप्रदायात महत्त्वाच्या महानुभाव पंथात श्रुतीग्रंथ मनाला जाणारा ‘लीळाचरित्र’ हा आद्य गद्य चरित्रग्रंथ म्हाइंभट सराळेकर यांनी निर्माण केला आहे.सर्व महानुभाव मराठी वाङ्मयाची बीजतत्त्वे या ग्रंथात असून याची निर्मिती इ.स.१२७८ मध्ये झाली आहे.एकांक-पूर्वार्ध-उत्तरार्ध हे या ग्रंथाचे तीन विभाग असून महानुभाव पंथप्रवर्तक चक्रधर स्वामी यांचे चरित्र यात वर्णलेले आहे.तत्कालीन महाराष्ट्रीय समाज जीवनाचे चित्रण ‘लीळाचरित्रा’त  आलेले आहे.यादवकालीन महाराष्ट्राचे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, तात्विक आणि वाङ्मयीन शब्दरूप चित्रण म्हणजे ‘लीळाचरित्र’होय.

**ज्ञानेश्वरी** : इ.स.१२९० मध्ये प्रवरा नदीतीरावरील नेवासे या गावातील म्हाळसादेवीच्या मंदिरातील पैसखांबाला टेकून गीतेवरील संत ज्ञानेश्वरांनी केलेला मराठी भावानुवाद म्हणजे ‘ज्ञानेश्वरी’.या गीताभाष्यालाच भावार्थदीपिका, ज्ञानदेवी म्हटले जाते.स्वतः संत ज्ञानेश्वरांनी या ग्रंथाला ‘देशीकार लेणे’ असे म्हटले आहे.ज्ञानेश्वरी हा १८ अध्याय असलेला काव्यग्रंथ असून, सर्वसामान्यांसाठी असणारा मराठीतील सर्वश्रेष्ठ गीता भाष्यग्रंथ आहे.

**संत तुकारामांची अभंगगाथा** : अस्सल मराठी बोलीत लिहिलेली, जीवन तत्त्वज्ञान सांगणारी संत तुकारामांची ‘अभंगगाथा’ म्हणजे इसवीसनाच्या सतराव्या शतकातील मराठी भाषेतील अक्षर वाङ्मयच होय.संत तुकारामांना

मराठीतील लोककवी, महाकवी मानले जाते.'अभंग' या अस्सल मराठी छंद प्रकाराला संत तुकारामांनी लोकप्रिय केले. संत संताजी जगनाडे हे तुकाराम अभंगगाथेचे लेखनिक मानले जातात.

### ❖ मराठीतील अर्वाचीन अक्षर वाङ्मय

**श्यामची आई** : 'श्यामची आई' ही पांडुरंग सदाशिव साने (साने गुरुजी) यांनी लिहिलेली एक वाचक आणि समीक्षक प्रिय अशी आत्मचरित्रात्मक प्रादेशिक कादंबरी आहे.या कादंबरीत आईच्या आठवणी, तिने केलेल्या संस्काराचे वर्णन केले आहे.भावनात्मक अनुभव, मातृप्रेम, मातृभक्ती व कृतज्ञता या अपार भावनांचे शब्दांकन प्रस्तुत कादंबरीत साने गुरुजींनी केले आहे. 'श्यामची आई' या कादंबरीला 'मातृप्रेमाचे महन्मंगल स्त्रोत्र' असेही म्हटले जाते.

**ययाति** : 'ययाति' ही ज्ञानपीठ आणि साहित्य अकादमी पुरस्कार विजेती मराठी कादंबरी लोकप्रिय लेखक 'वि.स.खांडेकर' यांनी लिहिली आहे.या कादंबरीमध्ये मानवाच्या भोगवादी प्रवृत्ती, निरपेक्ष प्रेमाचे महत्त्व, त्याग यांवर प्रकाश टाकला आहे. ही कादंबरी 'महाभारत' या आर्ष महाकाव्यावर आधारित आहे.एका पौराणिक कथेच्या आधारे मानवी जीवनावरील केलेले श्रेष्ठ जीवनभाष्य म्हणजे 'ययाति' कादंबरी होय. 'ययाति' ही कादंबरीची लोकप्रियता केवळ मराठीपुरतीच मर्यादित नाही, तर ती गुजराती आणि तामिळ भाषेत देखील लोकप्रिय आहे.


**कोसला** : १९६३ मध्ये प्रकाशित झालेली 'कोसला' ही नवकादंबरी ज्ञानपीठकार भालचंद्र नेमाडे यांची मराठीतील 'अभिजात साहित्यकृती आहे.आत्मचरित्रात्मक आकृतिबंध वापरून लिहिलेल्या 'कोसला' या


कादंबरीने मराठी कादंबरीत नवता आणली. 'पांडुरंग सांगवीकर' या न-नायक तरुणाचा महाविद्यालयीन काळातील प्रवास यात मिस्कीलपणे कथन केले आहे. 'कोसला' ही मराठीतील पहिली अस्तित्ववादी कादंबरी आहे.या कादंबरीचे आठ भारतीय भाषा आणि इंग्रजीत भाषांतर झाले आहे.


एकंदरच अभिजात मराठी भाषेतील सातत्यपूर्ण, मौलिक परंपरा असलेले अक्षर साहित्य भारतीय साहित्यात उल्लेखनीय मानले जाते. अभिजात मराठीतील साहित्य हे अभिजात आणि अक्षर असेच आहे. संख्यात्मक आणि गुणात्मक दृष्ट्या अवलोकन केले असता मराठी साहित्य सर्व भारतीय साहित्यात श्रेष्ठतम असेच आहे.

# मराठीतील अक्षर वाङ्मय


## मराठीतील प्राचीनतम अक्षर वाङ्मय









## मराठीतील मध्ययुगीन अक्षर वाङ्मय









## मराठीतील अर्वाचीन अक्षर वाङ्मय



# महाराष्ट्र देशनामाची उत्पत्ती : एक शोध

महाराष्ट्र हे देशनाम जवळपास दोन हजार वर्षांपेक्षा पूर्वीचे आहे. महाराष्ट्र ह्या देशनामाच्या अगोदर महाराष्ट्राचा उल्लेख दंडकारण्य, दक्षिणापथ, मल्लराष्ट्र, गोपराष्ट्र, नरराष्ट्र, नवराष्ट्र असे उल्लेख मिळतात. महाराष्ट्र या संज्ञेचा वापर नंतरच्या काळामध्ये सुरू झाला असावा. इसवी सनाच्या पाचव्या-सहाव्या शतकांमध्ये महाराष्ट्र या संज्ञेचा आढळ पहिल्यांदा दिसून येतो. ‘महाराठी’ ह्या शब्दाचा वापर सातवाहनांच्या लेखांत, त्याचप्रमाणे त्यांच्या उत्तरकाळातील काही नाण्यांवर आढळून येतो.‘महाराष्ट्र’ या शब्दाची व्युत्पत्ती आणि त्याचा अर्थ यांबद्दल विद्वानांत एकमत नाही.महाराष्ट्रातील प्राचीन कोरीव लेखांत ऋषिक, अश्मक, दण्डक, कुंतल, अपरांत आणि मूलक इ. विभागांचा दक्षिणापथाच्या संदर्भात उल्लेख आलेला आहे.

## महाराष्ट्र शब्दाचा शिलालेखीय आढळ

महाराष्ट्राचा पहिला उल्लेख मध्यप्रदेशातील सागर जिल्ह्यातील एरण स्तंभलेखात असून, तो इ.स.३६५ चा आहे.ह्या स्तंभलेखाची निर्मिती शकनृपती श्रीधर वर्मा ह्याने केली आहे एरण स्तंभलेखात त्याचा सेनापती सत्यनाग स्वतःला 'महाराष्ट्रीय' म्हणतो. महाराष्ट्र ह्या देशनामाचा उल्लेख कर्नाटकातील 'ऐहोळे' शिलालेखात किंवा प्रशस्ती मध्ये दिसतो.ऐहोळे शिलालेख इ.स.६३४-६३५ मधील शिलालेख असून, तो कवी 'रविकीर्ती' ह्याने हा शिलालेख ‘मेगुती’ जैन जिनालयात कोरलेला आहे.ऐहोळे शिलालेख संस्कृत भाषेत असे ब्राह्मी लिपीत आहे. ह्या शिलालेखात ओळ क्र.१२ ह्या ओळीत महाराष्ट्राचा उल्लेख

सापडतो. **"अगमदधिपतित्वम् यो महाराष्टकाणाम् नवनवति-सहस्त्र-ग्राम-भाजां त्रयाणाम् !!"** असा तो उल्लेख आहे, ज्याचा अर्थ "नव्याण्णव हजार गाव असलेल्या तीन महाराष्ट्र प्रदेशाचा अधिपती झाला." असा आहे. ऐहोळे शिलालेख हा पद्यमय शैलीत असून साहित्यिक शब्दरचनेत आहे. रविकीर्तीच्या लेखात चालुक्यवंशीय दुसरा पुलकेशी हा तीन महाराष्ट्रकांवर राज्य करीत होता, असे उल्लेखिलेले आहे. काही अभ्यासकांच्या मते ती तीन महाराष्ट्रके विदर्भ, कुंतल आणि महाराष्ट्र अशी तीन वेगवेगळी महाराष्ट्रके असू शकतील. ऐहोळे शिलालेखातील त्रिधा महाराष्ट्राची ऐतिहासिक व सांस्कृतिक संकल्पना इ.स.सोळाव्या शतकात 'तीन भाग मऱ्हाट' ह्या शब्दांत गुर्जर शिवबास ह्या महानुभाव ग्रंथकाराने मांडली आहे.आजप्रमाणेच चालुक्य व यादव काळात विदर्भ, देश व कोकण हे तीन महाराष्ट्राचे भाग होते,

### महाराष्ट्र शब्दाचा ग्रांथिक आढळ

महाराष्ट्र शब्दाचा ग्रांथिक पहिला आढळ इ.स.५०० मधील 'महावंस'ह्या बौद्ध ग्रंथात 'महारठ्ठ' ह्या संज्ञेचा उल्लेखाद्वारे महाराष्ट्र देशाचा उल्लेख आढळतो.ह्या ग्रंथातील निर्देशानुसार बौद्ध भिक्षू मोगली पुत्र तिस्स याने इ.स.पू. तिसऱ्या शतकात महिसमंडळ, बनवासी, अपरांतक, महारठ्ठ येथे बौद्ध धर्मोप्रदेशक पाठविले होते, ह्यावरून 'महारठ्ठ' हे नाव इ.स.पू. तिसऱ्या शतकापासून रूढ होते असे दिसते.वराहमिहिर ह्याच्या 'बृहदसंहिता'(इ.स.५०५) ह्या ग्रंथात दहाव्या अध्यायात 'महाराष्ट्र' शब्द वापरला आहे.बृहदसंहितेतील भट्टोत्पाल ह्याच्या टीकेत 'महाराष्ट्र शब्द आला आहे.संस्कृत साहित्यशास्त्रकार दंडी ह्याच्या 'काव्यादर्श'(इ.स.सातशे शतक) महाराष्ट्र व माहाराष्ट्री असे शब्द

आले आहे.चीनी प्रवासी ह्युएन त्संग सम्राट हर्षवर्धनच्या काळात इसवी सनाच्या सातव्या शतकात भारतात आला, त्याने काही काळ महाराष्ट्रात ही वास्तव्य केले.ह्युएन त्संग आपल्या 'Records of the Western Regions' (大唐西域記) ह्या ग्रंथात महाराष्ट्राचा उल्लेख 'मोहोलोच' असा करतो. इ.स.नवव्या शतकातील 'राजशेखर' ह्या संस्कृत साहित्यशास्त्रकाराने आपल्या ग्रंथात अनेक वेळ महाराष्ट्र शब्द वापरला आहे.

"**देश भणीजे खंडमंडळ:आणि तयापासौनि उभे मेघंकरघाट ते एक खंडमंडळ: तयापासौनि आवघे वराड ते एक खंडमंडळ: परि आवघी मिळौनि महाराष्ट्राचे बोलिजे: किंचित् किंचित् भाषेचा पालट: भणौनि खंडमंडळ भणावी**:"असा महाराष्ट्राचा उल्लेख व विस्तार इसवी सनाच्या तेराव्या शतकातील 'आचारपद्धती'ह्या महानुभाव ग्रंथात आला आहे. इ.स.पंधराव्या शतकात महानुभाव कवी डिंभ कृष्णमुनी ह्याने आपल्या ग्रंथात महाराष्ट्राचा क्षेत्रविस्तार सांगितलं आहे."**विंध्याद्रिपासौनि दक्षिण दिशेशी कृष्णानदी पासौनि उत्तरेसि ! झाडीमंडळापासौनि पश्चिमेसी ! महाराष्ट्र बोलिजे !!**" असा महाराष्ट्राचा विस्तार कवी डिंभाने सांगितला आहे.

**महाराष्ट्र देशवाचक नामाचे प्राचीन उल्लेख**

१. महाराष्ट्र देशनामाचा उल्लेख सर्वप्रथम इसवी सनाच्या चौथ्या शतकातील एरण स्तंभालेखात आला आहे.
२. वायुपुराणात महाराष्ट्राचा दंडकारण्य, दक्षिणापथ असा उल्लेख आढळतो.
३. मत्सपुराणात महाराष्ट्राचा उल्लेख नवराष्ट्र असा दिसतो.

४. महाभारतात महाराष्ट्राचा उल्लेख ‘नरराष्ट्र’ असा दिसतो.

५. रामायण ह्या महाकाव्यात महाराष्ट्राचा उल्लेख ‘दंडकारण्य’ असा दिसतो.

६. अशोकाच्या शिलालेखात दक्षिणेतील रट्ट लोकांनाच ‘रास्टिक’ असे म्हटले आहे.

७. महाराष्ट्र शब्दाचा उल्लेख वररुचीच्या प्राकृतप्रकाश नावाच्या व्याकरण ग्रंथात आणि वात्स्यायन, भरतमुनी ह्यांच्या ग्रंथामध्येही आलेला आहे. मार्कंडेयपुराण, वायुपुराण व ब्रह्मपुराणातही महाराष्ट्र नाव सापडते.

८. प्राचीन चीनी प्रवासी ह्युएन त्संग आपल्या ग्रंथात महाराष्ट्राचा उल्लेख ‘मोहोलोच’ असा करतो.

९. ‘महाराष्ट्र म्हणजे महंत राष्ट्र म्हणोन महाराष्ट्र’ असा उल्लेख महानुभावी ग्रंथकारांच्या आचारमहाभाष्यातही मिळतो.

**महाराष्ट्र शब्दाच्या उपपत्तीबाबत मत-मतांतरे**

१. डॉ.रा.गो.भांडारकर ह्यांनी महारट्ट→मऱ्हाट→महाराष्ट्र अशी महाराष्ट्र नामाची उपपत्ती सांगितली आहे.अशोकाच्या शिलालेखात दक्षिणेतील रट्ट लोकांनाच ‘रास्टिक’ असे म्हटले.असून, त्याचेच संस्कृत रूप ‘राष्ट्रिक’ झाले, ह्या प्रदेशात रहाणाऱ्या राष्ट्रिकांनी स्वतःला महाराष्ट्रिक किंवा‘महारट्ट’ असे म्हणवून घेतले आणि ते ज्या देशात रहात, त्या देशाला ‘महारट्ट’ व संस्कृतमध्ये ‘महाराष्ट्र’ असे नाव पडले.

२. द.बा.डिकसळकर ह्यांच्या मते ‘महारट्ट’ चे संस्कृतीकरण होऊन महाराष्ट्र हे रूप बनले

आहे.

३. इतिहासाचार्य वि.का.राजवाडे ह्यांनी “महाराज म्हणजे इंद्र किंवा भृपती.राजा ज्या भूमीवर राज्य करतो, त्या भूमीला ‘राष्ट्र’म्हणतात.महाराष्ट्र ज्यांच्या भक्तीचा विषय ते ‘महाराष्ट्र’ होय.

४. रे.जॉन विल्सनच्या मते महार हे महाराष्ट्राचे मूळ रहिवाशी आहेत, महारांचे राष्ट्र म्हणजे महाराष्ट्र असे ह्या प्रदेशाचे नामकरण झाले आहे.

५. डॉ.ओपर्ट ह्यांच्या मते ‘महाराष्ट्राचे जुने नाव ‘मल्लराष्ट्र’ आहे. मल्ल आणि मार एकच लोक आहेत.मार→म्हार→महार ह्यावरून महारांचे राष्ट्र म्हणजे महाराष्ट्र असे ह्या प्रदेशाचे नामकरण झाले आहे.

६. चिं.वि.वैद्य यांच्या मते “इ.स.पू. ६०० च्या सुमारास आर्य लोक दक्षिणेत आले.गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, पांडुराष्ट्र इ. वसाहती करून स्थायिक झाले.अशोकाच्या शिलालेखात जो ‘रास्टिक’ लोकांचा उल्लेख आढळतो, ते हेच लोक होत. आंध्रभृत्य म्हणजेच सातवाहन यांच्या साम्राज्यात ते एका सत्तेखाली येऊन त्यांचे एक मोठे राष्ट्र निर्माण झाले, ह्या मोठ्या राष्ट्रालाच ‘महाराष्ट्र’ असे नाव पडले.”

७. श्रीधर व्यंकटेश केतकर ह्यांच्या मतानुसार महार आणि रठ्ठ ह्यांचा संयोग होऊन ‘महारठ्ठ’ हा शब्द बनला, त्याचे पुढे नाम ‘महारठीक’

व नंतर 'महाराष्ट्र' शब्द बनला.केतकरांना लोकवाचक संज्ञा मान्य असल्याचे दिसते.

८. महामहोपाध्याय पां.वा.काणे ह्यांच्या मते 'महान राष्ट्र' ह्यावरून महाराष्ट्र ह्या शब्दाची व्युत्पत्ती झाली आहे.

९. शं.बा.जोशी ह्यांनी 'मऱ्हाटी संस्कृति : काही समस्या' ह्या ग्रंथात 'मरहट्ट' हा शब्द कानडी असून त्याचा अर्थ 'झाडीमंडळ'किंवा'जंगलाचा प्रदेश' असा प्रदेशवाचक होतो. 'मरहट्ट' ह्या शब्दाचे रूपांतर पुढे 'महाराष्ट्र' असे झाले असा अंदाज शं. बा. जोशी ह्यांनी व्यक्त केला आहे.

१०. महाराष्ट्र ह्या प्रदेशाला 'महाराष्ट्र' हे नाव पडण्यापूर्वी ह्याचे विदर्भ, अश्मक, कुंतल, अपरांत, गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, पांडुराष्ट्र असे घटक विभाग असून त्यांचे उल्लेख प्राचीन संस्कृत वाङ्मयात वारंवार आलेले आढळतात. बृहदारण्यकोपनिषद, रामायण व महाभारत ह्यांतून विदर्भाचा उल्लेख अनेक वेळा आलेला आहे. गोदावरी नदीच्या तीरावरील प्रदेश तो 'अश्मक' (राजधानी प्रतिष्ठान किंवा पैठण), कृष्णेच्या उगमाजवळचा अथवा त्याच्या पश्चिमेचा तो 'अपरांत' म्हणजे 'कोकण', 'गोपराष्ट्र' म्हणजे नाशिकभोवतालचा प्रदेश व त्याच्या दक्षिणेचा प्रदेश तो 'मल्लराष्ट्र' असे मानले जाते. ह्या सर्व प्रदेशांत माहाराष्ट्री प्राकृत भाषा प्रचलित होऊन त्या सर्वांचा मिळून एक मोठा प्रदेश निर्माण झाला, त्यालाच 'महाराष्ट्र' असे संबोधले जाऊ लागले, अशीही व्युत्पत्ती दिली जाते.


**समारोप**

एकूणच महाराष्ट्र ह्या देशनामाच्या व्युत्पत्तीबाबत अभ्यासकांनी अनेक मतमतांतरे नोंदवलेली आहेत.विदर्भ, अश्मक, कुंतल, अपरांत, गोपराष्ट्र, मल्लराष्ट्र, पांडुराष्ट्र ह्या सर्व राष्ट्रांचे मिळून बनलेले एक राष्ट्र म्हणजे 'महाराष्ट्र' होय. साधारणपणे इ.स.पू. ३०० च्या सुमारास 'महाराष्ट्र' हे नाव पडले असावे. प्राचीन काळी देशाच्या विस्तारावरून त्या प्रदेशाला तशी नावे पडल्याची उदाहरणेही मिळतात.


संदर्भ ग्रंथसूची


१. कर्वे इरावती, 'महाराष्ट्र एक अभ्यास', पुणे, १९७१.
२. कर्वे चिं.ग.; जोगळेकर स.आ.; जोशी य.गो., संपा. 'महाराष्ट्र परिचय : अर्थात संयुक्त महाराष्ट्राचा ज्ञानकोश', २ खंड, पुणे, १९५४.
३. केतकर श्री.व्यं. 'प्राचीन महाराष्ट्र, २ भाग', पुणे, १९३५, १९६३.
४. खैरे विश्र्वनाथ, 'द्रविड महाराष्ट्र', पुणे, १९७७.
५. जोशी शं.बा., 'मऱ्हाटी संस्कृति : काही समस्या', पुणे, १९८०.
६. पंडित अविनाश, 'महाराष्ट्र राज्य', नोंद लेख, मराठी विश्वकोश.

# महाराष्ट्र देशनामाची उत्पत्ती : एक शोध



**ऐरण स्तंभालेख, जि.सागर, मध्यप्रदेश**



**ऐहोळे प्रशस्ती शिलालेख, कर्नाटक**

# संयुक्त महाराष्ट्र चळवळ, महाराष्ट्राची जडणघडण आणि भारताचा विकास

**प्रास्ताविक :**

१ मे १९६० ह्या दिवशी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र आकाराला आला.सन १९४० ते १९६० ह्या दरम्यान कामगार - शेतमजूर ह्या श्रमिकांद्वारे लोकचळवळ उभारून संयुक्त महाराष्ट्र चळवळ पुर्णत्वास नेले. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनामध्ये अनेक ज्ञात-अज्ञात हुतात्मे, नेते, साहित्यिक ह्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

**“ झालाच पाहिजे, झालाच पाहिजे**

**संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे ”**[१]

संयुक्त महाराष्ट्र आंदोलनामध्ये ह्या घोषणेने संपूर्ण मराठी भाषिक समाज एकजूट झाला.

आचार्य अत्रे, सेनापती बापट, अण्णा भाऊ साठे, शाहीर अमरशेख, शाहीर गव्हाणकर, चिंतामणराव देशमुख अशा अनेक ज्ञात मान्यवर लेखकांनी आपल्या साहित्यिक व कृतिशील योगदानाने संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश साकार केला.१९६० नंतर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण ह्यांच्या पुढाकाराने 'महाराष्ट्र' ह्या मराठी राज्याने सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रांत उल्लेखनीय आणि प्रागतिक घौडदौड करून एकूणच भारताच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान केले.

**महाराष्ट्राची संकल्पना :**

'महाराष्ट्र' हे देशनाम फार पुरातन काळापासून अस्तित्वात आहे. महाराष्ट्राला प्राचीन वाङ्मयात ‘दंडकारण्य’, ‘दक्षिणापथ’, ‘नरराष्ट्र’, ‘नवराष्ट्र’ असा उल्लेख आला आहे. ’महाराष्ट्र’ हे देशनाम इसवी सनाच्या चौथ्या शतकापासून रूढ असल्याचे दिसते. ‘बृहदसंहिता’. ‘काव्यादर्श’ या प्राचीन ग्रंथांत 'महाराष्ट्र' हे देशनाम वापरलेले दिसते. मराठी व महाराष्ट्र असे समीकरण निर्माण झालेले आहे.

**स्वातंत्र्योत्तर भारत आणि भाषावार प्रांतरचना :**

संयुक्त महाराष्ट्राची मागणी भाषावार प्रांतरचना मागणीइतकीच जुनी आहे. प्रा.विठ्ठल वामन ताम्हणकर ह्यांनी इ.स.१९१७ मध्ये ‘लोकशिक्षण’ ह्या मासिकात एक लेख लिहिला, ह्या लेखात मुंबई प्रांत, मध्य प्रांत, वऱ्हाड, हैद्राबाद ह्या संस्थानात विभागला गेलेला मराठी भाषिक प्रांत एकत्र आणून एकसंघ महाराष्ट्राची निर्मिती करावी, असा विचार व्यक्त केला होता. इ.स. १९२० मध्ये महात्मा गांधी ह्यांनी राष्ट्रीय सभेच्या (काँग्रेस) अधिवेशनात ‘भाषावार प्रांतरचना’ हा मुद्दा मान्य केला. लोकमान्य टिळक देखील भाषावार प्रांतरचनेच्या बाजूचे होते. १५ ऑक्टोबर १९३८ मध्ये मुंबईतील स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मराठी साहित्य संमेलनात पहिल्यांदा मराठी राज्याचा ठराव मांडला गेला. ज्येष्ठ नेते शंकरराव देव ह्यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन करण्यात आली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत ‘मुंबई’ हा कळीचा मुद्दा होता. स्वतंत्र भारतात मराठी भाषकांचे राज्य स्थापन करण्यासाठी ‘संयुक्त महाराष्ट्र चळवळ’ हा लढा

उभारला गेला. साहित्यिक, सांस्कृतिक, वैचारिक, राजकीय ह्या सर्व अंगाने संयुक्त महाराष्ट्र चळवळ उभी राहिली. इ.स.१९४६ चे साहित्य संमेलन ग.त्र्यं.माडखोलकर ह्यांच्या अध्यक्षतेखाली झाले.ह्या संमेलनात ‘संयुक्त महाराष्ट्र समिती’ स्थापन झाली.संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणारे तीन ठराव साहित्यिकांनी पाठविले, ह्या ठरावांना तत्कालीन राजकीय नेत्यांनी पाठिंबा दिला. इ.स.१९३८ मध्ये माधव त्र्यंबक पटवर्धन तथा माधव ज्युलियन व इ.स.१९४० मध्ये ग.त्र्यं.माडखोलकरांनी महाराष्ट्र एकीकरणाचा विषय उपस्थित केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्यांचा संयुक्त महाराष्ट्र चळवळीला पाठिंबा होता. महाराष्ट्रातील डाव्या पक्षांनी प्रारंभीपासूनच मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राला पाठिंबा दिला. स्वातंत्र्यानंतर भाषिक राज्यांची मागणी होऊ लागली. आंध्रप्रदेश राज्याची मागणी ‘पोट्टी श्रीरामुलु’ ह्यांच्या बलिदानानंतर पूर्ण झाली. भाषावार प्रांतरचनेसाठी दार कमिशन, जे.व्ही.पी. कमिटी, फाजल अली आयोग असे आयोग नेमण्यात आले.फाजल अली आयोगाने महाराष्ट्रासंदर्भात नकारात्मक अहवाल दिल्यानंतर महाराष्ट्रभर असंतोषाचा डोंब उसळला.नेहरूंनी सौराष्ट्रासह गुजरात, विदर्भासह महाराष्ट्र व स्वतंत्र मुंबई अशा त्रिराज्यांची योजना जाहीर केली.त्रिराज्य योजनेत महाराष्ट्रापासून मुंबई तोडल्यामुळे अन्यायाची भावना मराठीजनांत निर्माण होऊन संयुक्त महाराष्ट्र चळवळीने जोर धरला. बापट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एस.एम.जोशी, आचार्य तथा प्रल्हाद केशव अत्रे, श्रीपाद अमृत डांगे, शाहीर अमरशेख, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, भाई उद्धवराव पाटील, प्रबोधनकार तथा केशव सीताराम ठाकरे हे संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे नेते ठरले.आचार्य अत्र्यांनी आपल्या मराठा दैनिकात संयुक्त महाराष्ट्राचा जोरदार पुरस्कार केलाच, तर

विरोधकांवर बोचरी टिका केली. अत्र्यांनी संयुक्त महाराष्ट्राला विरोध करणाऱ्यांचा खरपूस समाचार घेतला. शाहीर अमरशेख, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर गव्हाणकर ह्यांनी आपल्या कलाविष्कारांद्वारे मराठी अस्मिता जागृत ठेविली. २० नोव्हेंबर १९५५ मोरारजी देसाई व स.का.पाटील ह्या नेत्यांनी चौपाटीवर सभा घेऊन महाराष्ट्र विरोधी प्रक्षोभक विधाने केली.ह्या सभेत लोकांनी संतापून सभा उधळली.२१ नोव्हेंबर १९५५ रोजी आंदोलनावेळेस पोलीस गोळीबारामध्ये १५ व्यक्तींना प्राण गमवावा लागला. जानेवारी-फेब्रुवारी १९५६ रोजी केंद्रशासित मुंबईची घोषणा झाल्यानंतर लोक रस्त्यांवर उतरले.हरताळ, सत्याग्रह व मोर्चे सुरू झाले. तत्कालीन मुंबई प्रांतसरकारने सत्तेचा दुरुपयोग करून गोळीबाराद्वारे ८० लोकांना ठार मारले. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात एकूण १०५ जणांनी प्राणांची आहुती दिली. संयुक्त महाराष्ट्र समितीने दिल्ली येथे प्रचंड सत्याग्रह घडवून आणला. भारताचे तत्कालीन अर्थमंत्री सी.डी.देशमुख ह्यांनी आपल्या अर्थमंत्रीपदाचा राजीनामा दिला.[२]ह्या राजीनाम्यामुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळीला अधिक बळ प्राप्त झाले. १ नोव्हेंबर १९५६ मध्ये केंद्राने मुंबई द्वैभाषिक राज्य स्थापन केले. ह्याला महाराष्ट्र व गुजरात येथून कडाडून विरोध झाला. संयुक्त महाराष्ट्र समितीने १९५७ साली लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणुक लढवली. ह्या निवडणुकीत समितीने विधानसभेत ३९८ पैकी तब्बल १५५ जागांवर विजय मिळविला. स्वाभाविकच संयुक्त महाराष्ट्र समिती प्रमुख विरोधी पक्ष बनली. डॉ.आर.डी.भंडारे हे समितीकडून पहिले विरोधी पक्षनेते बनले. सन १९६२ या वर्षी निवडणुकीला सामोरे जायचे असल्याने केंद्रीय नेते संयुक्त महाराष्ट्राला

अनुकूल झाले. १ मे १९६० ह्या कामगारदिनी ‘महाराष्ट्र’ ह्या मराठी भाषिक राज्याची स्थापना झाली.

**संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील साहित्यिकांचे योगदान :**

संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये प्रत्यक्ष लिखाणाद्वारे तसेच कृतिशील पुढाकाराद्वारे अनेक लेखकांनी, साहित्यिकांनी योगदान दिले. माधव त्र्यंबक पटवर्धन तथा माधव ज्युलियन, ग.त्र्यं.माडखोलकर, आचार्य अत्रे, सेनापती बापट, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, शाहीर अमरशेख, शाहीर गव्हाणकर इत्यादी अनेक मराठी साहित्यिकांनी लिखाण तसेच प्रत्यक्ष कृतिद्वारे संयुक्त महाराष्ट्र चळवळ पुढे नेली.

आचार्य अत्रे ह्यांनी ‘मराठा’ ह्या आपल्या दैनिकातील लिखाणाद्वारे संयुक्त महाराष्ट्रवादी भूमिका घेतली तसेच संयुक्त महाराष्ट्रविरोधी नेत्यांवर कोरडे ओढले.[३] १९५७ च्या विधानसभा निवडणुकीत ते आमदार म्हणून संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे निवडून आले. इ.स.१९३८ व इ.स.१९४० ह्या दोन मराठी साहित्य संमेलनात ग.त्र्यं.माडखोलकर ह्या मराठी साहित्यिकाने महाराष्ट्र एकीकरणाचा विषय उपस्थित केला. इ.स.१९४६ च्या ग.त्र्यं.माडखोलकरांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या ‘बेळगाव’ च्या मराठी साहित्य संमेलनात संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन करण्यात आली आणि संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणारे तीन ठराव संमत करण्यात आले.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात अग्रेसर असलेल्या सेनापती बापटांनी

**“ महाराष्ट्र मेला तरी राष्ट्र मेले! महाराष्ट्राविना राष्ट्रगाडा न चाले !**

**खरा वीर वैरी पराधिनतेचा ! महाराष्ट्र आधार हो भारताचा!”**[४]

ह्या सार्थ ओळी प्रकट केल्या.

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे ह्यांनी कॉ. श्रीपाद अमृत डांगे ह्यांच्या प्रभावातून कम्युनिस्ट विचारसरणीने प्रभावित होऊन १९४४ मध्ये दत्ता गव्हाणकर, शाहीर अमरशेख ह्यांना सोबत घेऊन लालबावटा कला पथक स्थापन केले.ह्या पथकाने कामगारांमध्ये संयुक्त महाराष्ट्र चळवळीबद्दल जागृती घडविण्यात अतुल्य योगदान दिले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या पार्श्वभूमीवर साठेंनी 'मुंबईची लावणी', 'मुंबईचा गिरणी कामगार' ही गाणी लिहिली.

शाहीर दत्ता ना.गव्हाणकर हे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अग्रणी कम्युनिस्ट कार्यकर्ते आणि लोककलावंत होते. "शौर्याची तव परंपरा महाराष्ट्रा, उठून बघ जरा" हा गव्हाणकरांचा पोवाडा संयुक्त महाराष्ट्र चळवळीत अत्यंत लोकप्रिय ठरला. गव्हाणकरांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळ पुढे नेण्यासाठी शाहीर अमरशेख, चंदू भरडकर, अण्णा भाऊ साठे, आत्माराम पाटील ह्यांच्या सहकार्याने मुंबईतील युवकांची परिषद भरवली. गव्हाणकरांच्या पोवाड्यांनी सर्वसामान्य शोषित कामगारांमध्ये चैतन्य निर्माण केले.

शाहीर अमरशेख तथा मेहबूब हुसेन पटेल हे संयुक्त महाराष्ट्र चळवळ पुढे नेणारे नामवंत शाहीर होते.'बर्फ पेटला हिमालयाला', 'रागारागाने गेलाय् निघून', 'सुटला वादळी वारा', 'जाग मराठा – आम जमाना बदलेगा' इत्यादी गीते लिहून संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा यशस्वी प्रचार केला.

**"जनतेच्या सत्तेची ज्योत जागती.........**
**गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती,,,,,,**
**गोव्याच्या फिरंग्याला चारुनी खडे.....**

**माय मराठी बोली चालली पुढे,**
**एक भाषिकांची होय संगती,**
**गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती.....”** [५]

अशी शाहिरी कविता लिहून संयुक्त महाराष्ट्र चळवळ जागवण्याचे कार्य अमर शेख ह्यांनी केले.

**महाराष्ट्राविना राष्ट्रगाडा न चाले :**

महाराष्ट्रात जे राबवले जाते, ते देशपातळीवर देखील विविध योजनाच्या रूपाने राबविले जाते.आरक्षणाच्या धोरणांपासून रोजगार हमी योजनेपर्यंत, सहकारी साखर कारखानदारी ते स्वच्छता अभियानापर्यंत अनेक बाबतीत भारताने महाराष्ट्राचे अनुकरण केले आहे.

‘महाराष्ट्र’ हे भारतातील प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते.अनेक बाबींमध्ये महाराष्ट्र पुढे आणि देश मागे असे चित्र पाहायला मिळते. आरक्षण धोरण, रोजगार हमी योजना, स्वच्छता अभियानाचे मॉडेल, तंटामुक्त गाव मोहीम, शिक्षण धोरण,स्थानिक स्वराज्य संस्थामधील स्त्री-आरक्षण धोरण, जमीन सुधारणा करणारा कुळकायदा अशा महाराष्ट्रातील अनेक योजना अधिक विकसित होऊन देशपातळीवर तसेच विविध राज्यांमध्ये राबवल्या गेल्या.भारताच्या विकासात महाराष्ट्राने दिलेले योगदान अमीट असेच आहे.

**संदर्भसूची :**

१. भावे मधुकर, ५५ वर्षांचा सुवर्णमहोत्सव, महाराष्ट्र ५०, २०११, पृ.क्र.११.

२. देशमुख चिंतामणराव, माझा जीवनप्रवाह पृ.क्र.१५१.

३. पै शिरीष,'संयुक्त महाराष्ट्रा'चा कलश आचार्य अत्रे यांनी आणला, महाराष्ट्र ५०, पृ.क्र.४६.


४. सं.भावे मधुकर, ५५ वर्षांचा सुवर्णमहोत्सव, महाराष्ट्र ५०, पृ.क्र.४.

५. तत्रैव, ,पृष्ठ क्र.३०.



# संयुक्त महाराष्ट्र चळवळ




मराठी सीमाप्रदेश
लेके रहेंगे !
UNPRINCIPLED
ARBITRATION


संयुक्त
महाराष्ट्र

# भारतीय योगदर्शन : एक मागोवा

## भारतीय योगाची पूर्वपरंपरा

पतंजली योगाला 'चित्तवृत्ती निरोध' असे म्हणतो.योगाला ६ हजार वर्षांची समृद्ध परंपरा लाभली आहे. पतंजली ऋषी जे 'नाग' वंशाचे होते.ते तीन शास्त्रांचे उद्गाते मानले जातात. व्याकरण, योग आणि चिकित्सा ह्या तीन शास्त्रांचे प्रवर्तन पतंजली ह्यांनी केले आहे. महर्षि पतंजलि हे योगशास्त्र या ग्रंथाचे कर्ते आहेत.पतंजली नाग जातीचे असल्याने त्यांना 'नागमुनी' असेही म्हणतात. महर्षी पतंजली ह्यांचा कालखंड इसवी सन पूर्व २०० वर्ष मानला जातो.त्या काळात शृंग घराण्यातील पुष्यमित्र शृंग राज्य करीत होता. ह्या कालखंडात महर्षी पतंजली ह्यांनी 'योगसूत्र'ह्या ग्रंथाचे लेखन केले. ह्या ग्रंथात योगाची आठ अंगे सांगितली आहेत.म्हणून ह्यास 'अष्टांग योग'असेही म्हणतात. यम, नियम, योगासन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी ही योगाची आठ अंगे आहेत.योग म्हणजे मानवी शरीर-मनाचे शास्त्र होय.योगास चित्ताला एकाग्र बनविण्याची विधी किंवा मनाची व्याधी दूर करणारा मार्ग मानले जाते.योगदर्शन प्राचीन अश्या 'सांख्य दर्शना'पासून निर्माण झाले आहे. सांख्य तत्त्वज्ञानाचे अनुभववादी व प्रयोगात्मक रूप म्हणजे 'योगदर्शन' होय. योगसूत्र हा ग्रंथ चार भागात विभागलेला आहे. समाधी पाद (५१ सूत्र), साधना पाद (५५ सूत्र), विभूती पाद (५५ सूत्र), कैवल्य पाद (३४ सूत्र) अशी एकूण १९५ सूत्रे ह्या ग्रंथात आहेत. ह्यातील समाधी पाद आणि साधन पाद ह्या भागातील सूत्रे सामान्य व्यक्तींकरिता आहेत.आसन म्हणजे शरीराची सुखमय-आरामदायक स्थिती होय. श्वास नियंत्रित करण्याला योगात 'प्राणायाम'असे म्हणतात. प्राणायामामुळे

चित्त शुद्ध बनते.पतंजली हा योगशास्त्राचा निर्माता नाही.सर्वात प्राचीन सांख्य तत्त्वज्ञानातून योग निर्माण झाला असे अभ्यासक मानतात. सांख्य तत्त्वज्ञानाचा प्रवर्तक कपिल हा योगाचा प्रणेता मानला जातो.

**"अश्वत्थः सर्ववृक्षाणां देवर्षीणाञ्च नारदः ।**

**गन्धर्वाणां चित्ररथः सिद्धानां कपिलो मुनिः॥"**

(श्रीमद्भगवद्गीता, दहावा अध्याय विभूतियोग श्लोक क्र.२६)

असा गीतेमध्ये श्रीकृष्ण कपिल ऋषी ह्यांचा उल्लेख करतात.सर्व सिद्धांमध्ये कपिल मुनी श्रेष्ठ असे गीतेत म्हटले आहे.परंतु कपिल ऋषीबाबत ऐतिहासिक पुरावा मात्र उपलब्ध नाही.

**योग : सिंधु संस्कृती व वैदिक वाङ्मय**

जगातील सर्वात जुन्या सिंधु संस्कृतीत देखील योग परंपरेचा आढळ सापडतो.योगी मुद्रा आलेल्या शिक्क्यांवर पशुपती योग्याच्या चर्येवर शांभवी मुद्रा दाखवलेली आहे.ह्या शिक्क्यांवर असलेला योगी भद्रासनात दिसतो. सिंधु संस्कृतीतील समाज हा मातृसत्ताक होता असा काही अभ्यासकांचा कयास आहे. सांख्य दर्शन आणि योग दर्शन मातृसत्ताक व्यवस्थेतून आला असे काही अभ्यासक म्हणतात.सिंधु संस्कृतीतील योगाची पदचिन्हे शिक्के, मातीची खेळणी ह्यातून दिसतात.वैदिक वाङ्मयातील सर्वात प्राचीन 'ऋग्वेद' ह्या ग्रंथातील गायत्री मंत्रात 'धीमही' म्हणजे ध्यान करा असा उल्लेख आढळतो. तैत्तिरीय उपनिषद, कठोपनिषद ह्या उपनिषदांमध्ये योगाचे तपशीलवार वर्णन कएके आहे.योगात मृत्यूपार जाण्याची इच्छा व्यक्त केली आहे.

**योग आणि श्रमण परंपरा**

योग आपल्याला गौतम बुद्ध, महावीर ह्यांच्या तत्त्वज्ञानात देखील दिसतो.गौतम बुद्ध ह्यांना पद्मासन ह्या आसनात चर्येवर खिचरी मुद्रा असताना वैशाख पौर्णिमेला बुद्धत्व प्राप्त झाले, पतंजली ह्या अवस्थेला ‘आनंदानुगत समाधी’असे म्हणतात.  स्थिरसुखमासनात सतत सात दिवस राहिल्यानंतर गौतम बुद्ध ह्यांना ‘वितर्कानुगत समाधी’प्राप्त झाली.ज्ञान प्राप्तीकरिता आसुसलेला त्राटक अवस्थेतील बुद्ध एक हठयोगी वाटतो.पतंजलीच्या ‘योगसूत्रा’वर भारतीय श्रमण परंपरेचा प्रभाव आहे.योगदर्शनातील ध्यान, समाधी ह्या अंगांवर बौद्ध तत्त्वज्ञान तर यम, नियम ह्या अंगांवर जैन तत्त्वज्ञानाचा प्रभाव आहे.योगसूत्रातील  आसन, ध्यान, समाधी बुद्धांनी ‘योगसूत्रा’च्या अगोदर तीनशे वर्षापूर्वीच सांगितले आहे.हठयोगी भगवान शंकराला ‘आदिनाथ’ मानतात, तर जैन शासनात आद्य तीर्थंकर ऋषभदेवांना ‘आदिनाथ’ म्हणतात. जैनांचे सर्व तीर्थंकर ताडासनात बसलेले दिसतात. तीर्थंकरांनी सर्व इंद्रियांवर विजय मिळवला म्हणून त्यांना ‘जीन’ म्हणतात.योगसुद्धा इंद्रिय विजयाला महत्त्वाचे मानतो.पतंजली यम ह्या अंगाला ‘व्रत’असेही म्हणतो. जैनांच्या ‘महाव्रतां’चा प्रभाव योगदर्शनातील यम ह्या अंगावर दिसतो. स्व-ला जिंकलेल्या व्यक्तीस ‘महावीर’ म्हणतात. जैन धर्मातील चोविसावे तीर्थंकर ‘वर्धमान महावीर’ होत. योगदर्शनातील  अष्टांग योग स्व-विजय प्राप्त करण्यावर भर देतो.

**योग आणि महाभारत**

**नास्ति सांख्य समं ज्ञानं नास्ति योग समं बलं॥**”

(महाभारत; शांति-पर्व,मोक्षधर्मपर्व,श्लोक ३०४/२)

“सांख्य दर्शनासारखे ज्ञान नाही, योगसारखे बळ नाही.” असा महाभारतात उल्लेख मिळतो. गीतेतील प्रत्येक अध्यायाला ‘योग’ म्हटले आहे. गीतेतील सहाव्या ‘आत्मसंयम योग’ ह्या अध्यायात योगविधी, आत्म--नियंत्रणाचे महत्त्व प्रतिपादित केले आहे.

**“नास्ति मायासमं पापं नास्ति योगात्परं बलम्**

**नास्ति ज्ञानात्परो बन्धुर्नाहंकारात्परो रिपुः॥**“

(घेरंड संहिता श्लोक क्र.४)

घेरंड संहिता ह्या १७व्या शतकातील ग्रंथात “जगात मायेसारखे पाप नाही, योगासारखे जगात कोणतेही सामर्थ्य नाही. ज्ञानापेक्षा चांगला मित्र नाही आणि अहंकारापेक्षा मोठा शत्रू नाही.” असा उल्लेख आढळतो.

**योगसूत्रावरील भाष्यग्रंथ**

इसवी सनाच्या दुसऱ्या शतकात व्यास नावाच्या विद्वानाने ‘योगसुत्र’ ह्या ग्रंथावर ‘योगभाष्य’ लिहिले. व्यासभाष्यावर विवेचन करण्याच्या हेतूने वाचस्पति मिश्रांनी तत्त्ववैशारदी, विज्ञानभिक्षूंनी योगवार्त्तिक, आचार्य शंकर यांनी विवरण, हरिहरानन्द आरण्य यांनी भास्वती अशा काही प्रमुख टीका लिहिल्या आहेत. अल्-बिरूनीने योगसुत्र आणि व्यासभाष्य यांचा अरबी भाषेतही

व्याख्यापूरक अनुवाद केला आहे.  व्यासभाष्याचा अभ्यास केल्याशिवाय योगसूत्रांचे संपूर्ण ज्ञान होऊ शकणार नाही, असा या अभ्यासकांचा अनुभव आहे. त्यामुळे योगदर्शनाच्या परंपरेत व्यासभाष्याचे योगदान महत्त्वाचे आहे.

**योग आणि स्थापत्य कला**

घारापुरीची लेणी किंवा एलिफंटा लेणी ह्या पाषाणात खोदलेल्या लकुलिश पाशुपत  शैव लेणी इ. स. ९ वे शतक ते इ. स. १३ वे शतक या कालखंडात निर्माण करण्यात आल्या आहेत. ह्या लेण्यांमध्ये  शिल्पकाराने मनात ध्यानाद्वारे शिल्पांकन करीत प्रतिमा निर्माण केल्या आहेत. ध्यानाद्वारे प्राप्त अनुभूतीचे वर्णन इंद्रियातीत असून बुद्धी त्याचे वर्णन करू शकत नाही. घारापुरी गुंफेत विशाल सदाशिवाच्या मूर्तीवर योगचर्या दिसते.खजुराहो येथील मातंगेश्वर मंदिर आदियोगी शिवाचे मंदिर आहे. मातंगेश्वर मंदिरावर सत्त्व, रज, तम स्वरूपी प्रकृतीचे चित्रण केले आहे. खजुराहो मंदिरांवर तंत्रापेक्षा सांख्य तत्त्वज्ञानाची छाप दिसते. प्राचीन काळापासून भारतात आध्यात्मिक लोकशाही असून, तिची परंपरा ५००० वर्षाची आहे. शिव हा आदियोगी मानला जातो. शिवाचे प्रतीक असलेल्या पिंडीवर असलेली सर्परूपी कुंडलिनी हठयोगाच्या मूलतत्त्वाचे दर्शन घडवते. इसवी सनाच्या दहाव्या शतकात बांधलेले मितावली येथील ‘चौसष्ठ योगिनी मंदिर’ भारतीय योगाचे स्मारक आहे.

**योग आणि नाथ संप्रदाय**

स्वतःच्या योगशक्तीने प्रत्यक्ष मृत्यूला जिंकणारा हठयोगी म्हणजे गोरक्षनाथ किंवा गोरखनाथ हे नाथ संप्रदायाचे प्रवर्तक मानले जातात. नाथ पंथामध्ये हठयोगाला खूप महत्त्वाचे मानले जाते. .नाथ परंपरेत शिवाला आदिनाथ मानले

जाते.  गोरक्षांचे गुरु मच्छिंद्रनाथ ह्यांना नेपाळमध्ये 'अवलोकितेश्वर' मानले जाते. अवलोकितेश्वराची योगमुद्रा 'मत्स्येंद्रासन' मधुमेहावर प्रभावी योगासन मानले जाते. स्वात्माराम ह्या लेखकाने लिहिलेला 'हठयोग प्रदिपिका' हा ग्रंथ योगपरंपरेत महत्त्वाचा मानला जातो. ह्या ग्रंथात ८४ योग आसनांची चर्चा व विश्लेषण केले आहे. हीच योगासने आज संपूर्ण विश्वात पोहोचली आहेत. नाथ परंपरेतील हठयोग षट्शुद्धीला महत्त्व देतो. षट्शुद्धीमध्ये षट्कर्मांचा समावेश होतो, ज्याद्वारे शरीराची अंतर्गत स्वच्छता करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या सहा क्रिया केल्या जातात. धौती, बस्ती, नेती, त्राटक, नौली  कपालभाती ही षट्कर्मे आहेत.

**योग आणि मराठी संत**

परंपरेने नाथ पंथीय असलेल्या संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' ह्या ग्रंथात योगमार्गाचे आणि कुंडलिनी शक्तीचे सुंदर वर्णन केले आहे. ज्ञानेश्वरांनी भक्तीबरोबरच योगाचेही महत्त्व प्रतिपादित केले आहे. त्यांनी त्यांच्या अभंगांमध्ये योगमार्गाचा उल्लेख केला आहे.ज्ञानेश्वरीमध्ये   विशेषतः सहाव्या अध्यायात, ज्ञानेश्वरांनी योगमार्गाचे आणि कुंडलिनी शक्तीच्या उत्थापनाचे((जागृती) सुंदर आणि काव्यमय वर्णन केले आहे. संत नामदेवांचे गुरु विसोबा खेचर ह्यांनी 'शडूस्छळी' (षट्स्थळ) ह्या ग्रंथात योगपरंपरेचा उल्लेख मिळतो.

योग आणि बंगाल

एकोणिसाव्या शतकात कोलकात्ता येथील कालीमंदिरातील रामकृष्ण परमहंस हे मातृशक्ती पूजक होते. त्यांचे गुरु अवधूत तोतापुरी ह्यांनी रामकृष्णांना समाधी योगाचे  मार्गदर्शन केले, त्याद्वारे रामकृष्ण परमहंस 'असचित्त समाधी' पर्यंत


पोहोचले. रामकृष्ण परमहंस ह्यांचे शिष्य स्वामी विवेकानंद इ. स. १८९६ मध्ये कर्मयोग, राजयोग आणि भक्तियोग हे ग्रंथ लिहून योगदर्शन अमेरिकेत नेले. नंतर अमेरिकेतदेखील योगावर प्रयोग केले गेले.

भारतीय योग परंपरा विज्ञानातील सर्व कसोट्यांवर उतरलेले जीवनोपयोगी तत्त्वज्ञान आहे हे आता सर्वमान्य झाले आहे. योग प्रत्येक मानवाला स्वयंनियंत्रणासाठी पूरक ठरणारे दर्शन आहे. 'योगदर्शन हे असे एकमेव दर्शन आहे, की जे प्रत्यक्ष दैनंदिन जीवनात उपयुक्त ठरते. अचपळ मनाचे नियंत्रण करण्यास योग उपयुक्त ठरते. आजच्या काळात योग निरोगी आरोग्याचा पर्याय झाला आहे. "सदा राहे कंचन सी काया!" ह्या पद्यपंक्तीप्रमाणे योगदर्शनच माणसाला चिरतरुण राहण्यासाठी उपयुक्त ठरू शकते.

**संदर्भ ग्रंथसूची**


१. कोल्हटकर, केशव कृष्णाजी, भारतीय मानसशास्त्र अथवा सार्थ आणि सविवरण पातञ्जल योगदर्शन, आदित्य प्रतिष्ठान, पुणे, २०१४.

२. योग का इतिहास, माहितीपट ; विशुद्धी फिल्म






**कपिल मुनी**

# भारतीय योग परंपरा



**सिंधु संस्कृतीतील योगमुद्रांचे शिक्के**



**महर्षी पतंजली**

# इस्माईलचे मराठी सारस्वत

इस्माईल युसूफ महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच म्हणजेच इ.स.१९३० सालापासून मराठी सारस्वताचा महाविद्यालयाशी घनिष्ठ अनुबंध राहिलेला आहे.अनेक प्रसिद्ध मराठी लेखक प्राध्यापक आणि विद्यार्थी या भूमिकेतून महाविद्यालयाशी निगडित होते.महाविद्यालयाच्या सुमारे ९० वर्षाच्या इतिहासात मराठी सारस्वतातील श्री.बा.रानडे, विमादी पटवर्धन, म.वा.धोंड, बा.सी.मर्ढेकर, पु.शि.रेगे, मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष, के.ज.पुरोहित(शांताराम), विजया राजाध्यक्ष, वसंत आबाजी डहाके हे प्राध्यापक म्हणून ,तर महाराष्ट्राचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व पु.ल. देशपांडे हे विद्यार्थी म्हणून इस्माईल युसूफ महाविद्यालयाशी संबंधित होते.या लेखात या सृजनशील मराठी साहित्यिकांचा आणि त्यांनी सर्जन केलेल्या लेखनाचा परिचय करून देण्यात आला आहे.

## श्री.बा.रानडे

श्रीधर बाळकृष्ण रानडे हे मराठीतील नामवंत कवी महाविद्यालयात स्वातंत्र्यपूर्व काळात 'वनस्पतीशास्त्र' विषयाचे अध्यापन करत. इ. स. १९२३ या वर्षी स्थापन झालेल्या मराठी साहित्य इतिहासात महत्त्वाचे स्थान असलेल्या 'रविकिरण मंडळा'तील ते प्रमुख सदस्य आणि बिनीचे शिलेदार होते.श्री.बा.रानडे यांची पाश्चात्य विज्ञान साहित्यावरून प्रेरणा घेऊन लिहिलेली मराठीतील पहिली विज्ञान कथा ‘तारेचे रहस्य’ इ. स.१९१५ साली मासिक’मनोरंजन’ मधून प्रसिद्ध झाली.,श्री.बा.आणि त्यांची पत्नी मनोरमा या

दोघांच्या कवितांचा एकत्रित असा काव्यसंग्रह 'श्रीमनोरमा' या नावाने प्रसिद्ध झाला.श्री.बा.रानडे यांच्या 'लेझिम चाले जोरात' ,'मृत्यूच्या दाढेतून' या कविता मराठी काव्यात उल्लेखनीय मानल्या जातात.

## विमादी पटवर्धन

वि. मा.दीक्षित पटवर्धन हे एक विनोदी लेखन करणारे मराठी साहित्यिक इस्माईल युसूफ महाविद्यालयात रसायनशास्त्राचे प्राध्यापक होते.ते महाविद्यालयात 'ऑरगॅनिक केमिस्ट्री' (सेंद्रिय रसायनशास्त्र) शिकवित असत. प्रसिद्ध लेखक पी.जी. वुडहाऊस यांचा मानसपुत्र 'जीव्हज्' याला पटवर्धनांनी मराठीत 'जीवा' या नावाने अजरामर केले.'जीते रहो जीवा','जीवाची मर्दुमकी' ही अनुवादित ; 'हास्यकळ्या',' किती हसाल' ही बालसाहित्यपर ;'रत्ना' ही कादंबरी आणि 'साहित्य गुदाम' हे विनोदी अशी अनेक पुस्तके विमादी पटवर्धनांनी लिहिली.

## म. वा.धोंड

मधुकर वासुदेव धोंड हे मराठीतील समीक्षक इस्माईल युसूफ महाविद्यालयात मराठीचे अध्यापन करीत.'ऐसा विटेवर देव कोठे','तरीही येतो वास फुलांना','काव्याची भूषणे', ‘चंद्र चवथीचा','जाळयातील चंद्र','मऱ्हाठी लावणी' या समीक्षात्मक ग्रंथांचे लेखन म. वा.धोंड यांनी केले.त्यांनी लिहिलेल्या ' ज्ञानेश्वरीतील लौकिक सृष्टी ' या समीक्षा ग्रंथाला इ. स.१९९७ या वर्षीचा ' साहित्य अकादमी पुरस्कार' लाभला.

**बा.सी. मर्ढेकर**

बाळ सीताराम मर्ढेकर हे प्रसिद्ध मराठी कवी,लेखक आणि समीक्षक स्वातंत्र्यपूर्व कालखंडात इस्माईल युसूफ महाविद्यालयात काही काळ इंग्रजी विषयाचे प्राध्यापक होते. त्यांना 'मराठी नवकाव्याचे प्रवर्तक' मानले जातात. मर्ढेकर हे भाषाप्रभू असून त्यांचे काव्य वेदनेचे काव्य आहे.'शिशिरगम','काही कविता' हे काव्यसंग्रह;'रात्रीचा दिवस','तांबडी माती','पाणी' या संज्ञाप्रवाही कादंबऱ्या;'सौंदर्य आणि साहित्य','कला आणि मानव' हे समीक्षाग्रंथ अशी मर्ढेकरांची साहित्यसंपदा आहे. इ. स.१९५६ साली बा. सी.मर्ढेकरांना 'सौंदर्य आणि साहित्य' या सौंदर्यशास्त्रावरील समीक्षा ग्रंथासाठी मानाचा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला.

**पु.शि.रेगे**

पुरुषोत्तम शिवराम रेगे हे मराठी सारस्वतातील कवी,नाटककार इस्माईल युसूफ महाविद्यालयात अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक तसेच प्राचार्य होते.पु.शि.रेगे यांनी मराठीत उत्कट प्रेमकविता, सौंदर्यलक्ष्यी संस्कृतप्रचूर काव्य लेखन केले.त्यांच्या कवितेमध्ये स्त्रीशक्ती वेगवेगळया स्वप्नील रूपांमध्ये प्रगट होते.पु.शि.रेगे यांचे ‘फुलोरा’, ‘दोला’, ‘गंधरेषा’, ‘पुष्कळा’ इ. काव्यसंग्रह;’सावित्री’,’रेणू’, ‘मातृका’ या दर्जेदार कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत.पु.शि.रेगे हे इ. स.१९६९ या वर्षी वर्धा येथे भरलेल्या ' अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते."जीवन जगले तर साहित्य जगेल असे नसून साहित्य जगले तरच जगण्यासारखे काही उरणार आहे." अशी पु.शि.रेगे यांची श्रद्धा आणि धारणा होती.

## मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष

मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष हे मराठीतील समीक्षक आणि ललित लेखक इस्माईल युसूफ महाविद्यालयात इंग्रजीचे प्राध्यापक होते. त्यांचे ‘भाषाविवेक’, ‘शब्दयात्रा’ हे समीक्षा ग्रंथ, ‘अमलान’, ‘आकाशभाषिके’ इ. लघुनिबंधसंग्रह, ‘पाच कवी’ हा संपादित ग्रंथ तसेच ‘हिस्टरी ऑफ मराठी लिटरेचर’ हा इंग्रजी ग्रंथ असे साहित्य प्रसिद्ध आहे. मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष यांनी ‘नॅशनल बुक ट्रस्ट’ या संस्थेचे विश्वस्तपद आणि ज्ञानपीठ पुरस्कार समिती व साहित्य अकादमी (मराठी समिती) या संस्थेचे सदस्यपद भूषविले.

## शांताराम

केशव जगन्नाथ पुरोहित उपाख्य ‘शांताराम’ हे मराठीतील नवकथाकार इस्माईल युसूफ महाविद्यालयात इंग्रजीचे प्राध्यापक तसेच प्राचार्य होते. ’अंधारवाट’, ’आठवणींचा पार’, ’उद्विग्न सरोवर’, ’काय गाववाले’, ’चंद्र माझा सखा’, ’चेटूक’, ’छळ आणि इतर गोष्टी’, ‘जमिनीवरची माणसं’, ’ठेवणीतल्या चीजा’, ’धर्म’, ’मनमोर’, ’रेलाँ रेलाँ’,’लाटा’, ’शांताराम कथा’, ’शिरवा’, ’संत्र्यांचा बाग’, ‘संध्याराग’,सावळाच रंग तुझा’, ‘हेल्गेलंडचे चाचे’अशी त्यांची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. शांताराम यांनी अमरावती येथे इ. स.१९८९ या वर्षी भरलेल्या 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनां'चे अध्यक्षपद भूषविले. महाराष्ट्र शासनाच्या वतीने सन २०१३ मध्ये शांताराम यांना विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

## शंकर वैद्य

शंकर वैद्य हे मराठीतील नामवंत कवी आणि गीतकार इस्माईल युसूफ महाविद्यालयात अनेक वर्ष मराठीचे प्राध्यापक आणि विभागप्रमुख होते.कुशल वक्ते,सूत्रसंचालक,काव्यसमीक्षक म्हणूनही वैद्य सरांची ख्याती होती. ‘कालस्वर’ आणि ‘दर्शन’ हे दोन काव्यसंग्रह तसेच 'आला क्षण गेला क्षण' हा कथासंग्रह वैद्य सरांनी लिहिला."स्वरगंगेच्या काठावरती वचन दिले तू मला ", "पालखीचे भोई आम्ही पालखीचे भोई", "शतकांच्या यज्ञातून उठली एक केशरी ज्वाला" अशा अनेक अजरामर शब्दरचनांनी काव्यरसिकांवर कविवर्य शंकर वैद्य यांनी गारूड केले.

## विजया राजाध्यक्ष

विजया राजाध्यक्ष या मराठी साहित्यातील नामवंत स्त्रीवादी लेखिका आणि समीक्षिका इस्माईल युसूफ महाविद्यालयात मराठीच्या प्राध्यापिका होत्या. विजयाबाईंना 'मर्ढेकरांची कविता : स्वरूप आणि संदर्भ' या समीक्षाग्रंथासाठी साहित्य अकादमी (इ.स.१९९३) तर मराठी साहित्यातील समग्र योगदानासाठी 'जनस्थान पुरस्कार'(२०१७) प्राप्त झाला. इ. स.२००० मध्ये इंदूर येथे भरलेल्या 'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना’च्या विजयाबाई अध्यक्ष होत्या.साहित्य संमेलनाच्या इतिहासात अध्यक्षपद भूषविणाऱ्या विजयाबाई या चौथ्या स्त्री लेखिका आहेत.

## वसंत आबाजी डहाके

वसंत आबाजी डहाके हे मराठीचे भाषातज्ज्ञ, कोशकार तसेच लेखक आणि कवी आहेत. ते इस्माईल युसूफ महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक होते. 'चित्रलिपी' या काव्यसंग्रहाकरिता २००९ सालच्या साहित्य अकादमी पुरस्काराने त्यांना गौरवण्यात आले होते. फेब्रुवारी २०१२ मध्ये चंद्रपूर येथे झालेल्या ८५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

## पु.ल.देशपांडे

पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे हे मराठीतील लोकप्रिय लेखक इस्माईल युसूफ महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. लेखक,नाटककार, नट,कथाकार, पटकथाकार, दिग्दर्शक, संगीतकार अशा अनेक भूमिका पुलंनी पार पाडल्या. महाराष्ट्राचे अष्टपैलू आणि लाडके व्यक्तिमत्त्व असलेले पुल यांची 'व्यक्ती आणि वल्ली', 'बटाट्याची चाळ', 'वाऱ्यावरची वरात','असा मी असामी' यांसारखी शेकडो पुस्तके प्रसिद्ध आहेत. पु.ल. देशपांडे यांचा पद्मश्री, पद्मभूषण, महाराष्ट्र भूषण, पुण्यभूषण ,साहित्य अकादमी,संगीत नाटक अकादमी अशा अनेक पुरस्कारांनी गौरव करण्यात आला आहे.

अशा अनेक ज्ञात अज्ञात मराठी सारस्वतातील रत्नांचा सहवास लाभला असल्याने इस्माईल युसूफ महाविद्यालय पावन झाले आहे.

# इस्माईलचे मराठी सारस्वत



श्री.बा.रानडे




पु.शि.रेगे



बा.सी. मर्ढेकर



मंगेश राजाध्यक्ष



पु.ल.देशपांडे



म. वा.धोंड




शंकर वैद्य



विजया राजाध्यक्ष

# श्री शिवछत्रपतींचे मराठी भाषेच्या अभिवृद्धीतील योगदान

**छत्रपती शिवाजी महाराज** हे समस्त महाराष्ट्रीय जनतेचे आराध्य दैवत. कुळवाडीभूषण आणि बहुजनप्रतिपालक असणाऱ्या शिवछत्रपतींनी महाराष्ट्रीय जनतेमध्ये स्वधर्म,स्वभाषा आणि स्वसंस्कृती बद्दल स्वाभिमान जागृत केला.मराठी भाषेच्या अभ्युदय आणि अभिवृद्धीसाठी शिवछत्रपतींनी केलेला दखलपात्र प्रयत्न  म्हणजे शिवरायांच्या आज्ञेवरून शिवकाळात




झालेली आज्ञापत्र, राज्यव्यवहार कोश आणि लेखनप्रशस्ती या ग्रंथांची निर्मिती होय.मराठी भाषा इसवी सनाच्या दहाव्या शतकापासून अस्तित्वात आहे म्हणजेच शिवछत्रपतींच्या सुमारे सहाशे वर्षे आधीपासून. छत्रपती शिवाजी महाराज हे मध्ययुगीन कालखंडातील एक द्रष्टे राज्यकर्ते होते.शिवछत्रपतींनी एक गोष्ट ओळखली होती की, स्वराज्य निर्मितीच्या कार्याबरोबर इथल्या संस्कृतीवर झालेलं परकीयांचे आक्रमण ही परतून लावायला हवे,त्यातूनच ‘आज्ञापत्र’, ‘राज्यव्यवहार कोश’ आणि ‘लेखनप्रशस्ती’ या ग्रंथांची निर्मिती करून घेतली.

भारतीय भाषांवरील परकीय भाषांचा प्रचंड प्रभाव हा परकीयांनी केलेल्या राष्ट्रीय जखमा आहेत आणि त्यांचे व्रण स्वकीय शब्दांनी भरून काढावेत याकामी संस्कृतसारखी बहुप्रसवा भाषेचा आधार घेता येईल अशी

छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका होती.त्याचसाठी त्यांनी मुघली दरबारी रीतिरिवाजांना फाटा देऊन अस्सल भारतीय शिष्टाचार आणले.त्यांनी ‘किल्ला’ हा फारसी शब्द न वापरता ‘गड-दुर्ग’ अश्या शब्दांचे उपयोजन केले.दरबाराला राजसभा असा शब्द वापरला.राज्यकारभारात पंतप्रधान, सुरनीस, अमात्य, सेनापती, कोषाध्यक्ष अशी पदे वापरली.अरबी आणि फारसी शब्दांना हद्दपार करण्यासाठी रघुनाथ पंडित यांच्याकरवी ‘राज्यव्यवहार कोश’ या ग्रंथांची निर्मिती केली.बहामनी राजवटीत मराठी भाषेवर परकीय भाषांच्या आक्रमणामुळे अशुद्ध उच्चार, भाषामिश्रण यांचा प्रभाव पडला.मराठी भाषेतील कित्येक शब्द भ्रष्ट झाले.तत्कालीन मराठी भाषेत दैनंदिन वापरातील कित्येक शब्द परकीय होते.शिवाजी महाराजांनी अरबी-फारसी शब्दांबद्दल प्रतिशब्द म्हणून अस्सल मराठी शब्दांचा कोश निर्मितीचा संकल्प धुंडिराज व्यास आणि रघुनाथ पंडित यांच्याकरवी ‘राज्यव्यवहार कोश’ निर्माण करून घेतला.

शिवछत्रपतींनी बाळाजी आवजी चित्रे यांच्याकरवी लेखनप्रशस्ती लिहून घेतली.राज्यकारभारात पत्रलेखनाला असलेले महत्त्व ओळखून पत्रांचे मायने अस्सल मराठी असावेत यासाठी ‘लेखनप्रशस्ती’ हा ग्रंथ निर्माण झाला.शिवरायांनी मराठी लेखनपद्धतीत सुधारणा घडून आणण्यासाठी यादवकालीन हेमाद्रीपंडितांनी घालून दिलेले नियम वापरण्याचा निर्णय घेतला.रामचंद्रपंत अमात्य यांनी शिवाजी महाराजांच्या आज्ञेवरून निर्माण केलेले ‘आज्ञापत्र’ हा ग्रंथ मराठी राजनीतीवर भाष्य करणारा मध्ययुगीन काळातील एकमेव मराठी ग्रंथ आहे. ‘आज्ञापत्र’ या ग्रंथाचा उल्लेख ‘ऐतिहासिक मराठी साहित्यातील अनमोल रत्न’ असा केला जातो.

इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांच्या मते शिवकाळात छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या भाषाशुद्धी कार्यामुळे सन १६२८ मध्ये मराठी पत्रलेखनात मराठी शब्दांचे प्रमाण १४.४ टक्के होते,ते सन १६७७ मध्ये ६२.७ टक्के तर सन १७२८ मध्ये ९३.७ टक्क्यांपर्यंत वाढले. आज लाखभर शब्दसंख्या असलेल्या मराठी भाषेत तुर्की,फारसी आणि अरबी शब्दांचे प्रमाण केवळ २९०० शब्द (२.९६ टक्के) इतकेच आहे.

शिवकाळात राज्यकारभारात फारसी भाषेचे प्राबल्य होते.कोणतीही भाषा चांगली किवा वाईट नसते,परंतु लोकांना फारसी भाषा समजत नव्हती. साहजिकच रयतेला आपल्या वाटणाऱ्या मराठी भाषेत राज्यकारभार सुरू करण्याचे महत्कार्य छत्रपती शिवाजी महाराजांनी केले.आणि यातूनच मराठी भाषेचा खऱ्या अर्थाने अभ्युदय आणि अभिवृद्धी झाली,असे म्हणता येईल.



**रामचंद्रपंत अमात्य**


Sieuwagie gewezen
Maratise Vorst.

# संत संताजी जगनाडे : व्यक्तित्व आणि कवित्व

## ❖ प्रास्ताविक:

मध्ययुगीन कालखंडात भक्ती चळवळी संपूर्ण भारतभर निर्माण झाल्या. मध्ययुगात महाराष्ट्रात भागवत(वारकरी) संप्रदायप्रणित भक्ती परंपरेत अनेक अठरापगड जातीतील संत निर्माण झाले.महाराष्ट्रीय समाजात आध्यात्मिक समता, मोक्षिकाधिष्ठीत लोकोध्दार ही जीवनमूल्ये प्रस्थापित करण्याचे कार्य वारकरी संतांनी केले. आजचा सर्वच बाबतीत प्रागतिक दिसणारा पुरोगामी विचारांचा महाराष्ट्र हीच संत साहित्याची सामाजिक फलश्रुती आहे. प्रस्तुत शोधनिबंधात सतराव्या शतकातील थोर परंतु उपेक्षित राहिलेला मराठी संतकवी संताजी महाराज जगनाडे ह्यांचे व्यक्तित्व, कवित्व आणि अभंगातील तत्त्वज्ञान प्रातिनिधिक रूपाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## ❖ संत संताजी महाराज जगनाडे: व्यक्तित्व

संताजी महाराज जगनाडे (इ.स.१६२४ ते इ.स.१६८८) ह्यांचा जन्म ८ डिसेंबर १६२४ (श्रावण शुद्ध नागपंचमी शके १७०२) मध्ये पुणे जिल्ह्यात खेड तालुक्यातील चाकण ह्या गावी झाला. नंतर त्यांनी आपल्या आजोळी सुदुंबरे ह्या ठिकाणी वास्तव्य केले. त्यांच्या वडिलांचे नाव विठोबा तर आईचे नाव मथाबाई असे होते. वडील आणि आई विठ्ठलभक्त असल्याने संताजींवर बालपणापासून धार्मिक संस्कार झाले. कीर्तनाला, भजनाला जाण्याची सवय संताजींना लागली. इ.स.१६२८ ते इ.स.१६३१ ह्या वर्षांमध्ये महाराष्ट्रात

पडलेल्या भयावह दुष्काळाचा प्रभाव संताजींच्या बालमनावर पडला. तेली यातीत जन्म झाल्याने संताजींनी हिशोब करण्याइतपत आणि लिहिता-वाचता येईल इतके शिक्षण घेतले होते. तत्कालीन समाजरुढीनुसार संताजींचा विवाह वयाच्या बाराव्या वर्षी (इ.स.१६३५) यमुनाबाई ह्यांच्या बरोबर झाला. लहानपणापासून धार्मिक संस्कार असल्याने त्यांचे सामाजिक कार्यात जास्त लक्ष होते. वयाच्या सोळाव्या वर्षी कीर्तनाच्या निमित्ताने चाकणच्या चक्रेश्वर मंदिरात जानेवारी १६४० मध्ये संताजींची भेट संत तुकारामांबरोबर झाली आणि त्यांच्या जीवनाला सकारात्मक कलाटणी मिळाली. त्या काळी संत तुकारामांचे समाजाला कीर्तन, अभंग आदी माध्यमाद्वारे शिकवण देण्याचे कार्य चालू होते. संत तुकारामांची कीर्ती महाराष्ट्रात सर्वदूर पसरली होती. तुकाराम महाराजांची कीर्तने, भक्ती यांनी प्रभावित होऊन संताजींनी संत तुकारामांचे शिष्यत्व पत्करले. संत तुकाराम हे संताजी महाराजांचे आध्यात्मिक गुरु होते. संत तुकाराम ह्यांच्या कीर्तनसेवेत  संताजीचा समावेश चढत्या क्रमाने टाळकरी, धृपदे, लेखनिक, शिष्य असा होत गेला. संत तुकाराम महाराजांचा सहवास प्राप्त झाल्यानंतर संताजी तुकाराम महाराजांच्या प्रसिद्ध चौदा टाळकऱ्यांपैकी एक झाले. तब्बल सोळा वर्षाचा संत तुकारामांचा सहवास संताजींना लाभला. योगायोग म्हणजे ह्या दोघांच्या वयात सोळा वर्षाचेच अंतर होते. 'श्रीभक्तलीलामृत' ह्या ग्रंथात महिपती ताहराबादकर तुकाराम-संताजी ह्यांच्या संपर्काबाबत उल्लेख करतात.

**"तुकयाच्या संगे वैष्णव जन। श्रेष्ठ निधडे असती कोण कोण।।**

**संताजी तेली बहु प्रेमळ। अभंग लिहित बसे जवळ।।"**

संत तुकारामांच्या अभंगाचे लेखनिक म्हणून संताजी जगनाडे ह्यांनी केलेले कार्य मराठी साहित्य इतिहासात अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. तत्कालीन धर्ममार्तंडांनी तुकारामांची अभंगगाथा इंद्रायणी नदीत बुडवून टाकल्यानंतर संताजी महाराजांनी तुकोबांचे सर्व अभंग मुखोद्गत असल्याने त्यांनी ते अभंग पुन्हा लिहून काढले. तुकारामांच्या पश्चात पन्नास वर्ष संताजींनी तुकाराम अभंगगाथा जपली. संताजींचा मुलगा बाळोजी ह्यांनी देखील ह्या अभंगगाथेत फार मोठे लिखाण केले आहे. संत तुकारामांचे वंशज गोपाळबाबा मोरे ह्यांनी असे म्हटले आहे

**“संताजी तेली बहु प्रेमळ।अभंग लिहित बसे जवळ।।**

**धन्य त्याचे भाग्य सबळ। संग सर्वकाळ तुक्याचा।।**

**संतु तुका जोडी। लावी ज्ञानाची गोडी।।”**

संताजींच्या अथक प्रयत्नामुळेच तुकारामांची अभंगगाथा जिवंत राहू शकली. इ.स.१६६० मध्ये शाहिस्तेखानच्या मुघल सैन्याने चाकणवर हल्ला चढविला, तेव्हा संताजींनी जीव धोक्यात घालून सर्व संकटांवर मात करीत अभंग सुरक्षित ठेवले. संत संताजी महाराज जगनाडे आपला प्रपंच, व्यवसाय आणि सामाजिक कार्य यांचे उत्तम संतुलन साधत. संत तुकाराम महाराष्ट्रीय बहुजन जनतेला अध्यात्म व विज्ञान अभंग, कीर्तनातून समजावून सांगत त्यामुळे वैदिक कर्मकांड करणाऱ्या सनातन्यांचा विरोध व छळ तुकारामांना सहन करावा लागला. संताजी महाराज हे संत तुकारामांचे शिष्य आणि समर्थक असल्याने हा दाह त्यांच्याही वाट्याला आला. तुकाराम महाराजांवर तत्कालीन न्यायालयाने बहिष्कार टाकण्याचे आदेश दिले असताना, त्यांच्याबरोबर राहणारे संताजी हे

एकमेव होते. मार्गशीर्ष वद्य त्रयोदशी इ.स.१६८८ ह्या वर्षी संताजी महाराजांचे देहावसान झाले. संत संताजी जगनाडे ह्यांना एकूण ६२ वर्षाचे आयुष्य लाभले. संताजींची समाधी पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात सुदुंबरे ह्या ठिकाणी आहे.

**"मारवाडी मारवाडचा, गुजराती गुजरातचा**
**कानडी कानड्याचा, मुसलमान तो दिल्लीचा**
**मराठी महाराष्ट्राचा, कोकणी कोकणचा**
**पण संतु तुका या देशाचा"**

असा आत्मचरित्रात्मक उल्लेख संताजीच्या अभंगकाव्यात आढळतो. संताजी महाराजांचे जीवन हे एक आदर्श जीवन होते. शिक्षणाचे महत्त्व, गुरुप्रति निष्ठा, प्रपंच-परमार्थ ह्यांचे संतुलन हे संताजींच्या जीवनाचे पैलू प्रामुख्याने जाणवतात. संताजींच्या जीवनातील सर्वात महान कार्य म्हणजे तुकाराम अभंग गाथेचे लेखन आणि रक्षण होय.

### ❖ संत संताजी महाराज जगनाडे : कवित्व

संताजी महाराज हे साक्षात्कारी संत तुकाराम ह्यांच्या प्रभावळीत निर्माण झालेले संत आहेत. तुकारामांच्या प्रभावातून संताजी महाराजांनी देखील काव्यलेखन केले आहे. संत संताजी महाराज जगनाडे ह्यांचे एकूण ८५ अभंग आज उपलब्ध आहेत. संताजींनी अभंगांसह 'शंकर दीपिका', 'योगाची वाट', 'निर्गुणाचं लावण्य' आणि 'तेलसिंधू' ह्या ग्रंथांचे लेखन केल्याचा उल्लेख आढळतो. त्यांची काव्यप्रतिभा विलक्षण होती. त्यांनी अभंगात व्यवसायनिष्ठ बोलीभाषेचे उपयोजन केले आहे. उदा.

**" आमुचा तो घाणा त्रिगुण तिळाचा। नंदी जोडियेला मन पवनाचा।।**

भक्ती हो भावाची लाट टाकीयीली। शांती शीळा ठेविली विवेकावरी।। ”

तेली व्यवसायातील अनेक रूपके, उपमा, अलंकार आणि वास्तववादी चित्रण संताजी महाराजांच्या अभंगात आढळते. संताजींच्या अभंगात जगण्याचे तत्त्वज्ञान सहजपणे आविष्कृत झालेले आहे.

### ❖ संत संताजी महाराज जगनाडे ह्यांच्या अभंगांतील तत्त्वज्ञान :

संत संताजी महाराज ह्यांच्या आज उपलब्ध असलेल्या एकूण ८५ अभंगांची अभ्यासपूर्ण चिकित्सा केली असता अभंगातील व्यवसायनिष्ठ भाषा, आशय वैपुल्य, तात्त्विक विचार आणि जगण्याचे तत्त्वज्ञान आपणासमोर दृग्गोचार होते. संताजीचे अभंग वाचल्यानंतर त्यांच्यावरील संत तुकाराम ह्यांचा प्रभाव विलक्षण जाणवतो. संताजी अभंगात तुकारामांच्याच तत्त्वभूमिकेचा पुरस्कार करताना दिसतात. त्यांच्या अनेक अभंगात संत तुकारामांच्या पद्यपंक्तींच्या पुनर्प्रत्ययाचा आनंद प्राप्त होतो. महाकवी तुकारामांचे सानिध्य लाभले असल्याने संताजींचे अभंग त्याच मुशीतून निर्माण झालेले आहेत. तुकाराम आणि रामदास ह्यांचा सारख्या पूर्वसुरींच्या काव्याचा विलक्षण प्रभाव संताजी महाराज ह्यांच्या अभंगांवर जाणवतो. त्यांचे काही अभंग तुकाराम–संताजी संवाद म्हणजेच गुरु-शिष्य संवाद ह्या स्वरूपाचे आहेत. त्यातून त्यांनी सद्गुरूच्या अनुनयाचे महत्त्व प्रतिपादले आहे. संत तुकाराम ह्यांच्या अनेक अभंग पंक्तींचे अनुकरण संताजींच्या अनेक अभंगात आढळते.

उदा.

**१.संतु म्हणे येथे पाहिजे जातीचे। येर गबाळाचे काम नाही।।**

**२.भरल्या वांचुनी कार्य सिद्धी नाही। शोधूनिया पाही संतु म्हणे।।**

**३.तुझिया सांगाती येते काही काही। कोणी येत नाही बाप आणि माई।।**

**सोयरा न येई बंधूही येईना।येईना रांडा पोरे अंतकाळी।।**

**४. माझिया जातीचा भेटो मज कोणी।**

**आवडिची धनी पुरवावया।।१।।**

**माझिया जातीचा मजशी मिळेल।**

**कळेल तो सर्व समाचार।।२।।**

**संतु म्हणे येथे पाहिजे जातीचे।**

**येर गबाळाचे काम नाही।।३।।**

संताजींनी अभंगात क्षमा शांतीचे महत्त्व देखील प्रतिपादित केले आहे. त्यावर देखील तुकारामांचा प्रभाव जाणवतो. उदा.

**क्षमा शांती जया नराचिये देही।दुष्ट तया काही करीत नाही।।**

संत तुकारामांचा 'रांडापोरे' हा खास वैशिष्टपूर्ण शब्द संताजी महाराज जगनाडे ह्यांच्या अभंगात आलेला आहे.

संत संताजी महाराज जगनाडे ह्यांच्या अभंगात अनेक पूर्वसुरींचे उल्लेख आढळतात. उदा.वाल्मिकी, नरहरी सोनार, संत चोखामेळा, सावता माळी, गोरा कुंभार, संत रोहिदास, संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, कान्होपात्रा, नामदेव इत्यादी.संत तुकारामांप्रमाणे समर्थ रामदास स्वामींच्या साहित्याचा प्रभाव संताजींच्या अभंगांवर दिसतो.

उदा.

**१. मनाला तो बोध रामदासाने केला। उपदेश दिला जगमाजी।।**

**२. संतु म्हणे तुम्ही मागे ते सरावे। मरावे परी कीर्ती रुपे उरावे।।**

संताजी महाराजांनी अनेक अभंगात मुक्ती, मोक्ष, सायुज्यता ह्यांचे वर्णन केले आहे.उदा.

संतु म्हणे वनमाळी। चुकवा जन्माची ही पाळी।।

अध्यात्मक्षेत्रातील योगदानाबद्दल वाटणारा स्वाभिमान, खऱ्या भक्ताची लक्षणे, ब्रम्हज्ञान, भक्ती श्रेष्ठत्व, पौराणिक भक्तांची वर्णने, कृष्णलीला, विठ्ठलभक्ती, सगुण भक्तीचे वर्णन, विवेकाचे महत्त्व, सोहं ब्रह्मध्वनी, सद्गुरूच्या अनुनयाचे महत्त्व, जाती-विषमतेविरुद्धचा उद्वेग, जन्म-मरणाचा फेरा इत्यादी अनेक विषयांचे तत्त्व विवेचन त्यांच्या अभंगात आढळते. अभंग म्हणजे काय? ह्या प्रश्नाचे विवेचन देखील त्यांच्या एका अभंगात आहे.

ज्याचा नोहे भंग। तोचि जाणावा अभंग।।

जो भंग पावत नाही तो अभंग असतो, असे संताजी म्हणतात.

संताजींच्या अनेक अभंगात आपल्या वारकरी संप्रदायातील पूर्वसुरींबद्दल अभिमान व्यक्त केला आहे. षड्रिपुंचे दमन करूनच भक्ताला सायुज्यता प्राप्त होऊ शकते असा विचार त्यांच्या अनेक अभंगांत व्यक्त केला आहे. त्यांनी काही अभंगात संसाराचे क्षणभंगुरत्व स्पष्ट करून भक्तीचे माहात्म्य प्रतिपादित केले आहे. आपले गुरू तुकारामांच्या कार्याबद्दल, कवित्वाबद्दल अभिमान काही अभंगांमधून संताजी व्यक्त करतात. भक्तिवाचून जीवन व्यर्थआहे, असे

मत ते अभंगातून स्पष्ट करतात. संत एकनाथांच्या अभंगांतील 'एका जनार्दनी'प्रमाणे संताजी महाराजांनी काही अभंगात स्वगुरू तुकाराम महाराजांचा नामोल्लेख केलेला दिसतो. चित्रमय, रूपकात्मक आणि प्रतीकात्मक भाषा व्यवसायनिष्ठ शब्दांचे उपयोजन ही संताजी महाराजांच्या अभंगांची ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील.

### ❖ संत संताजी महाराज जगनाडे ह्यांच्या अभंगांचे तात्त्विक अंगाने वर्गीकरण (उदाहरणांसह)

**१.आध्यात्मिक स्वाभिमान व्यक्त करणारे अभंग**

उदा.

माझिया जातीचा मज भेटो कोणी। आवडीची धनी पुरवावया।।

|**२.ब्रह्मज्ञान निरूपण व्यक्त करणारे अभंग**

उदा.

१.तुजशी ते ब्रह्मज्ञान काय आहे। भक्तिमाय वसे पोटी।।

२.मजशी रे ब्रह्मज्ञान काही नाही। आपुल्या कृपेने होईल सर्व काही।।

**३. भक्तीवर्णन/श्रेष्ठत्व व्यक्त करणारे अभंग**

उदा.

१.मनोभक्तीची करुनी लाठ। गुरुकृपेचा वसविला काठ।।

२.भक्ती ते माऊली माझे नच पोटी। जाणे उठाउठी देवराया।।

**४.क्षमा-शांतीचे महत्त्व व्यक्त करणारे अभंग**

उदा.

क्षमाशांती जया नराचिये देही। दुष्ट तया काही करीत नाही ।।

**५.विवेकाचे महत्त्व व्यक्त करणारे अभंग**

उदा.

१.मनमत्सराचा धरूनी हात।बसविला विवेक कातरीचे आंत।।

२.सद्बुद्धीची वढ घेऊन। विवेक कातरीस बांधून।।

**६.सगुण रुपाचे वर्णन करणारे अभंग**

उदा.

सगुण हा घाणा घेऊनी बैसलों।तेली जन्मा आलो घाणा घ्याया।।

**७.सद्गुरूच्या अनुनयाचे महत्त्व व्यक्त करणारे अभंग**

उदा.

सद्गुरू वाचोनी दाखविना कोणी। संसार मोहनी पडली असे।।

**८.जाती-विषमतेविरुद्धचा उद्वेग व्यक्त करणारे अभंग**

उदा.

संतु म्हणे जाती दोनच त्या आहे |स्त्री आणि पुरुष शोधुनिया पाहे ||

**९.षड्रिपुंच्या दमनाचे महत्त्व व्यक्त करणारे अभंग**

उदा.

संतु म्हणे मत्सर। जगामध्ये महाचोर।।

**१०.जन्म-मरणाच्या फेऱ्याचे वर्णन करणारे अभंग**

उदा.

१.संसाराकरिता जन्म वाया गेला। काळ न्याया आला आवचीत।।

२.तिच जन्म मरणाचे मुळ।असे माझे सांगणे समुळ।।

❖ **संतांजींचे काही प्रातिनिधिक अभंग आणि त्यातील तत्त्वज्ञान:**

मन हे ओढाळ गुरु फार आहे। परधन परकामिनीकडे धावे।।

असेच हे मन राहिना हो स्थिर।नेहमी हुरहुर लागली असे।।

संतु म्हणे मन करा तुम्ही स्थिर। राऊळा अंगणी जाऊनिया।।

प्रस्तुत संताजींनी लिहिलेल्या अभंगात मनाचे वर्णन आढळते. मन हे ओढाळ असून त्याला आवर घालून स्थिर करणे आवश्यक आहे.मन परमेश्वराच्या भक्तिनेच स्थिर होऊ शकते, असा विचार वरील अभंगात संताजी महाराज मांडतात. ह्या अभंगांची जातकुळी बहिणाबाई चौधरींच्या' मन वढाय वढाय' ह्या कवितेच्या जातकुळीशी साम्य दाखवते.

**सगुण हा घाणा घेऊनि बैसलो।**
**तेली जन्मा आलो घाणा घ्याया ।।१।।**
**नाही तर तुमची आमची एक जात।**
**कमी नाही त्यात आणु रेणु ।।२।।**
**संतु म्हणे जाती दोनच त्या आहे।**
**स्त्री आणि पुरुष शोधुनिया पाहे ।। ३ ।।**

वरील अभंगात संताजी महाराज म्हणतात की, मी जरी एका विशिष्ट जातीत जन्माला आलो असलो, तरी सर्व माणसांची जात आहे,ती म्हणजे मानव जात. आपण शोध घेऊन पाहिला तर, माणसांमध्ये दोनच जाती आहेत, त्या म्हणजे स्त्री आणि पुरुष. वरील अभंगात त्यांनी जातिभेदाच्या विरुद्ध आवाज उठविला आहे.

### ❖ निष्कर्ष :

संत संताजी महाराज जगनाडे ह्यांच्या अभंग आणि अभंगांतील तत्त्वज्ञानाची चिकित्सा

केल्यानंतर खालील निष्कर्ष काढता येतात.

१. संत संताजी महाराज जगनाडे हे मध्ययुगीन कालखंडातील संत तुकाराम ह्यांच्या प्रभावळीतील संत आहेत.

२. संताजी महाराजांच्या अभंगांची समीक्षकांनी नव्याने चिकित्सा केली पाहिजे.

३. संताजी महाराज ह्यांचे केवळ ८५ अभंगच आज उपलब्ध आहेत.

४. संताजी महाराज जगनाडे ह्यांच्या अभंगांची चित्रमयता, रूपकात्मक भाषा आणि

व्यवसायनिष्ठ भाषेतील शब्दांचे उपयोजन ही ठळक वैशिष्ट्ये जाणवतात.

५. संत संताजी महाराज जगनाडे ह्यांच्या अभंगांत त्यांची विलक्षण काव्यप्रतिभा जाणवते.

६. संताजींच्या अभंगांत जगण्याचे तत्त्वज्ञान सहजपणे आविष्कृत झालेले आहे.

७. आशयवैपुल्य, तात्त्विक विवेचन ही संताजींच्या अभंगांचे काही विशेष आहेत.

❖ **समारोप:**

**एकूणच, संत संताजी महाराज जगनाडे हे मध्ययुगीन कालखंडातील एक अलौकिक,प्रतिभावंत संतकवी होते. भाष्यकाराते वाट पुसतच संताजींनी आपले काव्यलेखन केले आहे. आतापर्यंत त्यांनी केलेल्या काव्यलेखनाकडे मराठी समीक्षकांचे दुर्लक्ष झाले आहे. आज संताजींच्या काव्यप्रतिभेचा समीक्षकांनी नव्याने विचार करून त्यांचे अभंग विचार जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे कार्य करायला हवे.**

## ❖ संदर्भ ग्रंथसूची :

१. देशमाने मोहन, ’महाराष्ट्राची अस्मिता श्री संताजी महाराज’, श्री संत संताजी विचारपीठ

प्रकाशन,पुणे; आवृत्ती नववी, २४ डिसेंबर २०१९.

२. देशपांडे शशिकांत, श्री संताजी महाराज जगनाडे, मंजुल प्रकाशन, प्रथमावृत्ती

३. बागुल फुला, ‘संताजी जगनाडे : चरित्र व अभंगांची चर्चा’, साक्षात प्रकाशन, छत्रपती


संभाजी नगर, प्रथमावृत्ती

४. मोरे धनंजय,’वारकरी संत चरित्रे’,आवृत्ती डिजिटल पहिली, २६/०९/२०१५.

५. सरदार गं.बा.,’संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती’, लोकवाङ्मय गृह,मुंबई; आवृत्ती


आठवी, डिसेंबर २०१०.

६. नवपुते राहुल, ‘संत तुकाराम यांच्या गाथेचे जनक : संत जगनाडे महाराज’, सामना वृत्तपत्र




संत संताजी महाराज जगनाडे

# मराठी भाषा संवर्धक महात्मा जोतिबा फुले




महाराष्ट्रातील वैचारिक प्रबोधनाचे अध्वर्यू, शूद्रातिशूद्र उद्धारक आणि बहुजन लोकनायक महात्मा उपाख्य जोतिबा गोविंदराव फुले यांचे महाराष्ट्रातील सामाजिक क्षेत्रातील योगदान मोलाचे आहे. अव्वल इंग्रजी कालखंडाच्या महाराष्ट्राच्या इतिहासात महात्मा फुले यांचे स्थान सर्वोच्च असेच आहे. मराठी भाषेच्या अभ्युदयासाठी महात्मा फुले यांनी अमूल्य योगदान दिले आहे.

## महात्मा फुले यांची साहित्य निर्मिती

महात्मा फुले यांनी अव्वल इंग्रजी कालखंडात मराठी भाषेत समृद्ध साहित्य निर्मिती केली.'गुलामगिरी'या वैचारिक गद्यनिबंधात महात्मा फुले यांनी भारतीय पुराणकथांचा नवीन अर्थ लावण्याचा यशस्वी प्रयत्न केला. भारतीय वर्णव्यवस्था,जातिव्यवस्था, उच्चवर्णीयांचा नकारात्मक दृष्टिकोण यावर त्यांनी ' गुलामगिरी'तून भाष्य केले आहे. दलित साहित्य प्रवाहात हे पुस्तक महत्त्वाचे मानले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महात्मा फुले यांना स्वतःचे गुरु मानत. 'अस्पृश्य कोण होते?' या डॉ. आंबेडकर यांच्या पुस्तकावर ‘गुलामगिरी’ या महात्मा फुले यांच्या पुस्तकाचा प्रभाव स्पष्ट जाणवतो.महात्मा फुले यांनी लिहिलेला 'शेतकऱ्याचा आसूड' हा वैचारिक गद्यग्रंथ मराठी साहित्यात महत्त्वाचा मानला जातो. महात्मा फुले यांच्या 'अखंडादी'कविता आणि

'शेतकऱ्याचा आसूड' यांचे मराठी ग्रामीण साहित्यात महत्त्वाचे स्थान आहे. अव्वल इंग्रजी कालखंडातील शेतकऱ्याच्या परिस्थितीचे वास्तववादी चित्रण महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्याचा आसूड' या वैचारिक गद्यात केले आहे.'कामापुरती लंगोटी । फिरी नांगराचे पाठी ।।'असे शेतकऱ्याच्या विदारक दारिद्र्याचे चित्र महात्मा फुले आपल्या एका अखंडात करतात.




**विद्येविना मती गेली ।**
**मतीविना नीती गेली ।**
**नीतीविना गती गेली ।**
**गतीविना वित्त गेले ।**
**वित्ताविना शूद्र खचले।**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।**

या अखंडात महात्मा फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले आहे.मराठी साहित्यातील साठोत्तरी साहित्य प्रवाहातील महत्त्वाच्या अशा दलित साहित्य व ग्रामीण साहित्य प्रवाहात महात्मा फुले यांना प्रेरणास्थानी मानले जाते. १८५५ मध्ये महात्मा फुले यांनी लिहिलेल्या 'तृतीय रत्न' या नाटकाला मराठीतील पहिले सामाजिक नाटक मानले जाते.

## महात्मा फुले यांचे मराठी भाषेला योगदान

महात्मा फुले यांनी मराठी भाषेच्या अभ्युदयासाठी अमोल योगदान दिले आहे. महात्मा फुले यांनी मराठीत 'सत्सार' हे नियतकालिक सुरू केले.

अव्वल इंग्रजी कालखंडात ईस्ट इंडिया कंपनी सरकारने पेशव्यांची श्रावणात रमणा वाटण्याची प्रथा चालू ठेवली, पण त्यासाठी संस्कृत भाषेतील ग्रंथाबद्दल ही दक्षिणा दिली जाईल अशी अट होती, परंतु स्थानिक बहुजनांच्या मराठी भाषेतील ग्रंथांना ही दक्षिणा दिली जात नसे. याविरोधात महात्मा फुले यांनी आवाज उठविला.महात्मा फुले यांच्या आंदोलनामुळे कंपनी सरकारने मराठी भाषेला देखील या योजनेत समाविष्ट केले.'मराठी' ही सामान्य रयतेची बहुजनांची भाषा आहे, मराठीला यथोचित सन्मान प्राप्त झाला पाहिजे, असा महात्मा फुले यांचा आग्रह होता.

अशाप्रकारे महात्मा फुले यांचे मराठी भाषा संवर्धन व विकासासाठी अमूल्य योगदान आहे, तसेच महात्मा जोतिबा फुले यांचे मराठी साहित्यातील स्थान देखील अढळ आहे.



# भाषासंवर्धक आणि साहित्य निर्माते :

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर



भारत आणि भारतीय संविधानाचे निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आधुनिक भारताच्या निर्मितीमध्ये महत्त्वाचे योगदान आहे.दलितमुक्ती, स्त्रीमुक्तीसाठी आंबेडकर यांनी केलेले प्रयत्न अद्वितीय असेच आहेत. भाषासंवर्धक आणि साहित्य निर्माते म्हणून देखील डॉ. आंबेडकर यांनी महत्त्वाचे योगदान केले आहे. स्वतः आंबेडकरांना मातृभाषा मराठी बरोबरच अनेक भाषा अवगत होत्या.भारतीय संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब उपाख्य भीमराव रामजी आंबेडकर यांचे मराठी भाषा आणि साहित्य यांमधील योगदान मोलाचे आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि मराठी पत्रकारिता

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मराठीतील एकूण पाच वृत्तपत्राचे संस्थापक-संपादक होते 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता', 'समता' आणि 'प्रबुद्ध भारत' या वृत्तपत्रांचा प्रारंभ आंबेडकर यांनी केला. या वृत्तपत्रांच्या

माध्यमातून भारतीय जनतेला 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा मूलमंत्र त्यांनी दिला. संत विचारांचा डॉ. आंबेडकरांवर प्रचंड प्रभाव होता. संत कबीर हे डॉ.आंबेडकरांना गुरूस्थानी होते. स्वतः आंबेडकर कबीरपंथी होते. 'मूकनायक' या ३१ जानेवारी १९२० रोजी स्थापन झालेल्या वृत्तपत्राचे बोधवाक्य म्हणून 'बुडता हे जन न देखवे डोळा।।' या संत तुकाराम यांच्या अभंगातील

**काय करूं आतां धरूनियां भीड। नि:शंक हें तोंड वाजविलें।।**

**नव्हे जगी कोणी मुकीयांचा जाण।सार्थक लाजून नव्हे हित।।**

ही काव्यपंक्ती स्वतः आंबेडकर यांनी निवडली होती. डॉ.आंबेडकर यांनी मराठी पत्रकारितेला दलिताभिमुख बनविले.

## मराठी साहित्य आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर

भारतीय पातळीवर मराठी साहित्य संतसाहित्य आणि दलित साहित्य प्रवाहाच्या अनुषंगाने परिचित आहे. दलित साहित्य निर्मितीमागे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दलितोध्दाराचे कार्य आणि विचार आहेत.दलित साहित्याचे प्रवर्तक आणि प्रेरणास्थान बाबासाहेब आंबेडकरच मानले जातात. दलित साहित्याला 'आंबेडकरी साहित्य' ही संज्ञा देखील वापरली जाते.

आंबेडकरवादी तत्त्वप्रणालीतील समता, स्वातंत्र्य, बंधुता, लोकशाही आणि न्याय या मूल्यांचा उद्घोष दलित साहित्यात केला जातो. दलित आत्मकथने, कविता,नाटकांमध्ये आंबेडकरांच्या कार्याबद्दल कृतज्ञताभाव व्यक्त केला जातो.

मराठीतील साठोत्तरी साहित्य प्रवाहांच्या निर्मितीमागे डॉ. आंबेडकरांचे दलितमुक्ती, स्त्रीमुक्ती आणि एकूणच मानव मुक्तीचे विचार आहेत.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन

डॉ. आंबेडकर यांनी बहुतांश लेखन इंग्रजी भाषेत केले आहे. 'बुद्ध आणि त्याचा धम्म' (बुद्ध अँड हिज धम्म), 'अस्पृश्य कोण होते?', 'द प्रॉब्लेम ऑफ रुपीज्', 'थॉट्स ऑन पाकिस्तान' इत्यादी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महत्त्वाचे ग्रंथ मानले जातात. या ग्रंथांमधून आंबेडकरांच्या अनुक्रमे धर्मविचार, सामाजिक विचार, अर्थविचार आणि राजकीय विचारांचा परिचय होतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या विविध वृत्तपत्रांमध्ये त्यांनी लिहिलेल्या संपादकीय लेखांमधून त्यांच्या आंबेडकरवादी तत्त्वज्ञानाचा परिचय होतो.

एकूणच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मराठी भाषा विकास व संवर्धन, साहित्यनिर्मिती यांमध्ये अद्वितीय असे योगदान आहे.



Reg. No. B. 1430

जाहिरातींचे दर :— कालमच्या दर ओळीस पहिल्या वेळीं ५ आणे. दुसऱ्या वेळीं ४आ. कायम २॥ आणे.

# मूकनायक

वर्गणीचा दर. वार्षिक ट. ह. सह २॥ रुपये.

काय करूं आतां धरूनियां भीड । निःशंक हें तोंड वाजविलें ।।
नव्हे जगीं कोणी मुकीयांचा जाण । सार्थक लाजून नव्हे हित ।।

वर्ष १ लें.] मुंबई, शनिवार ता. ३१ जानेवारी १९२० [अंक



# भूमिकन्या लोककवयित्री बहिणाबाई चौधरी

उत्तर महाराष्ट्रातील मराठीच्या लेवागण बोलीतील सिद्धहस्त कवयित्री बहिणाबाई चौधरी ह्यांनी अशिक्षित असूनही सकस काव्यनिर्मिती केली आहे. बहिणाबाईंच्या काव्यात सौंदर्य, तत्त्वज्ञान आणि जीवनानुभावाचे दर्शन घडते. 'देव कुठे?' ह्या कवितेत ईश्वराच्या निर्गुण, निराकार रूपाचे अत्यंत सौंदर्यपूर्ण त्तात्त्विक विवेचन बहिणाई करते.

**"देव कुठे देव कुठे ?**
**तुझ्या बुबुया मझार**
**देव कुठे देव कुठे ?**
**आभायाच्या आरपार"**

बहिणाबाईंच्या काव्यात लोकभाषा, म्हणी, वाक्प्रचार, लोकोक्ती, प्राक्कथा इत्यादींचे सौंदर्यपूर्ण उपयोजन दिसते. स्त्री भाषेचा उत्कृष्ट वापर, स्त्री विशिष्ट भावनांचा आविष्कार बहिणाईच्या काव्यात दिसतो. 'योगी आणि सासुरवाशिन' ह्या कवितेत स्त्री-भाषेचा व स्त्री विशिष्ट भावनांचा आविष्कार दिसतो.

**"देरे देरे योग्या ध्यान**
**एक काय मी सांगते**
**लेकीच्या माहेरासाठी**
**माय सासरी नांदते"**

बहिणाबाईंची काव्यरचना अशिक्षित असल्याने बरीचशी नष्ट झाली आहे. बहिणाबाईंच्या सुपुत्राने म्हणजेच मराठीतील मान्यवर कवी सोपानदेव

चौधरी ह्यांनी बहिणाबाईंच्या कविता लेखनबद्ध केल्या आहेत. १९५५ मध्ये कवयित्री बहिणाबाईंच्या मृत्युनंतर त्यांच्या कवितांचा संग्रह प्रसिद्ध झाला. ह्या काव्यसंग्रहाची प्रस्तावना आचार्य अत्रे ह्यांनी लिहिली आहे. बहिणाबाईंच्या कवितेत आंतरिक उमाळा, भावना-संवेदना ह्यांचे हृद्य दर्शन घडते. बहिणाबाईंच्या काव्यावर अनेक संशोधकांनी संशोधन करून पीएच.डी.(विद्यावाचस्पती) मिळवली आहे.

केवळ यमक जुळविणे म्हणजे काव्य नव्हे, तर तो मानवी भावनांचा उत्कट आविष्कार असतो ह्याची साक्ष बहिणाबाईंच्या काव्यामुळे पटते. काव्यनिर्मितीसाठी आवश्यक प्रतिभा, कल्पनाशक्ती, स्फूर्ती, चमत्कृती त्यांच्याकडे होती. बहिणाबाईंची प्रतिभा नवोनवोन्मेषशालिनी, अपूर्ववस्तू निर्माणक्षम होती. सामान्य स्त्रीचा असामान्य साहित्यिक आविष्कार म्हणजे बहिणाबाई चौधरींच्या कविता होय. अतिचपळ मनाचे वर्णन, अध्यामाचे वर्णन, माहेराविषयी वाटणारा आपलेपणा इत्यादी अनेक विषयांवर बहिणाबाईंनी काव्यलेखन आंतरिक उमाळ्यासह केले आहे. उदा.'माहेर', 'योगी आणि सासुरवाशिन', 'माहेराची वाट' ह्या कवितांमध्ये माहेराचे वर्णन, तसेच 'मन वढाय वढाय' ह्या कवितेत अतिचपळ मनाचे वर्णन आंतरिक उमाळ्यासह प्रगटते. बहिणाबाईंचे काव्य ठरवून झालेली काव्यनिर्मिती नाही, तर बहिणाबाईंच्या अंतःकरणाचा सहजोद्गार आहे आणि तो त्यांच्या संस्काराचा खास भाग आहे. काव्याची सर्व स्वरूप, अंगवैशिष्ट्ये बहिणाबाईंच्या काव्यात दृगोचर होतात. बहिणाबाईंच्या काव्यात रूपक, प्रतिमा, प्रतीकांचा सुरेख वापर दिसतो. बहिणाबाईंच्या कविता जगण्याचे आणि जीवनाचे तत्त्वज्ञान मांडणाऱ्या


कविता आहेत. बहिणाबाईंची कविता अरुपाचे रूप दाखवणारी कविता आहे. देवाचे अस्तित्व, निर्गुण भक्ती ह्यांच्यावर बहिणाबाईंची प्रचंड आस्था दिसते. वारकरी भागवत पंथाचा संस्कार बहिणाबाईंच्या काव्यात दिसतो. उदा.'परशुराम बेलदार' ह्या कवितेत पंढरपूरच्या वारीचे वर्णन दिसते. भारतीय संस्कृतीचे अस्सल प्रकटन बहिणाबाईंच्या काव्यातून झाला आहे. माणसाचा स्वार्थी स्वभाव, आपमतलबीपणा ह्यांवर त्या काव्यातून कोरडे ओढतात. उदा.'मानुस' ही कविता. बहिणाबाईंच्या कवितांचे विषय माहेर, संसार; शेतीची साधने, कापणी, मळणी इ. कृषिजीवनातील विविध प्रसंग; अक्षय्य तृतीया, पोळा, पाडवा इत्यादी सणसोहळे; काही परिचित व्यक्ती असे आहेत. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुखदुःखांकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्त्वज्ञान ही त्यांच्या कवित्वाची वैशिष्ट्ये आहेत. बहिणाबाईंचे काव्य कृत्रिम न वाटता सहज, नैसर्गिक वाटते. बहिणाबाईंच्या काव्यनिर्मितीमधील योगदानासाठी जळगाव येथील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे ‘कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव’ असा नामविस्तार करण्यात आला आहे.



लोककवयित्री बहिणाबाई चौधरी ह्यांचे छायाचित्र

प्रा. समीर रामचंद्र वैरागी यांचे ई साहित्यवरील पहिले पुस्तक

क्लिक करताच उघडेल



# लेखक परिचय



**प्रा. समीर रामचंद्र वैरागी**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | प्रा. समीर रामचंद्र वैरागी |
| व्यवसाय | : | सहायक प्राध्यापक आणि विभागप्रमुख (मराठी), राजपत्रित अधिकारी (म.शि.से.), गट -अ, महाराष्ट्र शासनाचे इस्माईल युसुफ महाविद्यालय, जोगेश्वरी(पूर्व), मुंबई - ६०. |
| शिक्षण | : | एम.ए., बी.एड., एम.फिल., नेट (जेआरएफ), सेट, |
| इतर शैक्षणिक अर्हता | : | वृत्तपत्रपदविका, भगवद्गीता पदविका, मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम, भारतीय ज्ञान परंपरा प्रमाणपत्र अभ्यासक्रम |